सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १८ मे २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १६९ | पाने १२ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



मनुष्याचे जीवन आकांक्षांनी भारलेले व ध्येयनिष्ठ असलेच पाहिजे. नाही तर ते पशुजीवन आहे. ध्येय सामान्य असो अथवा उदात्त, पण असे लक्ष्य समोर ठेवून जीवन जगणे, ध्येयविहीन जीवनापेक्षा शतपटींनी श्रेष्ठ आहे.

**- स्व. एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# भारत-नेदरलॅण्ड्समध्ये १७ सामंजस्य करार

- संरक्षण ते दुर्मिळ खनिजांचा समावेश
- द्विपक्षीय संबंध सामरिक भागीदारीच्या पातळीवर

**द हेग, १७ मे**

बदलत्या जागतिक भू-राजकीय परिस्थिती पाहता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नेदरलॅण्ड्सचे पंतप्रधान रॉब जेटेन यांच्यातील चर्चेदरम्यान दोन्ही देशांनी द्विपक्षीय संबंध सामरिक भागीदारीच्या पातळीवर नेले तसेच संरक्षण, दुर्मिळ खनिजांसह इतर प्रमुख क्षेत्रांमधील सहकार्य वाढवण्यासाठी १७ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या.

शनिवारी सायंकाळी झालेल्या बैठकीत दोन्ही पंतप्रधानांनी पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत विशेषतः जागतिक ऊर्जा पुरवठा आणि व्यापारात निर्माण झालेल्या व्यत्ययांमुळे त्या प्रदेशावर आणि त्या पलीकडे होणाऱ्या परिणामांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली.

मोदी आणि जेटेन यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून स्वातंत्र्य आणि जागतिक व्यापाराचा मुक्त प्रवाह असावा, अशी मागणी केली तसेच कोणत्याही निर्बंधनात्मक उपाययोजनांना विरोध दर्शवत या संदर्भात सुरू असलेल्या उपक्रमांना पाठिंबा असल्याचा पुनरुच्चार केला. या दोन्ही नेत्यांनी युक्रेनमधील परिस्थितीवरही चर्चा केली. संयुक्त राष्ट्र सनद आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांवर आधारित राहून संवाद व मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून युक्रेनमध्ये सर्वसमावेशक न्याय्य आणि चिरस्थायी शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा देणे सुरू ठेवण्यास त्यांनी सहमती दर्शवली, असे संयुक्त निवेदनात म्हटले. युक्रेनच्या मुद्द्यावर दोन्ही बाजूंनी सध्या सुरू असलेल्या युद्धाबाबत चिंता व्यक्त केली. हे युद्ध मानवी हालअपेष्टांना कारणीभूत असून, त्याचे जागतिक परिणाम होत आहेत, असे त्यात नमूद करण्यात आले.



रॉब जेटेन यांच्यासोबत हस्तांदोलन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

नेदरलॅण्ड्स हे युरोपमधील भारताच्या सर्वांत मोठ्या व्यापारी भागीदारांपैकी एक असून, २०२३-२५ मध्ये दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार २७.८ अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. हा युरोपियन देश ५५.६ अब्ज अमेरिकी डॉलर्सच्या थेट विदेशी गुंतवणुकीसह भारतातील चौथा सर्वांत मोठा गुंतवणूकदार आहे.

**हरित हायड्रोजनसाठी कृती आराखडा**

दोन्ही नेत्यांनी हरित हायड्रोजनच्या विकासाबाबत भारत-नेदरलॅण्ड्स कृती आराखडा या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचाही शुभारंभ केला. तंत्रज्ञान हस्तांतरण आणि संयुक्त उपक्रमांची उभारणीद्वारे संरक्षणविषयक उपकरणे, प्रणाली, सुटे भाग आणि इतर महत्त्वाच्या क्षमतांचे संयुक्त उत्पादन सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने संरक्षण क्षेत्रातील औद्योगिक कृती आराखडा तयार करण्याच्या शक्यता पडताळून पाहण्यावर मोदी-जेटेन यांच्यात एकमत झाले. (वृत्तसंस्था)

### धोरणात्मक भागीदारी आराखडा

**मोदी-जेटन यांच्या चर्चेनंतर भारत आणि नेदरलॅण्ड्सने व्यापार व गुंतवणूक, संरक्षण व सुरक्षा तसेच सेमीकंडक्टर्स, अंतराळ, एआय आणि क्वांटम कम्प्युटिंगसारख्या महत्त्वपूर्ण व उदयोन्मुख क्षेत्रांतील संबंधांना चालना देण्यासाठी एका धोरणात्मक भागीदारी आराखड्याचे अनावरण केले.**

### नरेंद्र मोदी स्वीडनमध्ये दाखल

**नेदरलॅण्ड्सचा दौरा आटोपल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी स्वीडनमध्ये दाखल झाले. येथे ते व्यापार, तंत्रज्ञान, संरक्षण आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांवर चर्चा करणार आहेत. गॉथेनबर्गमध्ये पोहोचत असताना पंतप्रधानांच्या विमानाला स्वीडिश वायुदलाच्या लढाऊ विमानांनी संरक्षण दिले. विमानतळावर त्यांचे स्वीडिश समपदस्थ उल्फ क्रिस्टरसन यांनी त्यांचे अत्यंत उत्साहात स्वागत केले; यावरून या दौऱ्याचे महत्त्व अधोरेखित होते.**

# सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी

- मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही
- कृषी हॅकेथॉनचा समारोप



**पुणे, १७ मे**

राज्य सरकारकडून अनेक वेळा शेतकऱ्यांना विम्याचे पैसे देऊनही बाजार समितीमध्ये पिकांची आवक (क्रॉप अराईव्हल) तेवढीच राहते आहे. यातून गडबड लक्षात येते. त्यामुळे या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जास्तीत जास्त सॅटेलाईट, ड्रोनच्या माध्यमातून कृषी क्षेत्र शाश्वत करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी पुणे कृषी हॅकेथॉन समारोप समारंभाप्रसंगी केली. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी राज्य सरकार कधीच पैसे कमी पडू देणार नाही. परंतु, ही मदत योग्य आणि आणि अडचणीतल्याच शेतकऱ्याला मिळेल यासाठी सरकार कायम प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यात होणाऱ्या हॅकेथॉनमध्ये असे नवनवीन तंत्रज्ञान पाहावयास मिळाले असून हे अत्यंत महत्त्वाचे आणि भविष्यात कृषी पूरक ठरणारे आहे. त्यामुळे पुण्यात होणारी ही पुणे कृषी हॅकेथॉन पुण्याऐवजी राज्यस्तरीय पातळीवर सुरू करण्यात येणार आहे. तसेच या हॅकेथॉनमध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने सर्वोत्तम पुरस्कारही देण्यात येईल, अशी घोषणाही फडणवीस यांनी केली.

यावेळी खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रेय भरणे, आमदार योगेश टिळेकर, हेमंत रासने, जिल्हा परिषद कृषी विभागाचे सभापती अमोल नलावडे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आणि इतर विभागातील पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जलसंकट, सोलर, पाण्याचा सुयोग्य वापर, कीटक नाशक, हार्वेस्टिंग, कमी खर्चात जास्त उत्पादन या प्रत्येक गोष्टीत तंत्रज्ञान असल्याशिवाय शेती क्षेत्रातील संकट संपवले जाऊ शकत नाही.

आतापर्यंत ज्या पारंपरिक पद्धतीने शेतकरी उत्पादन करत होता, त्यापेक्षा कमी कालावधीत, कष्टात उत्कृष्ट आणि जादा उत्पन्न मिळविण्यासाठी संशोधनात्मक प्रयोग या हॅकेथॉनच्या माध्यमातून समोर आले आहे. या संशोधनांना राज्य सरकार स्टार्ट अपच्या माध्यमातून मदत करत आहे. (तभा वृत्तसेवा)

### केंद्राकडूनही दखल

**एआय आणि मशीन लर्निंग या तंत्रज्ञानामुळे कृषी क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. महाविस्तार या ॲपच्या माध्यमातून कुठल्याही शेतकऱ्याला अपेक्षित उत्तर त्याच्या समजेल या भाषेत मिळणार आहे. कृषी संबंधित स्वतंत्र हे ॲप विकसित करण्यात आले आहे. केंद्र सरकारकडूनही महाविस्तार बरोबर भारत विस्तार ॲप तयार करण्यात येणार आहे. ॲग्री स्टॅकच्या माध्यमातून सर्व योजना डीबीटीच्या माध्यमातून चालवण्यात येणार आहे. या सर्व गोष्टी एकत्रित करून गरजू शेतकऱ्याला लाभ मिळेल, असे फडणवीस यांनी नमूद केले.**

### पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' राज्यव्यापी

**शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक संशोधन व नवकल्पनांची जोड आवश्यक असून कृषी नवसंकल्पना स्पर्धेसारखे उपक्रम भविष्यातील कृषी व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरत आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' राज्यव्यापी स्वरूपात आयोजित करण्यात येईल तसेच स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली.**

## महत्त्वाचे

### सतीशन् घेणार आज मुख्यमंत्रिपदाची शपथ

**तिरुवनंतपुरम :** केरळमध्ये व्ही. डी. सतीशन् यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकारचा शपथविधी सोमवारी सकाळी १० वाजता तिरुवनंतपुरम येथील सेंट्रल मैदानामध्ये होणार आहे. मुख्यमंत्र्यांसह एकूण २१ मंत्री शपथ घेणार आहे, यात काँग्रेसच्या ११ तर, आययूएमएल पक्षाच्या पाच आमदारांचाही समावेश असेल. सतीशन् यांनी रविवारी राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांची भेट घेऊन मंत्र्यांची यादी सादर केली. मंत्र्यांमध्ये काँग्रेस नेते रमेश चेन्नीथला, सनी जोसेफ आणि के. मुरलीधरन यांचा समावेश आहे. राज्यापालांची भेट घेतल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना सतीशन म्हणाले, थिरुवनचूर राधाकृष्णन हे विधानसभेचे सभापती आणि शनिमोल उस्मान यांची उपसभापतीपदी निवड करण्यात आली. केरळ काँग्रेसचे पी. जे. जोसेफ हे मुख्य प्रतोद असतील. विधानसभा निवडणुकीत काँग्रेस नेते सतीशन् यांच्या नेतृत्वाखाली यूडीएफ आघाडी १० वर्षांनंतर पुन्हा सत्तेत परतली. काँग्रेसचे ११ मंत्री यावेळी शपथ घेणार आहे.

### न्यायमूर्तींची संख्या ३७ पर्यंत वाढवण्यास राष्ट्रपतींची मंजुरी

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींची संख्या ३३ वरून ३७ पर्यंत वाढवणाऱ्या अध्यादेशाला मंजुरी दिली आहे. सरन्यायाधीशांसह, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची एकूण संख्या आता ३८ होईल. प्रलंबित खटल्यांचा निपटारा जलद करणे आणि देशाची न्यायव्यवस्था अधिक मजबूत करणे, हा या निर्णयाचा उद्देश आहे. राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा अध्यादेश, २०२६ जारी केला आहे. या नवीन अध्यादेशाच्या अंमलबजावणीमुळे, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची मंजूर संख्या आता ३३ वरून ३७ झाली आहे. ३७ न्यायाधीशांमध्ये भारताच्या सरन्यायाधीशांचा समावेश नसेल.

### सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नव्या नियमांना मंजुरी!

**नागपूर :** तब्बल सहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर राज्य सरकारने महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्था नियमांना अखेर मंजुरी दिली असून, त्यामुळे राज्यातील सुमारे १.२५ लाख सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या कारभारात मोठे बदल होणार आहेत.डिजिटल प्रशासन, पुनर्विकास प्रक्रियेत पारदर्शकता, आर्थिक शिस्त आणि सदस्यांचा वाढता सहभाग यावर भर देणारे हे नियम पुढील आठवड्यात अधिकृतरीत्या प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. २०१९ मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यात करण्यात आलेल्या दुरुस्तीनंतर या नियम ांचा मसुदा २०२० मध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता. मात्र विविध स्तरांवरील सल्लामसलत, दुरुस्त्या आणि कायदे व न्याय विभागाकडील तपासणीमुळे अंतिम मंजुरीला विलंब झाला. त्यामुळे अनेक गृहनिर्माण संस्था जुन्याच नियम ांनुसार कार्यरत होत्या. आता नव्या नियमांमुळे देखभाल शुल्क, थकबाकी, सभासदत्व हस्तांतरण, पुनर्विकास आणि आर्थिक व्यवस्थापनाबाबत स्पष्टता येणार असल्याचे सहकार विभागातील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

नीट पेपरफूट प्रकरण

# मनीषा मांढरेला १४ दिवसांची कोठडी

**नवी दिल्ली, १७ मे**

नीट यूजी-२०२६ पेपरफूट प्रकरणी पुण्यातील बॉटनीची (वनस्पतीशास्त्र) प्राध्यापक मनीषा मांढरेला १४ दिवस सीबीआयच्या कोठडीत ठेवण्याचा आदेश येथील विशेष न्यायालयाने रविवारी दिला.



सीबीआयने या पेपरफुटीच्या कटाचा सखोल तपास करीत आहे. मनीषा मांढरेचे या प्रकरणातील सूत्रधारांशी थेट संबंध असल्याचे तपासात समोर आले. मनीषा मांढरे नीट यूजी परीक्षा प्रक्रियेत सहभागी होती. एनटीएने तिची तज्ज्ञ म्हणून नियुक्ती केली होती. यामुळे तिला बॉटनी (वनस्पतीशास्त्र) आणि झूलॉजीच्या (प्राणिशास्त्र) प्रश्नपत्रिका पाहण्याची परवानगी मिळाली होती.

नीट यूजी-एप्रिल २०२६ दरम्यान मनीषा मांढरेने परीक्षेला बसणाऱ्या संभाव्य विद्यार्थ्यांशी संपर्क साधला होता. तिने तिच्या पुण्याच्या निवासस्थानी विद्यार्थ्यांसाठी विशेष कोचिंग क्लासेस घेतले होते. या क्लासेसदरम्यान तिने बॉटनीआणि झूलॉजीचे अनेक प्रश्न आधीच उघड केले. हे प्रश्न विद्यार्थ्यांना त्यांच्या वह्यांमध्ये व पाठ्यपुस्तकात नोंदवून घेण्यास सांगितले होते.

नीट पेपरफुटीच्या मागे खूप मोठे रॅकेट असून, अनेक बड्या नावांचा यात समावेश असण्याची शक्यता आहे, असे सीबीआयने आरोपीच्या कोठडीची मागणी करताना न्यायालयास सांगितले. न्यायालयाने सीबीआयचा हा युक्तिवाद मान्य करत मनीषाला १४ दिवसांची सीबीआय कोठडी ठोठावली.

**देशभरात सहा ठिकाणी छापे**

नीट पेपरफुटीप्रकरणी गेल्या २४ तासांत सीबीआयने लातूरसह देशभरात सहा ठिकाणी छापे टाकले आहेत. (वृत्तसंस्था)



### होर्मुझ पार करीत एलपीजी टँकर भारतात

**नवी दिल्ली :** होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावाच्या पृष्ठभूमीवर एक एलपीजी टँकर रविवारी भारताच्या हद्दीत पोहोचले. या टँकरमध्ये २० हजार टन एलपीजी आहे. मार्शल आयलँडचा ध्वज असलेले सिमी नावाचे टँकर एलपीजी घेऊन रविवारी सकाळी गुजरातच्या कांडला येथील दीनदयाल बंदरावर पोहोचले आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने कतारच्या रास लफ्फान टर्मिनलवरून खरेदी केलेल्या या जहाजावर २० हजार टन लिक्विड प्रोपेन आणि ब्युटेन लादलेले होते. अमेरिकेची नाकाबंदी आणि इराणी नौदलाचा कडा पहारा असतानाही खलाशांनी जहाज सुरक्षितपणे बाहेर काढले.

### दहशतवादी हल्ल्यात १७ प्रशिक्षणार्थी ठार

**अबुजा :** नायजेरियाच्या योबे राज्यातील लष्कराच्या प्रशिक्षण केंद्रावर रविवारी इस्लामिक दहशतवाद्यांनी भीषण हल्ला केला. यात १७ प्रशिक्षणार्थी कॅडेट्स ठार झाले, तर ३५ सैनिक जखमी झाले. राष्ट्रीय पोलिस प्रवक्ते अँथनी ओकोन प्लासिड यांनी निवेदनात म्हटले की, दहशतवाद्यांनी योबे राज्यातील बुनी यादी भागातील नायजेरियन लष्कराच्या प्रशिक्षण केंद्रावर अनेक दिशांनी हल्ला केला.

# उदयनिधी स्टॅलिनविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका

### विधानसभेत सनातनवर केलेली टिप्पणी भोवली

**नवी दिल्ली, १७ मे**

सनातन धर्म संपवावाच लागेल, अशी वादग्रस्त टिप्पणी करणारे द्रमुकचे आमदार आणि तामिळनाडूचे विरोधी पक्षनेते उदयनिधी स्टॅलिन यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. धार्मिक तेढ निर्माण करून हिंदू समुदायांच्या भावना दुखावल्याच्या आरोपात स्टॅलिन यांच्यावर गुन्हा दाखल करून अटकेचे आदेश द्यावे, अशी मागणी याचिकेतून करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयातील एका वकिलाने ही याचिका दाखल केली आहे.

मागील आठवड्यात विधानसभेत बोलताना स्टॅलिन यांनी मुख्यमंत्री विजय यांच्या उपस्थितीत सनातनवर वादग्रस्त टिप्पणी केली. काही वर्षांपूर्वीही त्यांनी सनातन धर्माबाबत वक्तव्य केले होते. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने त्यांना कडक शब्दांत फटकारले होते. मात्र, यावेळी त्यांनी हे वक्तव्य तामिळनाडू विधानसभेच्या आत केले आहे. अमिता सचदेवा नावाच्या महिला वकिलाने दाखल केलेल्या याचिकेत स्टॅलिन यांच्या सनातन धर्म संपवण्याच्या विधानाचा उल्लेख करण्यात आला आहे.

**याचिकेत काय म्हटले ?**

याचिकेत नमूद करण्यात आले की, द्वेषयुक्त भाषण प्रकरणांबाबत सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही पोलिसांनी स्टॅलिन यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. यापूर्वीच्या त्यांच्या वक्तव्यावर झालेल्या सुनावणीत न्या. विक्रम नाथ यांनी त्यांना फटकारत पोलिसांना कारवाईचे आदेश दिले होते. मात्र त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. आता पुन्हा त्यांनी द्वेषाच्या भावनेतून हिंदूंना लक्ष्य केले. याची दखल घेऊन त्यांच्या अटकेचे आदेश द्यावेत. (वृत्तसंस्था)

### मंदिरातील पुजाऱ्यांच्या वेतनावर आज सुनावणी

**नवी दिल्ली, १७ मे**

सरकारी मंदिरांतील पुजारी आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा आढावा घेण्यासाठी न्यायिक आयोग स्थापन करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय सोमवारी सुनावणी घेणार आहे. या याचिकेत त्यांना सरकारी कर्मचारी म्हणून घोषित करून सन्मानजनक वेतन देण्याची मागणी करण्यात आली आहे.

याचिकेत सरकारी मंदिरांतील पुजारी, सेवक आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा आणि इतर लाभांचा आढावा घेण्याची मागणी करण्यात आली आहे. न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासन जनहित याचिकेवर सुनावणी घेणार आहे. (वृत्तसंस्था)

# केदारनाथ धाममध्ये अफाट गर्दी

## क्षमतेच्या ४० टक्क्यांपेक्षा अधिक भाविक

**डेहराडून, १७ मे**

केदारनाथ धाम भाविकांसाठी खुले झाल्यापासून दरदिवशी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहे. अफाट गर्दी होत असल्याने प्रशासनाच्या नाकीनऊ आले आहे. दररोज ३० हजार भाविकांची भर पडत असून, ही संख्या निश्चित संख्येपेक्षा ४० टक्क्यांनी अधिक आहे.

यावेळी प्रवासी क्षमता वाढवून २२ ते २४ हजार केली, परंतु यात्रेच्या पहिल्या दिवसापासूनच यापेक्षा जास्त भाविक येत आहेत. त्यामुळे घोडा पडावपासून ते मंदिरापर्यंतची सर्व दुकाने, टेंट, गेस्ट हाऊस, छोटे लॉज सर्व हाऊसफुल्ल आहेत व आणिबाणीच्या स्थितीत थांबावे लागल्यास एका खोलीचे एका रात्रीचे भाडे ५ ते १० हजारांपर्यंत जात आहे. गौरीकुंड व सोनप्रयागमध्येही अशीच स्थिती आहे. थांबण्यासाठी जागा मिळण्यात अडचण येत आहे. केदारसभा मंदिर समितीचे अध्यक्ष राजकुमार तिवारी यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले, यावेळी गर्दीमुळे यात्रेचे



स्वरूप बिघडत आहे. धामची मर्यादा, प्रवासी आणि व्यापाऱ्यांच्या सुविधांवर परिणाम होत आहे. २५ दिवसांत विक्रमी ५.५० लाखांपेक्षा जास्त भाविक येऊन गेले. दर्शनासाठी मध्यरात्रीपासूनच रांगेस सुरुवात होते, जी दिवसभरात १ ते २ किमी लांब राहते. सकाळी ४ वाजता रांगेत उभे राहिले, तर ८ ते १० तासांनंतरच मंदिरापर्यंत पोहोचता येते.

**नवीन व्यवस्था तयार करणार : अनिल राणा**

शिवलिंगाला स्पर्श करण्याची वेळ सकाळी ४ ते दुपारी १२ वाजेपर्यंत आहे. यानंतर भोजन, हवन, शृंगार यासाठी मंदिराचे कपाट बंद केले जातात. सकाळी ४ वाजता रांगेत उभे राहिल्यास, ८ ते १० तासांनंतरच मंदिरात पोहोचता येते. उखीमठचे उपजिल्हाधिकारी अनिल राणा यांनी सांगितले की, दर्शनाच्या वेळेबाबत होणारी अडचण दूर करण्यासाठी नवीन व्यवस्था तयार केली जात आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना थांबवणे शक्य नाही. (वृत्तसंस्था)

### 'व्हीआयपी' दर्शनामुळे प्रतीक्षा वाढली

**हेलिकॉप्टरने येणारे भाविक मंदिर समितीला २५०० रुपये शुल्क देतात. त्यामुळे त्यांना गर्भगृहात आधी जाऊ दिले जाते. यामुळे रांगेतील भाविकांची दर्शनासाठीची प्रतीक्षा वाढते. एवढ्या गर्दीसाठी शौचालयांची संख्या खूपच कमी पडत आहे. सुलभ इंटरनॅशनलचे प्रभारी धनंजय पाठक यांच्या मते, २३९ शौचालये आहेत. ६० नवीन शौचालये बांधली जात आहेत. ४१२ स्वच्छता कर्मचारी आहेत, जे अनेकदा २० तास ड्युटी करतात.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### तृणमूल काँग्रेसच्या कार्यालयावर छापे

**कोलकाता** : पश्चिम बंगालची राजधानी कोलकात्ता येथील तृणमूल काँग्रेसच्या मुख्य कार्यालयावर रविवारी पोलिसांनी छापे टाकले. या कारवाईत १०० हून अधिक आधार कार्ड आणि सरकारी जमिनीच्या अवैध खरेदी-विक्रीशी संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली. तृणमूलच्या कार्यालयात सापडलेली आधार कार्ड स्थानिक रहिवाशांची आहेत. जेव्हा आधार कार्ड जारी करण्यात आली, तेव्हा ती तृणमूलच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवण्यात आली होती. आधार कार्डबद्दल विचारल्यावर, पक्षाचे सदस्य अनेकदा ती अद्याप आलेली नाहीत असे सांगत असल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. या कारवाईत सरकारी जमिनीशी संबंधित कागदपत्रे सापडली आहे. जप्त करण्यात आलेली कागदपत्रे आणि आधार कार्डचा तपास केला जाणार आहे. त्यांचा दुरुपयोग केल्याचे निष्पन्न झाल्यास गुन्हा दाखल करून संबंधितांना अटक केली जाईल असेही पोलिसांकडून सांगण्यात आले.

# युक्रेनचा रशियावर ७०० ड्रोनचा मारा; पंधरा नागरिक ठार

**कीव्ह, १७ मे**

रशियाने दोन दिवसांपूर्वी केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत युक्रेनच्या लष्कराने राजधानी मॉस्कोसह विविध शहरात तासभरातच ७०० पेक्षा अधिक लांब पल्ल्याच्या ड्रोनचा मारा केला. यात अनेक इमारती उद्ध्वस्त होऊन १५ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ६० हून अधिक जखमी आहे.



रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने हल्ल्याची पुष्टी केली असून, ड्रोनच्या माऱ्यात विविध भागांतील निवासी इमारती आणि पायाभूत सुविधांचेही नुकसान झाल्याचे सांगितले. शनिवारी रात्री झालेल्या हल्ल्यात हवाई संरक्षण प्रणालीने डझनहून अधिक भागांमध्ये ५५६ युक्रेनियन ड्रोन नष्ट करण्यात आले. मॉस्को आणि पश्चिम रशियाच्या आसपास अनेक स्फोट झाले. युक्रेनच्या हल्ल्यात मॉस्कोतील दहा, तर इतर भागात पाच असे पंधरा नागरिक हल्ल्यात ठार झाले आणि ६० हून अधिक जखमींना इमारतीच्या ढिगाऱ्यातून बाहेर काढून रुग्णालयात भरती करण्यात आले. मॉस्को प्रदेशाचे गव्हर्नर आंद्रेई वोरोब्योव्ह यांनी सांगितले की, या हल्ल्यात २५ पेक्षा अधिक इमारतींचे, चार रेल्वे स्थानक आणि वीज प्रकल्पांचे नुकसान झाले.

**ताकदीने प्रत्युत्तर देणार**

हल्ल्याचा निषेध करताना रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, निवासी भागांवरील हल्ले सहन केले जाणार नाही. युक्रेनला ताकदीने प्रत्युत्तर दिले जाईल. झोपेत असलेल्या नागरिकांवर झालेल्या हल्ल्याची तुलना त्यांनी दहशतवादी कृत्याशी केली. (वृत्तसंस्था)

**मॉस्कोतील इमारती उद्ध्वस्त**

### परिणाम भोगण्यास तयार राहा : झेलेन्स्की

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्की म्हणाले, आम्ही राजधानी कीव्हवर झालेल्या क्रूर हल्ल्याचा सूड घेतला आहे. युक्रेनियन शहरे आणि नागरिकांवरील हल्ले सुरू ठेवल्यास रशियाला परिणाम भोगावे लागतील. त्यांनी संघर्षविराम मोडत केलेल्या हवाई हल्ल्याला आम्ही प्रत्युत्तर दिले आहे.

# यूएईच्या अणुऊर्जा प्रकल्पावर ड्रोन हल्ला

## इराणवर संशय, संघर्ष भडकण्याची शक्यता

**दुबई, १७ मे**

संयुक्त अरब अमिरातीच्या (यूएई) बरका अणुऊर्जा प्रकल्पावर रविवारी ड्रोन हल्ला करण्यात आला. प्रकल्पाची बाह्य सुरक्षा भेदून हा हल्ला झाला. हल्ल्यामागे इराणचा हात असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

यूएईवर झालेल्या ड्रोन हल्ल्यामुळे पश्चिम आशियामध्ये युद्धाची ठिणगी पुन्हा पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बरका अणुऊर्जा प्रकल्पाला रविवारी ड्रोन हल्ल्याने लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यामुळे प्रकल्पाच्या बाहेरील भागात असलेला एक विद्युत जनरेटर पेटला. या घटनेमुळे इराण-अमेरिका यांच्यातील संघर्षविराम पुन्हा एकदा धोक्यात आला असून, संघर्ष भडकण्याची शक्यता आहे. अबुधाबीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही संघटनेने स्वीकारलेली नाही. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. शिवाय, कोणत्याही किरणोत्सर्गी गळतीची शक्यता नाही. अणुभट्ट्या पूर्णपणे सुरक्षित असल्या तरी, इराण आणि अमेरिका यांच्यातील डळमळीत शस्त्रसंधीचे रूपांतर एका गंभीर जागतिक ऊर्जा संकटात आणि उघड युद्धात होऊ शकते.

दरम्यान यूएईने अलीकडेच युद्धादरम्यान इस्रायली आयर्न डोम क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली आणि सैन्याला आश्रय दिला होता, ज्यामुळे इराण संतप्त आहे. (वृत्तसंस्था)



### आगीमुळे नुकसान, प्रकल्पाला हानी नाही

यूएई परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, ड्रोन हल्ल्यानंतर प्रकल्पाला आग लागली, बचाव पथकाने तातडीने आगीवर नियंत्रण मिळवले. प्रकल्पाला कोणतीही हानी झालेली नाही. दक्षिण कोरियाच्या मदतीने बांधलेला २० अब्ज डॉलर्सचा बरका अणुऊर्जा प्रकल्प २०२० मध्ये कार्यान्वित झाला. हा अरबी द्वीपकल्पातील पहिला आणि एकमेव अणुऊर्जा प्रकल्प आहे.

# घुसखोरी केलेल्या 'तोयबा'च्या अतिरेक्याने केले हेअर ट्रान्सप्लान्ट

**श्रीनगर, १७ मे**

लष्कर-ए-तोयबासाठी दहशतवादी हल्ले घडवून आणण्याच्या उद्देशाने जम्मू-काश्मीरमध्ये घुसखोरी केलेल्या एका पाकिस्तानी दहशतवाद्याने कारवाया स्थगित केल्या आणि एक वैयक्तिक स्वप्न पूर्ण केले. ते म्हणजे हेअर ट्रान्सप्लान्ट सर्जरीचे.

दहशतवादी प्रशिक्षण छावण्यांमध्ये शिकवण्यात आलेल्या गोष्टींपेक्षा काश्मीरमधील जीवन पूर्णपणे वेगळे असल्याचे जाणवले. एका दुकानदाराकडून माहिती मिळाल्यानंतर त्याने श्रीनगरमध्ये हेअरलाईन रिस्टोरेशन करून घेतले, असे मोहम्मद उस्मान जट्ट उर्फ चायनीज नावाच्या अतिरेक्याने चौकशी अधिकाऱ्यांना सांगितल्याची माहिती पोलिसांनी रविवारी दिली.


या प्रकरणाचा तपास एनआयए करीत आहे. काश्मीर खोऱ्याच्या उत्तरेकडील भागातून जम्मू-काश्मीरमध्ये कसा प्रवेश केला तसेच त्याने कोणत्या ठिकाणी वास्तव्य केले, याविषयीची माहिती जट्टने चौकशीदरम्यान दिल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. भारतात हल्ले घडवण्याचा आदेश लष्कर-ए-तोयबाच्या सूत्रधारांनी दिल्यानंतर सीमा ओलांडून प्रवेश केला, असे जट्टने सांगितले. तो मूळचा लाहोरचा आहे.

जट्ट उत्तर आणि मध्य काश्मीरमधील अतिरेकी कारवायांत सहभागी होता. प्रशिक्षणादरम्यान दिलेल्या माहितीच्या एकदम विरुद्ध काश्मीरमधील दैनंदिन जनजीवन पाहिल्यानंतर उद्दिष्टे पूर्णपणे बदलली, असे त्याने चौकशीत सांगितले. दहशतवादी वर्तुळात चायनीज या टोपणनावाने ओळखल्या जाणाऱ्या जट्टला लष्कर-ए-तोयबाचा सर्वाधिक काळ जिवंत राहिलेला दहशतवादी अब्दुल्ला उर्फ अबू हुरेरा याच्यासह मागील महिन्याच्या सुरुवातीला श्रीनगर पोलिसांनी अटक केली. या दोघांवर जम्मू-काश्मीरबाहेर स्लीपर सेल उभारण्याची जबाबदारी देण्यात आली होती. या प्रकरणाचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील गांभीर्य लक्षात घेऊन, त्यानंतर हे प्रकरण एआयएकडे सोपवण्यात आले. श्रीनगरच्या वरच्या डोंगराळ भागात वास्तव्यास असताना त्याची ओळख जरगम आणि अब्दुल्ला उर्फ अबू हुरैरा या पाकिस्तानी दहशतवाद्यासोबत झाली होती. त्याने विविध लोकांकडे आश्रय घेतला होता. त्या सर्वांची माहिती जट्टने दिली. (वृत्तसंस्था)

# मराठा समाजासाठी माझ्या इतके कोणीही केले नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दावा; शेतकरी कर्जमाफीची तारीखही केली जाहीर!

**पुणे** : 'राज्य सरकारने मराठा समाजासाठीच्या कोणत्याही योजना बंद केल्या नाहीत. उलट त्या अधिक ताकदीने राबवण्यात येत आहेत. मराठा समाजासाठी मुख्यमंत्री म्हणून मी आणि एकनाथ शिंदे यांनी जेवढे काम केले, तेवढे महाराष्ट्राच्या इतिहासात कोणत्याही सरकारमध्ये झाले नाही,' असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केला.



पुणे ग्री हॅकेथॉनच्या सम रोप समारंभानंतर फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'मराठा समाजासाठी राज्य सरकारने विविध आर्थिक आणि शैक्षणिक योजना सुरू केल्या आहेत. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर उद्योजक, तर सारथीच्या माध्यमातून मराठा समाजातील तरुणांना प्रशासकीय सेवांमध्ये यश मिळावे म्हणून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, निर्वाह भत्ता आणि इतर योजनांच्या माध्यमातून मदत करण्यात येत आहे. मराठा समाजासाठीची कोणतीही योजना बंद करण्यात आली नाही. उलट त्या अधिक ताकदीने राबविण्यात येत आहेत.' मराठा आरक्षणाशी संबंधित प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेबाबत बोलताना फडणवीस म्हणाले, 'खूप प्रमाणपत्रे प्रलंबित आहे, असे नाही. नियमात बसणाऱ्या सगळ्यांनाच प्रमाणपत्रे दिली जात आहेत. त्याच्या वैधतेची प्रक्रिया मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार केली जाते. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयानेच समिती स्थापन केली असून, निकषही न्यायालयानेच ठरवले आहेत. त्यात हस्तक्षेप करता येत नाही. सातारा गॅझेटसंदर्भातील प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे न्यायालयाचा अवमान होणार नाही, यादृष्टीने कायदा व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार सरकार काम करत आहे.' दरम्यान, 'शेतकरी कर्जमाफीबाबत राज्य सरकारची तयारी अंतिम टप्प्यात आहे. यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या उपसमितीची बैठक झाली आहे. काही अतिरिक्त माहिती मागविण्यात आली असून, ती प्राप्त झाल्यानंतर प्रक्रिया सुरू केली जाईल. मात्र, ३० जूनपूर्वीच कर्जमाफी करण्यात येणार आहे,' असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना फडणवीस म्हणाले, 'आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे कांद्याची निर्यात होत नाही. बांगलादेश आणि आखाती देशांमध्ये आपला कांदा जात नाही. उत्पादन जास्त आणि खरेदीदार कमी असल्याने कांद्याच्या दरावर परिणाम झाला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने हस्तक्षेप करत १२ रुपये ५० पैसे प्रतिकिलो दराने कांदा खरेदी सुरू केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळत आहे.'

### राजू शेट्टींना टोला

माजी खासदार राजू शेट्टी यांनी अमली पदार्थांच्या वाढत्या समस्येवरून राज्य सरकारवर केलेल्या टिकेला फडणवीस यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, आपल्याला आकडे पाहायला मिळतात. पंजाबची स्थिती काय आहे, इतर राज्यांची स्थिती आणि महाराष्ट्राची स्थिती काय आहे ? त्यामुळे महाराष्ट्राला अशा पद्धतीने बदनाम करणे, हे राजू शेट्टींना शोभत नाही. अमली पदार्थ हे केवळ महाराष्ट्रासमोर नाही तर, संपूर्ण देशासमोरचे मोठे आव्हान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली देशभरात अमली पदार्थविरोधी मोहीम सुरू करण्यात आली असून, महाराष्ट्र त्यात अग्रणी आहे. हा लढा काही काळ द्यावा लागेल. मात्र, त्यात आपलाच विजय होईल,' असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

### राज्यात वीजेचा तुटवडा नाही

'राज्यात ऊर्जा संकट नाही. आवश्यकतेपेक्षा जास्त वीज उपलब्ध आहे. एखाद्या ठिकाणी ग्रीड फेल्युअर झाल्यानंतर काही तासांसाठी अडचण निर्माण होते. मात्र, संपूर्ण राज्यात वीजटंचाईची परिस्थिती नाही,' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराला 'अ' वर्ग पर्यटन क्षेत्राचा दर्जा : मुख्यमंत्री

**पुणे, १७ मे**

कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर संस्थानाला महाराष्ट्र राज्य सरकारकडून 'अ' वर्ग पर्यटन क्षेत्राचा दर्जा जाहीर करण्यात आला आहे. याबाबतची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्स माध्यमातून दिली. या निर्णयामुळे पुण्याच्या धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळणार असून, देश-विदेशातील भाविक आणि पर्यटकांसाठी विविध सुविधा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरवर्षी गणेशोत्सव काळात लाखो भाविक दगडूशेठ गणपतीच्या दर्शनासाठी पुण्यात दाखल होत असतात. मंदिराच्या भव्य सजावट, सामाजिक उपक्रम आणि धार्मिक परंपरेमुळे हे मंदिर राज्यासह देशभरात विशेष आकर्षणाचे केंद्र बनले आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे परिसरातील पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, पार्किंग, सुरक्षा आणि पर्यटन विकासासाठी अधिक निधी उपलब्ध होणार आहे.

**अ दर्जामुळे पुढील गोष्टी साध्य होणार**

- रस्ते, पार्किंग, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी यांसारख्या पायाभूत सुविधांचा विकास
- वाहतूक आणि दिशादर्शक फलकांची उभारणी
- परिसर सुशोभीकरण आणि स्वच्छता मोहिमा
- पर्यटन विकासासाठी विशेष निधीची उपलब्धता
- राज्य आणि देशपातळीवर पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्धी

(तभा वृत्तसेवा)

# 'नीट' परीक्षा पेपरफुटी प्रकरणी आता पालकांची चौकशी!






### सीबीआय पथकाची नांदेडमध्ये कारवाई

**मुंबई, दि. १७ मे -**

'नीट'परीक्षा पेपरफुटीचे धागेदोरे आता महाराष्ट्रात आणखी खोलवर पसरल्याचे समोर येत आहे. पुणे, नाशिक, अहिल्यानगर, लातूर आणि बीडनंतर आता केंद्रीय अन्वेषण विभागाने (उइख) आपला मोर्चा नांदेडकडे वळवला आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी शुभम खैरनार याच्याशी संबंधित असलेल्या नांदेडमधील एका कुटुंबाची सीबीआयच्या पथकाकडून कसून चौकशी सुरू आहे.

**'गेस पेपर्स'साठी मोजले लाखो रुपये?**

नाशिकमधून अटक करण्यात आलेला आरोपी शुभम खैरनार आणि नांदेडमधील एका कुटुंबाचे थेट कनेक्शन असल्याचे सीबीआयच्या तपासात समोर आले आहे. नांदेडच्या विद्युत नगर भागात राहणाऱ्या या कुटुंबाने 'नीट' परीक्षेचे लीक झालेले कथित 'गेस पेपर्स' खरेदी केल्याचा संशय यंत्रणेला आहे. या कुटुंबातील दोन मुले यंदा नीट परीक्षेची तयारी करत होती. रविवार सकाळपासूनच सीबीआयचे पथक या कुटुंबाच्या घरी ठाण मांडून असून, सदस्यांची कसून चौकशी केली जात आहे.

दुसरीकडे, या रॅकेटचे मूळ शोधण्यासाठी सीबीआयच्या दुसऱ्या एका पथकाने आरोपी शुभम खैरनारच्या पुण्यातील कार्यालयावर छापेमारी केली. मध्यस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत लीक झालेला पेपर कसा पोहोचवला गेला, याचा शोध सीबीआय घेत आहे.

**'एनटीए'च्या पॅनलवरील महिला तज्ज्ञ सीबीआयच्या ताब्यात**

या संपूर्ण प्रकरणाचे धागेदोरे थेट 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' च्या अंतर्गत यंत्रणेपर्यंत पोहोचले आहेत. सीबीआयने रविवारी दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टात आरोपी मनीषा गुरुनाथ मांढरे हिला हजर करून १४ दिवसांची कोठडी मागितली. मनीषा मांढरे ही 'एनटीए'च्या तज्ज्ञ समितीची सदस्य होती आणि तिने परीक्षेदरम्यान अनुवादक म्हणूनही काम केले होते.

**सीबीआयचा कोर्टात मोठा दावा**

एनटीएची संपूर्ण परीक्षा पद्धतच सध्या तपासाच्या फेऱ्यात आहे. आरोपी मनीषा मांढरे हिने पेपर लीक करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून मोठी रक्कम घेतल्याचे स्पष्ट झाले असून, या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांची चौकशी करणे अत्यंत गरजेचे आहे. संरक्षण पक्षाने या कोठडीला विरोध केला. मांढरे यांच्या घरातून कोणतीही जप्ती झालेली नाही आणि त्यांनी यापूर्वीच तपासात सहकार्य केले आहे, असा युक्तिवाद त्यांच्या वकिलांनी केला. मांढरे हिला मथुरेतील एका हॉटेलमधून ताब्यात घेण्यात आले होते.

**पुण्यात भरत होते 'स्पेशल कोचिंग' क्लासेस!**

एनटीएच्या पॅनलवर असल्याने आरोपी मनीषा मांढरेकडे बॉटनी आणि झूलॉजीच्या प्रश्नपत्रिकांची आधीच माहिती होती. याचा गैरफायदा घेत तिने पुढाकार घेऊन पुण्यात आपल्या राहत्या घरी काही निवडक विद्यार्थ्यांसाठी 'स्पेशल कोचिंग' घेतले होते. धक्कादायक बाब म्हणजे, या क्लासमध्ये तिने घेतलेले प्रश्न आणि प्रत्यक्ष नीट परीक्षेतील प्रश्न तंतोतंत जुळणारे होते, असा दावा सीबीआयने केला आहे. असाच प्रकार प्राध्यापक कुलकर्णी यानेही केल्याचे समोर आले आहे. कुलकर्णी गेल्या अनेक वर्षांपासून नीटच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनलवर मानद तज्ज्ञ म्हणून कार्यरत होता. त्याने एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात आपल्या घरी घेतलेल्या गुप्त क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांना जे प्रश्न आणि उत्तरे दिली, ती ३ मे रोजीच्या मुख्य परीक्षेशी 'हबेहूब' मॅच झाली. या एका सेशनसाठी विद्यार्थ्यांनी लाखो रुपये मोजल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

**देशभरात धाडसत्र: आतापर्यंत ९ जणांना बेड्या**

गेल्या २४ तासांत सीबीआयने देशभरात ६ ठिकाणी जोरदार छापे टाकले आहेत. या कारवाईत संशयित लॅपटॉप, बँक खात्यांचे स्टेटमेंट्स, मोबाईल फोन आणि अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. या हायप्रोफाइल घोटाळ्यात आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर येथून एकूण ९ जणांना अटक करण्यात आली असून, पुढील तपास वेगाने सुरू आहे.

### सरकारी अधिकाऱ्याची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

शनिवारी सीबीआयच्या तपासातून आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली. 'एनटीए'शी संबंधित असलेल्या एका बड्या सरकारी अधिकाऱ्याची भूमिकाही आता संशयाच्या भोवऱ्यात आहे. सीबीआयने कोर्टात सांगितले की, आरोपी मनीषा संजय वाघमारे आणि केमिस्ट्रीचे प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांनी एनटीएच्या एका अधिकाऱ्यासोबत संगनमत करून २७ एप्रिल रोजीच प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका मिळवल्या होत्या. ३ मे रोजी परीक्षा संपल्यानंतर पुराव्यांवर पाणी फिरवण्यासाठी केमिस्ट्रीच्या हाताने लिहिलेल्या प्रश्नपत्रिका नष्ट करण्यात आल्याचा आरोपही सीबीआयने केला आहे.



# उषा चव्हाण यांनी परत केले शासकीय पुरस्कार

**पुणे, दि. १७ मे -**

सोंगाड्या, पांडू हवालदार, पळवा पळवी अशा असंख्य सुपरहिट चित्रपटांमध्ये सदाबहार काम करणाऱ्या उषा चव्हाण यांनी त्यांच्या जीवनगौरव पुरस्कारासहित शासकीय पुरस्कार परत केला आहे. ठाण्यातील आनंद दिघे यांच्या आनंद आश्रम येथे त्यांनी हे पुरस्कार अर्पण केले आहेत. जमिनीच्या वादातून बिल्डर आणि पुणे पालिकेने त्यांची फसवणूक केल्याच्या आरोपातून त्यांनी असा निर्णय घेतला. याबाबत त्यांनी आज एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधला.

पुण्यातील धनकवटी सर्वे क्रमांक १३ या जमिनीबाबत उच्च न्यायालयाने निर्णय दिला असून या मालमत्तेच त्यांच्या मुलाचा म्हणजेच हृदयनाथ यांचा हिस्सा आहे. मात्र, पुणे महानगरपालिकेने चुकीच्या पद्धतीने टीडीआर मंजूर करून गोयल यांना परस्पर हिस्सा देऊन टाकला आहे, असा दावा उषा चव्हाण यांनी केला. याबाबत चौकशीकरता माझा मुलगा गेला असता त्याला अपमानास्पद वागणूक देण्यात आली, असंही त्यांनी सांगितलं. धनकवटी सर्वे नंबर १३ येथे काही नव्हतं, तिथे आम्ही शेती करत होतो. त्यानंतर तिथे बांधकाम झाले. सर्वे नंबर १३ मध्ये जागेचा डीटीआर आहे, परस्पर विकला गेला आहे. सर्व गुपित ठेवलं आहे. या लोकांनी परस्पर १०० टक्के टीडीआर देऊन टाकला आहे, असंही त्या म्हणाल्या. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून त्यांची भेटही घेणार आहेत. त्या मूळच्या शिवसैनिक असून त्यांना येथे नक्की न्याय मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**आनंद आश्रम आमच्यासाठी पवित्र जागा**

त्या पुढे म्हणाल्या, मी त्याला बोलले की आपण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे जाऊया. कारण हे खातं त्यांच्याकडे आहे. टीडीआर आमचा चोरला असून २२ वर्षे आम्ही लढतो आहे. मी माझ्या सासूबरोबर तिथे गहू बाजरी काढली आहे. काही लोकांनी आमचा हिस्सा आम्हाला दिला. पण आम्ही खोटं बोलतोय असं म्हटलं जातंय. आम्हाला खोटं बोलायचं असतं तर आम्ही येथे या पवित्र जागी आलोच नसतो. आमची सत्याची बाजू आहे.

# परिषदेतील उपस्थितीत उद्धव ठाकरे 'नापास'

## चार वर्षांत केवळ ३४ टक्के हजेरी | दोन सदस्यांची तीन सत्रांना दांडी

**मुंबई, १७ मे**



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मागील चार वर्षांत विधान परिषदेचे सदस्य म्हणून झालेल्या १३३ पैकी केवळ ४२ बैठकांनाच उपस्थिती लावली; तर दुसरीकडे, शिवसेनेच्या भावना गवळी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे रामराजे नाईक-निंबाळकर यांनी २०२४ पासून तीन अधिवेशनांना गैरहजर होते. त्यांची उपस्थिती केवळ ३४ टक्के आहे, असे उपलब्ध माहितीवरून स्पष्ट झाले.

याउलट राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल मिटकरी, शरद पवार गटाचे शशिकांत शिंदे आणि काँग्रेसचे राजेश राठोड यांनी विधान परिषद सदस्य म्हणून आपल्या कार्यकाळात ९० टक्क्यांपेक्षा जात उपस्थिती नोंदवली. उद्धव ठाकरे, अमोल मिटकरी आणि राजेश राठोड हे १३ मे रोजी कार्यकाळ संपलेल्या विधान परिषदेच्या नऊ सदस्यांपैकी आहेत.

२०२० मध्ये विधान परिषदेवर त्यांची निवड झाली. त्यावेळी त्यांच्यासोबत उपसभापती म्हणून कार्यभार सांभाळणाऱ्या नीलम गोऱ्हे, भाजपाचे नेते रणजितसिंह मोहिते-पाटील, रमेश कराड, गोपीचंद पडळकर आणि प्रवीण दटके यांचीही निवड झाली होती. २०२४ च्या राज्य निवडणुकांमध्ये विधानसभेवर निवडून आल्यानंतर कराड, पडळकर आणि दटके यांनी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिला.

उद्धव ठाकरे २०१९ मध्ये मुख्यमंत्री झाले आणि २०२० मध्ये त्यांनी विधान परिषदेत प्रवेश केला. महाराष्ट्र विधिमंडळाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार, २०२२ च्या पावसाळी अधिवेशनापासून झालेल्या १३३ बैठकांपैकी त्यांनी केवळ ४२ बैठकांना उपस्थिती लावली; हे प्रमाण ३१.५८ टक्के इतके आहे. २०२२ मध्ये मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर ठाकरेयांनी पावसाठी अधिवेशनाला केवळ एकदाच उपस्थिती लावली. परिषदेतील त्यांच्या अखेरच्या म्हणजेच २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील १६ पैकी त्यांनी केवळ चार बैठकांनाच हजेरी लावली.

शिवसेना आमदार भावना गवळी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे विधान परिषदेचे माजी उपसभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांनी विधिमंडळाच्या तीन अधिवेशनांमध्ये एकाही बैठकीला उपस्थिती लावली नाही. या उलट मिटकरी यांनी त्यांच्या सहा वर्षांच्या कार्यकाळात ९६.५० टक्के इतकी लक्षणीय उपस्थिती नोंदवली. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# काँगोमध्ये इबोला विषाणूचा उद्रेक

**८८ मृत्यू**

- युंगाडा, सुदानमध्ये सतर्कतेचे निर्देश, २४६ रुग्णांची प्रकृती गंभीर
- जागतिक आरोग्य संघटनेकडून आणिबाणी घोषित



**पहिल्यांदा १९७६ मध्ये आढळला रुग्ण**

जगभरात इबोला विषाणूने बाधित असलेला पहिला रुग्ण १९७६ मध्ये आफ्रिकेत समोर आला होता. त्यावेळी सुदान आणि तत्कालीन झैरे (आता डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो) मध्ये याची प्रकरणे आढळली होती. काँगोमध्ये ज्या भागात हा व्हायरस आढळला, त्याच्या जवळून वाहणाऱ्या इबोला नदीच्या नावावरून त्याला हे नाव देण्यात आले.

**दहा वर्षांपूर्वी ११ हजार नागरिकांचा मृत्यू**

२०१४ ते २०१६ दरम्यान पश्चिम आफ्रिकेत पसरलेला इबोला इतिहासातील सर्वात मोठा उद्रेक होता. या काळात ११ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता. लस आणि उपचार विकसित झाल्यामुळे परिस्थिती हाताळण्यास मदत झाली, परंतु वेगवेगळे स्ट्रेन समोर आल्याने आव्हान वाढते.

**इबोला कसा पसरतो?**



इबोला हा अत्यंत धोकादायक विषाणूमुळे होणारा आजार आहे. हा संसर्ग तसा दुर्मिळ असला तरी तो कमालीचा तीव्र आणि बहुतांश प्रकरणांमध्ये जीवघेणा ठरतो. संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या शरीरातील द्रव्यांच्या थेट संपर्कात आल्यामुळे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे वेगाने पसरतो. इबोलावर अद्याप कोणताही निश्चित किंवा खात्रीशीर उपचार उपलब्ध नाही. मात्र,संसर्गाला रोखण्यासाठी प्रभावी लस उपलब्ध आहे.

**जिनेव्हा, १७ मे**

कांगो आणि युगांडा या आफ्रिकन देशांमध्ये इबोला विषाणूने पुन्हा एकदा गंभीर रूप धारण केले आहे. काँगोच्या पूर्वेकडील इटुरी प्रांतात इबोला संसर्गामुळे २४ तासांत ८४ रुग्णांचा मृत्यू झाला, तर २४६ रुग्णांची प्रकृती गंभीर आहे. जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ)जागतिक आरोग्य आणीबाणी जाहीर केली आहे. तथापि हा आजार साथीच्या श्रेणीत येत नसल्याचे स्पष्ट केले आहे.

हा संसर्ग बंडिबुग्यो विषाणूमुळे पसरत असून, सध्यातरी याला जागतिक महामारी घोषित करण्याचे निकष लागू होत नसल्याचे डब्ल्यूएचओने निवेदनात नमूद केले आहे. काँगोचे आरोग्य मंत्री सॅम्युअल-रॉजर कंबा यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले, इबोला संसर्गामुळे २४ एप्रिल रोजी एका परिचारिकेचा मृत्यू झाला, त्यानंतर आठ रुग्णांना आजाराची लागण झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर रुग्णांचा आकडेवारी सातत्याने वाढत आहे. इबोलाच्या बुंडीबुग्यो स्ट्रेनच्य प्रकरणांची पुष्टी झाली आहे. गेल्या २४ तासांत ८४ रुग्णांचा मृत्यू झाला असून, २४६ जणांची प्रकृती गंभीर आहे. सध्या इटुरी प्रांतातील बुनिया, रवामपारा आणि मोंगवालू या भागांत सर्वाधिक रुग्ण आढळून आले. इटुरी प्रांताची राजधानी बुनिया येथे लोकांनी भीतीचे वातावरण आहे.

गेल्या एका आठवड्यापासून सतत मृत्यू होत आहेत. सुरुवातीला लोकांना हा कोणता आजार आहे हेच समजले नाही आणि त्यांनी दुर्लक्ष केल्याने रुग्णांत सातत्याने वाढ झाल्याचे कंबा म्हणाले. कांगोपाठोपाठ युगांडा, सुदान या शेजारी देशांमध्येही सतर्कतेचा इशारा दिला आहे. (वृत्तसंस्था)



बिहारमधील सारण जिल्ह्यात मस्तीचक येथे अदानी अखंड ज्योती आय केअर हॉस्पिटलची पायाभरणी रविवारी अदानी ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी केले. यावेळी अदानी फाऊंडेशनच्या अध्यक्ष प्रीती अदानी उपस्थित होत्या

## जम्मू-काश्मीरमध्ये ७३३ तस्करांना अटक

**श्रीनगर** : जम्मू आणि काश्मीरमध्ये २८ दिवसांत अमली पदार्थ तस्करीशी संबंधित ७३३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. ४७ तस्करांच्या घरावर बुलडोझर चालविण्यात आल्याची माहिती नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी दिली. गुन्हेगारांची हालचाल रोखण्यासाठी ३७३ तस्करांचा वाहन परवाना निलंबित करण्यात आला.

# मुंबई विमानतळावर १३ कोटींचे कोकेन जप्त

## तस्करीचा प्रयत्न हाणून पाडला



**मुंबई, १७ मे**

महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर अमली पदार्थांच्या तस्करीचा प्रयत्न हाणून पाडत २.६५९ किलो कोकेन जप्त केले. याची बाजारातील किंमत १३ कोटी रुपये आहे. या प्रकरणी दोन परदेशी प्रवाशांना अटक करण्यात आली आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे, इथिओपियाची राजधानी अदिस अबाबा येथून आलेल्या एका महिला प्रवाशाला थांबवण्यात आले. तपासणीदरम्यान, तिच्या सामानातून आठ लहान पाकिटांमध्ये लपवलेले १.५७५ किलो द्रव कोकेन जप्त करण्यात आले. आंतरराष्ट्रीय बाजारात त्याचे मूल्य अंदाजे ७.८७५ कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे. दुसऱ्या एका कारवाईत, आफ्रिकन वंशाच्या एका पुरुष प्रवाशाला अटक करण्यात आली. त्याने कोकेनने भरलेल्या कॅप्सूल गिळल्या होत्या. नंतर, त्याच्या शरीरातून ७० कॅप्सूल काढण्यात आल्या, ज्यातून १.०८४ किलो कोकेन जप्त करण्यात आले, ज्याची किंमत अंदाजे ५.४२ कोटी आहे. डीआरआयने दोन्ही प्रकरणांमध्ये मिळून एकूण २.६५९ किलो कोकेन जप्त केले, ज्याची किंमत १३.२९५ कोटी आहे. दोन्ही आरोपींना नारकोटिक ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस कायद्यांतर्गत अटक करण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. (वृत्तसंस्था)

# होर्मुझमधील जहाजांवरील हल्ले अस्वीकारार्ह

- संयुक्त राष्ट्रांत भारताने इराणला ठणकावले
- आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याची मागणी

**न्यूयॉर्क, १७ मे**

होर्मुझ सामुद्रधुनीत जहाजांवर होणार हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत. व्यापारी जहाजांना लक्ष्य करणे, नागरी कर्मचाऱ्यांचे जीवन धोक्यात घालणे आणि सागरी वाहतुकीत अडथळा आणणे हे पूर्णपणे अस्वीकारार्य असल्याची भूमिका मांडत इराणच्या कृतीवर भारताने नाराजी व्यक्त केली.



संयुक्त राष्ट्र संघाच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेच्या विशेष बैठकीला संबोधित करताना भारताचे स्थायी प्रतिनिधी, पी. हरीश यांनी पश्चिम आशियाई संघर्षाच्या पृष्ठभूमीवर ऊर्जा आणि खतांच्या संकटावर भारताची भूमिका मांडता हरीश म्हणाले, व्यापारी जहाजांना लक्ष्य करणे आणि नागरी कर्मचाऱ्यांचे जीवन धोक्यात घालणे हे अस्वीकारार्ह आहे.

इराणने सुरक्षित सागरी मार्गांशी संबंधित आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पूर्णपणे पालन केले पाहिजे. सध्याच्या संकटाचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी अल्पकालीन आणि संरचनात्मक उपाययोजना आवश्यक आहेत. जलमार्गातील वाहतुकीला अढथळा आणणे आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन असून, यामुळे जागतिक अर्थव्यवस्था संकटात येण्याचा धोका बळावला आहे. (वृत्तसंस्था)

# केंद्रीय राज्यमंत्र्यांच्या मुलाच्या अडचणीत वाढ

**भागीरथला परदेशात प्रवास करण्यास बंदी**

**हैदराबाद, १७ मे**

केंद्रीय गृह राज्यमंत्री संजय कुमार बंदी यांचा मुलगा कैदी भागीरथच्या अडचणी वाढतच चालल्या आहेत. पॉक्सो प्रकरणात अडकलेल्या भागीरथविरोधात सायबराबाद पोलिसांनी लुक-आऊट सर्क्युलर जारी केले आहे. तो देशातून पळून जाईल या भीतीने पोलिसांनी हे पाऊल उचलले आहे. एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपी भागीरथला पकडण्यासाठी सातत्याने छापे टाकले जात आहेत.

या प्रकरणात कैदी भागीरथला तेलंगणा उच्च न्यायालयाकडूनही मोठा धक्का बसला आहे. न्यायालयाने शुक्रवारी रात्री त्याच्या अटकपूर्व जामिनाच्या अर्जावर सुनावणी घेतली. भागीरथच्या वकिलाने न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत त्याच्या अटकेला अंतरिम स्थगिती देण्याची विनंती केली होती. तथापि, न्यायालयाने या टप्प्यावर त्याला अंतरिम संरक्षण देण्यास नकार दिला. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ‘आखरी सवाल’ची राष्ट्रपती भवनात स्क्रीनिंग




**मुंबई** : अभिनेता संजय दत्त याचा आगामी चित्रपट ‘आखरी सवाल’ सध्या जोरदार चर्चेत आला आहे. एका बाजूला या चित्रपटाचे राष्ट्रपती भवनात विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून, दुसऱ्या बाजूला युएईमध्ये चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी आल्याने वाद निर्माण झाला आहे. माहितीनुसार, हा चित्रपट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांच्या इतिहासावर आणि सामाजिक-राजकीय प्रवासावर आधारित आहे. भारतातील सेन्सॉर बोर्डाने चित्रपटाला युए १६+ प्रमाणपत्र देत प्रदर्शनास मंजुरी दिली होती. मात्र युएई सेन्सॉर बोर्डाने काही दृश्यांमध्ये बदल आणि कट्स सुचवले होते. निर्मात्यांनी हे बदल मान्य करण्यास नकार दिल्याने यूएईमध्ये चित्रपटाच्या प्रदर्शनाला परवानगी मिळाली नाही. या चित्रपटात संजय दत्तसोबत नमाशी चक्रवर्ती, अमित साध, समीरा रेड्डी आणि मृणाल कुलकर्णी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

### मी आयुष्यात कधीच स्क्रिप्ट वाचली नाही!

**मुंबई** : बॉलिवूडचा ‘सुल्तान’ सलमान खान याने भारतीय चित्रपटसृष्टीत एक असा दबदबा निर्माण केला आहे, ज्याच्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर कमाईचे अनेक नवनवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. सलमानचा चाहतावर्ग प्रत्येक पिढीत पाहायला मिळतो आणि तो स्वतःही लेखन प्रक्रियेत सक्रिय असल्याने, अनेकदा असे मानले जाते की तो कोणताही चित्रपट साइन करण्यापूर्वी त्याची स्क्रिप्ट अत्यंत बारकाईने वाचत असेल. परंतु, सलमान खानने नुकताच आपल्या काम करण्याच्या पद्धतीबद्दल एक अतिशय रंजक आणि धक्कादायक खुलासा केला आहे. त्याने सांगितले की, त्याने आपल्या संपूर्ण आयुष्यात आजपर्यंत कधीही कोणतीही स्क्रिप्ट स्वतः वाचलेली नाही. तो फक्त ऐकतो. मला कथा थेट लेखक किंवा दिग्दर्शकाकडून ऐकायला जास्त आवडते, असे सलमान म्हणाला.



### ‘कान्स’मध्ये मराठीचा डंका

**मुंबई** : फ्रान्समध्ये आयोजित होणाऱ्या अत्यंत मानाच्या अशा ‘कान्स फिल्म फेस्टिव्हल’ची क्रेझ जगभरात पाहायला मिळत आहे. या महोत्सवाच्या रेड कार्पेटवर दरवर्षीप्रमाणे यंदाही बॉलिवूडसह अनेक मराठी कलाकार आपली हजेरी लावत आहेत. अशातच, महाराष्ट्राची लाडकी अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने ‘कान्स फिल्म फेस्टिव्हल’च्या निमित्ताने फ्रान्समधून आपला पहिला खास व्हिडीओ चाहत्यांसोबत शेअर केला आहे. सोशल मीडियावर तिचा हा व्हिडीओ प्रचंड व्हायरल होत असून, यात प्राजक्तासोबत मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार एकत्र पाहायला मिळत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये यंदा मराठी चित्रपटांचा आणि कलाकारांचा मोठा दबदबा पाहायला मिळत आहे. या मंचावर मराठी संस्कृती आणि सिनेमाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ही दिग्गज मंडळी फ्रान्सला पोहोचली आहे.

# हजार वर्षे जुने ताम्रपट नेदरलॅण्ड्सने केले परत

## पंतप्रधान मोदींची माहिती, प्रत्येक भारतीयासाठी आनंदाचा क्षण



**हेम, १७ मे**

पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यादरम्यान, नेदरलँड्स सरकारने डच राजवटीत अनेक दशकांपूर्वी भारतातून घेतलेले चोल साम्राज्याचे ताम्रपट परत केले आहेत. हे ताम्रपट जिवंत दस्तऐवज मानले जाते आणि ते हजार वर्षांपूर्वीचे आहे. पंतप्रधान मोदी यांनी एक्सरील पोस्टमध्ये माहिती देताना म्हटले की, हा क्षण भारतीयांसाठी आनंद आणि अभिमानाचा आहे.

भारताच्या सांस्कृतिक वारशाचा आदर करत, नेदरलँड्स सरकारने चोल साम्राज्यातील १००० वर्षे जुना ताम्रपटांचा संच (लायडन प्लेट्स) भारताला परत केला आहे. भारत सरकार अनेक वर्षांपासून या दस्तऐवजांची मागणी करत होते. हे ताम्रपट ऐतिहासिकदृष्ट्या सर्वात मौल्यवान जिवंत दस्तऐवजांपैकी एक मानले जातात. प्रत्येक भारतीयासाठी हा आनंदाचा क्षण आहे.

११ व्या शतकातील चोल ताम्रपट नेदरलँड्समधून परत आणले जात आहेत. मी पंतप्रधान रॉब जेटेन यांच्या उपस्थितीत या सोहळ्याला उपस्थित होतो. ताम्रपटांमध्ये २१ मोठे आणि ३ लहान ताम्रपट आहेत. यावर जगातील सर्वात सुंदर भाषांपैकी एक असलेल्या तमिळ भाषेतील शिलालेख आहेत. हे ताम्रपट महान राजेंद्र चोल प्रथम यांनी त्यांचे वडील, राजा राजाराजा प्रथम यांना दिलेल्या तोंडी वचनाच्या औपचारिकतेशी संबंधित असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# दिल्ली विमानतळावर ५.५ कोटींचे सोने पकडले

**नवी दिल्ली, १७ मे**

सीमाशुल्क विभागाच्या एअर इंटेलिजन्स युनिटने इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सोन्याच्या तस्करीचे एक मोठे प्रकरण उघडकीस आणले आहे. अधिकाऱ्यांनी भारतीय वंशाच्या एका अमेरिकन नागरिकाला अटक केली आणि त्याच्याकडून ५.५ कोटींहून अधिक किमतीच्या ११५ सोन्याच्या विटा जप्त केल्या.

आरोपी सॅन फ्रान्सिस्कोहून एअर इंडियाच्या -४१७४ विमानाने आल्यावर तो ग्रीन चॅनलमधून बाहेर पडत असताना, संशयावरून सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी त्याला थांबवले आणि त्याची तपासणी केली असता, त्याच्या पॅन्टच्या आतल्या अस्तरामध्ये खास तयार केलेले गुप्त खिसे आढळले. त्यामध्ये २४-कॅरेटच्या साडेतीन किलोच्या ११५ सोन्याच्या विटा लपवलेल्या होत्या. (वृत्तसंस्था)

## घुसखोरीचा प्रयत्न उधळल्यानंतर पूंछमध्ये शोधमोहीम

**जम्मू, १७ मे**

जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात कार्यरत असलेल्या संशयित दहशतवाद्यांचा माग काढण्यासाठी सुरक्षा दलांनी अनेक भागांत शोधमोहीम सुरू केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

१२ मे रोजी मेंढर तालुक्यातील मानकोट भागात घुसखोरीचा प्रयन्त हाणून पाडण्यात आला आणि त्यात एक घुसखोर ठार झाला. त्यानंतर पूंछच्या विविध भागांत ही मोहीम सुरू करण्यात आली. (वृत्तसंस्था)

# सामूहिक बलात्कार, छळाला कंटाळून दोन बहिणींची आत्महत्या

**राजस्थानच्या जोधपूरमधील घटना**

**जयपूर, १७ मे**

राजस्थानमध्ये गेले अनेक वर्षे दोन बहिणींवर सामूहिक अत्याचार केले जात होते. या छळाला कंटाळून दोन्ही बहिणींनी आत्महत्या केली. पोलिसांकडे तक्रार करूनही त्यांच्याकडून न्याय न मिळाल्याने या दोन्ही बहिणींनी आयुष्य संपवले. जोधपूरमध्ये मन सुन्न करणारी ही घटना घडली.

पोलिसांच्या निष्काळजीपणावर आणि आरोपींवर कारवाई न केल्याचा आरोप मुलींच्या कुटुंबीयांनी केला आहे. पीडितांच्या वडिलांनी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी आणि दोषींना कडक शिक्षेची मागणी केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून इतर अनेकांची चौकशी सुरू आहे. लहान बहिणीने ११ एप्रिल रोजी केलेल्या तक्रारीत, तिच्या मोठ्या बहिणीला स्थानिक ई-मित्र सेवा केंद्र चालक महिपाल याने जाळ्यात ओढले होते आणि तिचे अश्लील व्हिडीओ रेकॉर्ड केले होते. तक्रारीत आठ जणांची नावे घेतली होती. या सर्वांवर बलात्कार केल्याचा आरोप केला होता. (वृत्तसंस्था)

## बांगलादेशी अधिकाऱ्यांचे पाकिस्तानात प्रशिक्षण

**ढाका, १७ मे**

बांगलादेशने वरिष्ठ नागरी सेवा अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी भारतातील मसुरी येथील लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीऐवजी पाकिस्तानमधील लाहोरची निवड केली आहे. भारत-बांगलादेश संबंधांमधील तणाव आणि पाकिस्तानसोबत वाढत्या जवळीकतेने हा निर्णय घेण्यात आल्याचे बोलले जात आहे.

बांगलादेशचे बारा वरिष्ठ अधिकारी सध्या लाहोर येथील नागरी सेवा अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत आहेत. बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील हा अशा प्रकारचा पहिलाच संघटित प्रशिक्षण कार्यक्रम आहे. प्रशिक्षणार्थींमध्ये अतिरिक्त सचिव आणि ११ सहसचिवांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# सिंधू जल करारावरील निकाल भारताने फेटाळला

- लवाद न्यायालयाची स्थापना बेकायदेशीर
- दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानला पाणी नाही

**नवी दिल्ली, १७ मे**

भारत-पाकिस्तानमध्ये झालेल्या करारानुसार भारताला सीमेवरील पाणी अडवू शकत नाही, असा निकाल हेग येथील लवाद न्यायालयाने शनिवारी दिला. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने न्यायालयाचा निकाल फेटाळून लावला.



लवाद न्यायालयाची स्थापना बेकायदेशीर असून, भारताला निकाल अमान्य आहे. पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देण्याचे धोरण जोपर्यंत कायम आहे, तोपर्यंत सिंधू जल करार स्थगित राहणार आणि सीमापार जाणारे पाणी अडवण्याचा भारताला पूर्ण अधिकार असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी निवेदनात म्हटले आहे. लवाद न्यायालय बेकायदेशीर असून सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा भारताचा निर्णय कायम राहील. तथाकथित न्यायालयाने कमाल पाणी साठवण या मुद्द्यावर दिलेला निकाल भारताला कोणत्याही परिस्थितीत मान्य नाही. जोपर्यंत पाकिस्तान सीमापार दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवत नाही, तोपर्यंत हा करार स्थगित राहणार आहे. भारताने या तथाकथित लवाद न्यायालयाची स्थापना कधीही स्वीकारली नव्हती. या न्यायालयाने दिलेली कोणतीही कार्यवाही, निर्णय किंवा निकाल पूर्णपणे रद्दबातल आहे. जयस्वाल यांनी पुनरुच्चार केला की, पूर्वीच्या सर्व निर्णयांप्रमाणेच, हा नवीन निर्णय देखील पूर्णपणे अस्वीकारार्य आहे. (वृत्तसंस्था)

**राष्ट्रीय हिताला सर्चौच्च प्राधान्य**



सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा निर्णय प्रभावी राहणार आहे. भारताने या मुद्यावर आपली भूमिका आधीच स्पष्ट केली आहे. राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य असून कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे जयस्वाल यांनी निवेदनात म्हटले आहे. देशाच्या सार्वभौमत्व आणि राष्ट्रीय हिताशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही बाह्य किंवा बेकायदेशीर व्यवस्था स्वीकारली जाणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# जलसंवाद आणि टीआरपीच्या पल्याडचे गडकरी

भारतीय राजकारणात 'विकास' हा शब्द फारच वापरला जातो. आताशः तर तो इतका वापरला जातो की, तो पोकळ वाटू लागतो. रुंद रस्ते, उंच पूल, चकचकीत इमारती, भव्य प्रकल्प, प्रेझेंटेशन्स, जाहिराती आणि उद्घाटने यांनाच विकास मानण्याची पद्धत आहे. पण, या झगमगाटाच्या मागे वेगळाच भारत दडलाय. भेगाळलेली जमीन, कोरड्या विहिरी आणि जलस्रोत, नापिकी, कर्जाच्या डोंगराखाली दबलेला शेतकरी, मोसमात आकाशाकडे पाहत पावसाची प्रतीक्षा करणारी गावे आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या... या भारताकडे फार कमी लोकांचे लक्ष जाते. कारण या भारताकडे ग्लॅमर नाही. कॅमेऱ्यांना भावणारी दृश्ये नाहीत. त्यामुळे त्यांना टीआरपीही नाही. इथे मातीचा गंध आहे, घाम आहे, वेदना आहेत. म्हणूनच जेव्हा एखादा नेता या प्रश्नांमध्ये स्वतःला गुंतवतो आणि त्यांच्यावर तोडगे काढण्यासाठी झटतो, तेव्हा त्याचे वेगळेपण जाणवते. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे त्या नेत्याचे नाव. शेती, पाणी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेबद्दल त्यांना अपार ओढ आहे. यंदा रौप्य महोत्सव साजरा करीत असलेली पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था हा त्याच ओढीचा विस्तार. विदर्भातील पाण्याचा प्रश्न समजून घेतल्याशिवाय पूर्ती सिंचन संस्थेच्या कामाचे महत्त्व समजणार नाही. विदर्भात पाऊस पडत नाही, असे नव्हे. पाऊस पडतो. मात्र, पावसाचे पाणी टिकत नाही. ते वाहून जाते. जमीन ते धरून ठेवत नाही. नद्या भरून वाहतात आणि काही महिन्यांत कोरड्या पडतात. भूजल खाली जात राहते. उन्हाळ्यात गावांचा जीव टँकरच्या भरवशावर लागलेला असतो. शेतकरी आणि शेती आभाळाकडे डोळे लावून असते. पावसाने दगा दिला की सारे गणित बिघडते. तामसवाडा पॅटर्न याच वास्तवाची पृष्ठभूमी लक्षात घेऊन जन्माला आला होता पंचवीस वर्षांपूर्वी. जलसंधारण ही संकल्पना नवी नव्हती; पण तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. भौगोलिक अभ्यास करून वाहून जाणारे पाणी अडवायचे, जमिनीत मुरवायचे, जलसाठे निर्माण करायचे, भूजल वाढवायचे आणि हे सारे करताना गावाला सहभागी करून घ्यायचे असे त्याचे स्वरूप. या प्रयोगाचे यश अनेकांनी पाहिले. देश-विदेशातही त्याची चर्चा झाली. ज्या भागात उन्हाळ्यात पाण्यासाठी हंबरडा फोडावा लागायचा, तिथे शेतीत बदल दिसू लागला. विहिरींमध्ये पाणी वाढले. पिकांची पद्धत बदलली. शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आशेचा बहर परत आला. हा चमत्कार नव्हता. हा नियोजनाचा परिणाम होता. भारतात अनेक संकटे संसाधनांच्या अभावामुळे नव्हे तर नियोजनाच्या अभावामुळे येतात, हे यातून सिद्ध झाले. तामसवाडा पॅटर्न हा अशी आशा दाखविणारा पॅटर्न ठरतो तो त्यामुळेच.

भारत नद्यांचा आणि मान्सूनचा देश. तरीही तो पाण्यासाठी हवालदिल होतो. कारण आपण पाण्याला संसाधन म्हणून वापरले; पण संस्कृती म्हणून जपले नाही. पूर्वी भारतातील गावांकडे स्वतःची जलव्यवस्था होती. तलाव होते. पारंपरिक पाणवठे होते. पाणी साठविण्याच्या पद्धती होत्या. गावांचे भूगोल, वर्षभराचे नियोजन आणि जलव्यवस्था एकमेकांशी जोडलेले होते. त्यावर गावांची सरबराई अवलंबून असे. आधुनिकतेच्या नादात आपण ते सारे मोडून टाकले. गावांतील पाणवठे संपले. शहरांनी नद्या आणि नाले गिळले. काँक्रीटने जमिनींना श्वास रोखला. पावसाचे पाणी जमिनीत मुरेनासे झाले. आपण विकास केला; पण निसर्गाच्या भाषेत तो विध्वंस ठरला. या सगळ्याचा सर्वांत मोठा फटका शेतीला बसला आहे. भारतातील शेती अजूनही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. त्याला विदर्भ किंवा कोणताही टंचाईग्रस्त भाग अपवाद राहू शकत नाही. हवामान बदलामुळे परिस्थिती आणखी अनिश्चित झाली आहे. पाऊस कधी अतिवृष्टी घेऊन येतो, तर कधी गायब होतो. शेतकरी पिकांचे नियोजन करू शकत नाही. एका बाजूला खर्च वाढत असतो. दुसऱ्या बाजूला बाजारात भाव मिळत नाही. त्यातून कर्ज वाढते. आणि मग विदर्भाच्या कोणत्या तरी कोपऱ्यात शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची बातमी येत असते. कधी आठवड्याला, कधी दिवसाआड...दिवाळीच्या काळात तर जवळजवळ दररोज!

आत्महत्या करणारा शेतकरी या व्यवस्थेच्या छाताडावर मोठा व्रण सोडून जातो. तो एखाद्या मुलाचा बाप असतो. एखाद्या वृद्ध आईचा आधार असतो. एखाद्या स्त्रीचे सौभाग्य असतो. गडकरींनी विदर्भ जवळून पाहिला आहे. त्यांना ही वेदना कळते. म्हणूनच शेतीचे अर्थकारण बदलले पाहिजे, हा त्यांचा आग्रह आहे. शेतकरी केवळ अन्नदाता राहू नये, तो ऊर्जादाता झाला पाहिजे, हा त्यांचा ध्यास आहे. इथेनॉलविषयीचा किंवा बाजारात मागणी असलेली पिके घेण्यासाठीचा त्यांचा आग्रह त्यातूनच आला. ऊस, मका, बांबू, जैविक कचरा यापासून इथेनॉल तयार करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवा आधार का देऊ नये, हा विचार त्यांनी सातत्याने मांडला. काही प्रयोग करूनही दाखविले. ॲग्रो व्हिजन ही प्रदर्शनी त्याच विचारातून उभी राहिली. नागपुरात गेल्या दीड दशकांपासून भरत असलेले हे प्रदर्शन आता भारतातील कृषी क्षेत्रासाठी मोठे व्यासपीठ बनले आहे. तिथे शेतीचे भविष्य दिसते. आधुनिक यंत्रसामुग्री, प्रक्रिया उद्योग, जलव्यवस्थापन, जैवऊर्जा, नवे संशोधन, बाजारपेठ सगळे एकत्र येते. शेतकऱ्याला जग बदलत असल्याची जाणीव होते. या पृष्ठभूमीवर १७ आणि १८ मे रोजी पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या जलसंवाद आणि जलक्रांती परिषदांकडे पाहिले, तर त्यांचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. या परिषदांमध्ये देशभरातील जलतज्ज्ञ, पद्म पुरस्कार विजेते कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था, अधिकारी, लोकप्रतिनिधी सहभागी होत आहेत. भारताच्या जलभविष्यावर आणि त्यातही शेतीच्या महत्त्वाच्या समस्येसंदर्भात समग्र चर्चा करण्यासाठी गडकरींनी हे व्यासपीठ निर्माण केले आहे. भविष्यातील युद्धे पाण्यासाठी होतील, असे म्हटले जाते. भारतासारख्या लोकसंख्या प्रचंड असलेल्या देशात हे संकट अधिक गंभीर आहे. पाणी संपले तर फक्त शेतीच संपणार नाही; समाजाचे संतुलनही बिघडेल. ग्रामीण भारत उद्ध्वस्त झाला, तर शहरांचे वैभवही टिकणार नाही. अन्न निर्माण करणारा हातच कमकुवत झाला तर अर्थव्यवस्थेची इमारत डळमळेल. आज अनेक राजकीय नेत्यांची ऊर्जा प्रतिमा उभी करण्यात खर्ची पडते. सोशल मीडियावर ट्रेंड होण्यात, मोठमोठे इव्हेंट्स करण्यात, घोषणांचा पाऊस पाडण्यात आपले राजकारण अडकले आहे. अशा काळात जलसंधारणासारख्या विषयासाठी देशभरातील लोकांना एकत्र आणणे, परिषदांचे आयोजन करणे, शेतकरी आणि पाण्याच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणणे यात गडकरींच्या नेतृत्वाचे वेगळेपण दिसते. या परिषदांचे खरे महत्त्व पुढील काळात दिसेल. कारण भारताला जलव्यवस्थापन ही राष्ट्रीय चळवळ बनवावीच लागेल. दुसरा पर्याय नाही. सरकार हे काम एकट्याने करू शकणार नाही. शहरे-गावे अशा साऱ्यांना पुढे यावे लागेल. पाण्याचा वापर सांभाळून करावा लागेल. पाण्याचे नियोजन करावे लागेल. शेतीचे स्वरूप बदलावे लागेल. ठिबक सिंचन, मायक्रो इरिगेशन, जलपुनर्भरण, सांडपाण्याचा पुनर्वापर, पीक पद्धतीतील बदल या सगळ्यांचा गंभीर विचार करावा लागेल. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पाण्याकडे पाहण्याची मानसिकता बदलावी लागेल. आपण अजूनही पाण्याला अमर्याद संसाधन समजतो. ते चुकीचे आहे. प्रत्येक थेंबाचे अर्थकारण समजून घ्यावे लागेल. भारताच्या भविष्याची खरी लढाई शेती आणि पाण्यासाठी असेल. देश फक्त शहरांमुळे उभा राहत नसतो. तो गावांमुळे, शेतीमुळे, शेतकऱ्यांमुळे उभा राहत असतो आणि त्यांच्यामुळेच टिकतो. त्यांच्या अधिष्ठानी पाणी असते. म्हणूनच जलसंवाद आणि जलक्रांती परिषदांसारख्या उपक्रमांचे महत्त्व खूप मोठे आहे. बहुतेक राजकारण्यांचे प्राधान्यक्रम बदललेले असताना नितीन गडकरींसारखा राष्ट्रीय पातळीचा नेता टीआरपीच्या पल्याड जातो आणि शेतकऱ्यांच्या कल्याणाचा असा विचार करतो, ही अपूर्वाई आहे आणि इतर नेत्यांसाठी ती अनुकरणीय आहे, एवढेच यानिमित्ताने सांगावेसे वाटते.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# ५२ वर्षांपूर्वी...!

आज १८ मे २०२६! ५२ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी १८ मे १९७४ च्या सकाळपासूनच तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी अस्वस्थ होत सतत आपल्या घडाळ्याकडे पाहत होत्या. १, सफदरजंग रोड या आपल्या निवासस्थानातील दिवाणखाण्यात येरझाऱ्या मारताना त्यांची नजर तेथे असलेल्या दूरध्वनीकडे जात होती. आणि सकाळी ८ वाजून २२ मिनिटांनी हा दूरध्वनी खणखणला. दूरध्वनी त्यांच्या सहायकाने नाही तर त्यांनी स्वत: उचलला होता. पलीकडून देण्यात येणारी माहिती ऐकताना त्यांचा चेहरा फुलला होता. चेहऱ्यावरील सारा तणाव नाहीसा झाला होता. भारताने केलेली अणुचाचणी यशस्वी ठरली होती.

**प्लुटोनियमचा वापर :** अमेरिका-इराण युद्धात युरेनियमची भरपूर चर्चा केली जात आहे. इराणजवळ ४४० किलो युरेनियम असून ते ११ बॉम्ब बनविण्यासाठी पुरेसे आहे असे म्हटले जाते. म्हणजे एका अणुबॉम्बसाठी साधारणत: ४० किलो युरेनियमची आवश्यकता सांगितली जाते. विशेष म्हणजे भारताने आपल्या पहिल्या अणुचाचणीसाठी युरेनियम न वापरता प्लुटोनियम-२३९ चा वापर केला होता. ही धातू युरेनियमपेक्षा अधिक उच्च दर्जाची मानली जाते. हे तंत्रज्ञान भारताने विकसित केले होते. मात्र यासाठी आवश्यक असलेले आणखी काही तंत्रज्ञान अमेरिका व कॅनडा यांच्याकडून आयात केलेल्या यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने विकसित करण्यात आले होते. भारताची पहिली अणुचाचणी ८-१० किलो टन क्षमतेची होती. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने नागासाकीवर टाकलेला 'फॅट मॅन' नावाचा अणुबॉम्ब याच क्षमतेचा होता.

**१९७१ चा परिणाम :** १९७४ मध्ये इंदिरा गांधींनी अणुचाचणी करण्याचे मुख्य कारण होते १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध. युद्ध सुरू करण्यापूर्वी इंदिरा गांधींनी चिनी नेत्यांकडून चीन या युद्धात तटस्थ राहील असे आश्वासन मिळविले होते. सोवियत युनियन म्हणजे आताचा रशिया भारताच्या बाजूने होता. अमेरिका मात्र पाकिस्तानच्या बाजूने होती आणि युद्ध सुरू झाल्यावर अमेरिकेने आपले सातवे आरमार 'यूएसएस इंटरप्रायझेस' पाकिस्तानच्या मदतीसाठी पाठविले होते. पण, ते तेथे पोहोचण्यापूर्वीच पाकिस्तानचा पराभव झाला होता. युद्ध संपले होते, पाकिस्तानने शरणागती पत्करली होती. आंतरराष्ट्रीय शक्तींचा विचार करून इंदिरा गांधींनी भारताला अणुसज्ज करण्याचा निर्णय घेतला होता आणि त्याची परिणती ५२ वर्षांपूर्वी आज करण्यात आलेल्या पोखरणच्या पहिल्या अणुचाचणीत झाली.

**भाभा यांची हत्या? :** इस्रायलने मागील काही वर्षांपासून इराणला अण्वस्त्रसज्ज होण्यापासून रोखण्यासाठी इराणच्या अनेक अणुशास्त्रज्ञांची हत्या करविली. आणि इस्रायलने ही बाब कधीही लपवून ठेवली नाही. भारताचा अणु कार्यक्रम रोखण्यासाठी अणुऊर्जा आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. होमी भाभा यांची हत्या करण्यात आली असे मानले जाते. डॉ. भाभा यांचे विमान कोसळून त्यांचा मृत्यू झाला होता. पण, याने भारताचा अणुकार्यक्रम काही थांबला नाही.

**केवळ तीन महिन्यांनंतर :** 'भारत १८ महिन्यांत अणुबॉम्ब तयार करू शकतो' असे विधान डॉ. भाभा यांनी केल्यानंतर केवळ तीन महिन्यांत एका विमान अपघातात त्यांचे निधन झाले. सर्वप्रथम अमेरिकेने १९४५ मध्ये अणुचाचणी केली. नंतर १९६४ च्या आसपास सोवियत युनियन व चीन यांनीही अणुचाचणी केली. आता भारतही अणुचाचणीच्या जवळ पोहोचला आहे हे लक्षात आल्यानंतर सीआयएने डॉ. भाभा यांना संपविण्याचा निर्णय घेतला असे मानले जाते. एका आंतरराष्ट्रीय अणु परिषदेसाठी व्हिएन्नाला जात असताना एअर इंडियाचे 'कांचनजंगा' हे विमान आल्प्स पर्वतावर कोसळले होते.

**रावांचा प्रयत्न :** १९९१ मध्ये सत्तेवर आलेल्या नरसिंहरावांनी १९९५ च्या डिसेंबरात पोखरणमध्ये दुसरी अणुचाचणी करण्याचा निर्णय घेतला होता. ही चाचणी आण्विक शस्त्रांसाठी केली जाणार होती. पण, याचा उद्देश मात्र राजकीय होता. लोकसभा निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपली होती. राव सरकारची प्रतिमा भ्रष्टाचारांच्या आरोपांनी काळवंडली होती. त्या प्रतिमेस उजळ करण्यासाठी रावांनी अणुचाचणीचा निर्णय घेतला होता असे मानले जाते. पण, त्यांचे नशीब आडवे आले. अमेरिकेच्या उपग्रहांनी पोखरणमध्ये सुरू असलेल्या हालचालींची दृश्ये टिपली. आणि राष्ट्रपती बिल क्लिंटन यांनी रावांना दूरध्वनी करून चाचणी न करण्याचा 'सल्ला' की दम दिला. काहींच्या मते अमेरिकेला या चाचणीची कल्पना पंतप्रधान कार्यालयातील एका अधिकाऱ्याने दिली होती. ऐनवेळी आलेल्या या दबावाने रावांनी अणुचाचणीचा विचार सोडून दिला. भारताच्या अणुचाचणीची माहिती अमेरिकेला देणारा अधिकारी कोण होता याची चर्चा नंतर होत होती आणि पंतप्रधानांचे मुख्य सचिव नरेशचंद्रा यांचे नाव यासंदर्भात घेतले जात होते. पंतप्रधान कार्यालयातील अमेरिकेचे हस्तक अशीच चर्चा नरेशचंद्रा यांच्या संदर्भात केली जात होती.

**वाजपेयींचा निर्णय :** भारताला अणुसज्ज करण्याचे भाग्य लाभले ते स्व. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींना. १९९८ च्या मे महिन्याच्या ११ व १३ तारखांना पोखरणमध्ये भारताने दुसरी अणुचाचणी केली आणि भारत अण्वस्त्रसंपन्न झाला. वाजपेयींचा हा निर्णय अतिशय गोपनीय ठेवण्यात आला होता. त्याची कल्पना काही निवडक शास्त्रज्ञांव्यतिरिक्त फक्त चार- पाच नेत्यांना होती असे मानले जाते. भारताच्या या अणुचाचणीनंतर पाकिस्ताननेही लवकरच अणुचाचणी केली.

**सर्वाधिक रशियाजवळ :** जगातील ९ देशांजवळ अण्वस्त्रे असून यात रशियाजवळ सर्वाधिक म्हणजे ४३०९ अण्वस्त्रे असल्याचे सांगितले जाते. अमेरिका ३७०० अण्वस्त्रांसह दुसऱ्या तर चीन ६०० अण्वस्त्रांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. फ्रान्स व ब्रिटनजवळही प्रत्येकी ३०० अण्वस्त्रे असल्याचे सांगितले जाते. भारताजवळ १८० तर पाकिस्तानजवळ १७० अण्वस्त्रे असल्याचा अंदाज आहे. इस्रायलजवळ ९० तर उत्तर कोरियाजवळ ५० अण्वस्१ असल्याचे म्हटले जाते. इराणजवळ ज्या ४४० किलोग्रॅम युरेनियमची चर्चा केली जाते, त्याचा उपयोग करून ११ अण्वस्त्रे तयार केली जाऊ शकतात. आणि या ११ प्रस्तावित अण्वस्त्रांवरून अमेरिका- इराण यांच्यात एक मोठे युद्ध सुरू झाले.

इराणजवळ असलेले ४४० किलोग्रॅम युरेनियम त्याने अमेरिकेच्या स्वाधीन करावे अशी अमेरिकेची मागणी आहे, जी इराणने फेटाळून लावली आहे. एक दुर्दैवी भाग म्हणजे आजवर फक्त एकदाच अणुबॉम्बचा वापर झाला आहे आणि तो अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर केला आहे. 'प्रोजेक्ट मॅनहटन' या सांकेतिक नावाने अमेरिकेने आपला अणुबॉम्ब बनविला होता तर भारताच्या अणुचाचणी कार्यक्रमाचे सांकेतिक नाव होते स्मायलिंग बुद्धा.

**महाकाय अण्वस्त्र :** एकीकडे अमेरिका इराणच्या आण्विक कार्यक्रमाला लगाम घालण्याच्या प्रयत्नात असताना, दुसरीकडे रशियाने आजवरच्या सर्वांत मोठ्या अण्वस्त्राची चाचणी केल्याचे वृत्त समोर आले आहे. आरएस-२८ सरमात या नावाने ओळखले जाणारे हे अण्वस्त्र १० ते १८ हजार किलोमीटर पल्ल्याचे आहे. लांबी ११० फूट, १० फूट व्यास आणि २०८ टन वजन असलेल्या या अवस्त्राची क्षमता एकाचवेळी १६ अणुबॉम्ब वाहून नेण्याची आहे. अतिशय वेगवान गती व सर्व प्रकारच्या रडार यंत्रणांना चकमा देण्याची क्षमता असलेले हे अण्वस्त्र रशियाच्या भात्यातील सर्वांत मोठे हत्यार ठरणार आहे. रशियाच्या या चाचणीनंतर, मागील काही वर्षांपासून गोठलेली अण्वस्त्रस्पर्धा पुन्हा सुरू होणार काय हा प्रश्न पुन्हा विचारला जाऊ लागला आहे. तसे झाल्यास जगासाठी, मानवतेसाठी ते एक मोठे संकट ठरणार आहे.

## वेध

विजय कुळकर्णी

# बालसंस्कार शिबिरांमधून मूल्यशिक्षण!

अगदी बालवयापासूनच मुलांवर सुसंस्कार झाले पाहिजेत, असे म्हणतो. या विचारातूनच बालसंस्कार शिबिरांचे आयोजन करणे सुरू झाले. बालसंस्कार शिबिरातूनच मुलांवर लहानपणापासूनच भारतीय संस्कृती, नैतिकता आणि चारित्र्य घडवण्याचे संस्कार केले जातात. यालाच मूल्यशिक्षण असे म्हटले जाते. या शिबिरांमध्ये विविध नीतिमूल्यांचे धडे दिले जातात. मोठ्यांचा आदर करणे, त्यांना नमस्कार करणे आणि नम्रतेने बोलणे, शिस्त आणि वेळेचे पालन करणे, नेहमी खरे बोलणे, प्रामाणिकपणा, धैर्य आणि दयाळूपणा या गुणांचा विकास करणे, व्यसनांपासून दूर राहून शरीर कमवण्यावर भर देण्यात येतो. सोबतच श्लोक, स्तोत्रे आणि मंत्रपठन वदवून घेतले जातात. त्यामुळे स्मरणशक्ती वाढते. ध्यान, योग आणि प्राणायाम यांचा सराव करून मनःशांती मिळवणे. भारतीय सण आणि त्यामागील आध्यात्मिक अर्थ समजावून सांगण्यात येतो. छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ, स्वामी विवेकानंद आणि थोर संतांच्या गोष्टी सांगून राष्ट्रप्रेमाची भावना रुजविली जाते. या गोष्टींसोबतच स्वच्छता आणि आरोग्यदायी सवयी, पर्यावरण संवर्धन आणि निसर्गाशी मैत्री करणे याही गोष्टींचे धडे बालसंस्कार शिबिरातून दिले जातात. अशी शिबिरे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करतात आणि त्यांना एक आदर्श नागरिक म्हणून घडवतात.



अनेक जण म्हणतील की, हे सर्व घरी किंवा शाळेतच शिकविले जाते. त्यासाठी बालसंस्कार शिबिरांची गरज काय? तर, याचे उत्तर असे आहे की, हल्ली लहान मुले देखील व्हिडीओ गेम, सोशल मीडियावर तासन्तास खिळून राहतात. त्यामुळे मुलांचे मैदानी खेळ खेळणे जवळपास बंदच झाले आहे. परिणामी अगदी लहान वयातच मुलांना मधुमेहासारखे आजार जडतात. ते विविध नेत्ररोगाने त्रस्त होतात. त्यांचा स्थूलपणा वाढतो. प्रत्येक वेळी कॅलक्यूलेटर व तत्सम गॅझेटचा वापर केल्याने मुलांची स्मरणशक्ती, विचार करण्याची शक्ती व निर्णयक्षमता कमी होत आहे. हे अत्यंत घातक आहे. त्यासाठी मुलांनी मैदानावर खेळणे, मेंदूला चालना मिळणारे, निर्णयक्षमता वाढविणारे खेळ खेळणे आवश्यक आहे. हे सर्व खेळ संस्कार शिबिरात शिकविले व खेळले जातात. तसेच, आजच्या युवा पिढीमध्ये व्यवसनाधीनता वाढली असल्याचे बोलले जाते. मोठ्या शहरात रेव्ह पार्टीवर पोलिसांची धाड पडल्याचे व त्यात मोठ्या संख्येत पकडण्यात आलेल्या युवक-युवतींकडून अमली पदार्थ हस्तगत केल्याच्या बातम्या आपण नेहमी वर्तमानपत्रातून वाचतो. त्यामुळे मुला-मुलींचे लग्न जुळविताना ते व्यसनाधीन तर नाही ना, याची खातरजमा केली जाते. ग्रामीण भागातही व्यसनाचे लोण पसरले आहे. त्यामुळे मुलांवर सुसंस्कार करण्याची किती नितांत आवश्यकता आहे, हे स्पष्ट होते. बालसंस्कार शिबिरातून व्यसनमुक्तीचे धडे दिले जातात. लहानपणापासूनच मनोरंजनासोबतच अध्यात्माचे शिक्षण मिळाल्याने अनेक युवक-युवती व्यसनमुक्त झाल्या आहेत. विदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित असलेले श्री गुरुदेव सेवा मंडळ गावागावांत बालसंस्कार शिबिरांचे आयोजन करते. तसेच रा. स्व. संघाच्या माध्यमातूनही विविध प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून मुलांवर बालवयातच योग, प्राणायाम, व्यायाम, राष्ट्रभक्ती, पर्यावरण रक्षण, निसर्गप्रेम, आरोग्यदायी सवयी व अध्यात्माचे संस्कार केले जातात. याप्रसंगी आईचा कान तोडणाऱ्या चोराची गोष्ट आठवली. एक चोर लहानपणापासूनच चोरी करायला शिकला. तो चोरी करून त्याच्या आईला पैसे आणून द्यायचा. त्याच्या आईने त्याला कधीही चोरी करण्यापासून परावृत्त केले नाही. तिने त्याचे सतत कौतुकच केले. मोठा झाल्यावर तो अट्टल गुन्हेगार झाला. एक दिवस तो पकडला गेला. त्याला कठोर शिक्षा झाली. त्यानंतर त्याला त्याच्या कर्माचा पश्चात्ताप झाला. एक दिवस त्याची आई त्याला भेटायला तुरुंगात गेली असता, त्याने त्याच्या आईच्या कानाचा चावा घेतला. त्याने असे का केले, असे त्याला विचारले असता, तो म्हणाला की, लहानपणीच जर माझ्या आईने मला चोरी करण्यापासून रोखले असते तर, आज मला एवढी कठोर शिक्षा भोगावी लागली नसती. यावरून बालपणीच आपल्या मुलांवर चांगले संस्कार होणे आवश्यक आहे आणि यासाठी बालसंस्कार शिबिरांचे किती महत्त्व आहे हे अधोरेखित होते.

८८०६००६१४९

## कानोसा

अमोल पुसदकर

# सरस्वती भगवती

जगामध्ये असा कोणता देश नाही, जो त्या देशावर आक्रमण करणाऱ्या आक्रमकांनी उभी केलेली चिन्हे, प्रतीके काढून टाकत नाही किंवा नष्ट केलेल्या इमारती, शिल्प पुन्हा उभारत नाही. कदाचित भारत याला अपवाद असेल. भारतावर अनेक शतकांपासून परकीय आक्रमकांच्या टोळधाडी आलेल्या आहेत. त्यांनी इथल्या संपत्तीचे, वास्तूंचे, सांस्कृतिक मूल्यांचे, ग्रंथालयांचे नेहमीच नुकसान करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शक, हूण, कुषाण इत्यादी आक्रमक येथे आले; परंतु काही काळानंतर ते इथल्या संस्कृतीच्या, सभ्यतेच्या प्रेमात पडले आणि इथेच मिसळून गेले. आज जर आपल्याला कोणी विचारले, की कोण शकांचे वंशज आहेत, कोण कुषाणांचे वंशज आहेत, तर असे कोणीही सांगू शकणार नाही. या आक्रमकांना येथील श्रद्धास्थाने, धर्मस्थाने नष्ट करण्याची गरज वाटली नाही. परंतु मुस्लिम आणि ख्रिश्चन आक्रमक इथल्या संस्कृती आणि सभ्यतेमध्ये मिसळू शकले नाहीत. त्यांनी आपले वेगळेपण कायम ठेवले व त्यांच्या प्रत्येक आक्रमणामध्ये त्यांनी इथली श्रद्धास्थाने नष्ट केली.

इसवी सन १३०५ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी याने धार येथील वाग्देवीचे मंदिर उद्ध्वस्त केले. आणखी शंभर वर्षानंतर, १४०१ मध्ये दिलावर खान यानेही पुन्हा तेच मंदिर उद्ध्वस्त केले. जे भाग्य सोमनाथ मंदिराला जीर्णोद्धाराचे लाभले, ते भाग्य देशातील राम मंदिरासहित इतर कोणत्याही मंदिराला लाभले नाही. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरही या श्रद्धास्थानांशी संबंधित परवड थांबली नाही. हिंदूंच्याच देशांमध्ये हिंदूंना आपल्या आराध्य देवतेचे पूजन करण्याचा अधिकार मागावा लागला. इतकी वर्षे न्यायासाठी न्यायालयात जावे लागले.

राजा भोज यांनी बांधलेल्या माता सरस्वतीच्या मंदिराला मुस्लिम पक्षाचे लोक कमल मौला मशीद म्हणायचे. आमच्या राजे-महाराजांनी या देशामध्ये आलेल्या सर्वच हिंदू नसलेल्या लोकांना त्यांची प्रार्थनास्थळे उभी करण्यासाठी जमीन दिलेली आहे. त्यामुळे हे लक्षात घेतले पाहिजे की आम्ही प्रार्थनास्थळे, श्रद्धास्थाने उभी करणारे लोक आहोत; त्यांची जपणूक करणारे लोक आहोत; त्यांना उद्ध्वस्त करणारे लोक नाही. आमच्यामध्ये मूर्ती तोडून स्वतःला मूर्तिभंजक म्हणून घेण्याची कुठलीच परंपरा नाही आणि असे केल्याने कोणताच स्वर्ग किंवा अप्सरा प्राप्त होत नाही. त्यामुळे कमल मौला मशिदीला तोडण्याचा किंवा त्याच्यावर हक्क सांगण्याची हिंदू समाजाला काहीच गरज नव्हती. ही गरज मूर्तिभंजकांच्या धर्माला कदाचित असेल; परंतु दगडांमध्ये सुद्धा देव पाहू शकणाऱ्यांना अजिबात नाही.



आज पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान या मुस्लिम देशांमध्ये किती मंदिरे सुरक्षित आहेत? किती तोडली गेली, उद्ध्वस्त केली गेली? परंतु भारतात मात्र चर्च आणि मशिदी सुरक्षित आहेत. हिंदूंमध्ये असलेला हा परधर्मसहिष्णुतेचा भाव आहे. स्थानिक हिंदू जनतेला जर त्यांच्या प्रदेशातील हिंदू मंदिराचा, श्रद्धास्थानांचा इतिहास, परंपरा माहीत असेल, तर ते त्यासाठी न्यायालयात दाद मागू शकतात. प्रत्येक वेळी कुठल्यातरी हिंदुत्ववादी संघटनेने लढा उभारला पाहिजे, अशी अपेक्षा करण्याची किंवा वाट पाहण्याची काही आवश्यकता नाही. न्यायालयाचा निर्णय हा हिंदू पक्षाच्या बाजूने लागला म्हणून याला हिंदूंचा विजय व मुसलमानांचा पराजय अशा दृष्टिकोनातून न बघता, याला न्याय म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. एकदा कोणीतरी विचारले, की राम मंदिर निर्मितीमुळे देशाला काय फायदा झालेला आहे? वास्तविक, हा प्रश्नच बरोबर नाही; कारण फायदा-तोटा हा भौतिक व्यवहाराशी संबंधित शब्द आहे, तर रामजन्मभूमी मंदिर हा करोडो लोकांच्या श्रद्धेचा प्रश्न होता. न्यायालयाचा निर्णय येतपर्यंत तो हिंदू-मुस्लिम विवादाचा विषय होता; परंतु आता अयोध्येत काय आहे, असा प्रश्न जर कोणी कोणाला विचारला, तर त्याचे उत्तर सर्वच लोक 'राम मंदिर' असे देतील. त्यामुळे भावी पिढ्यांना हा हिंदू-मुस्लिम विवादाचा विषय म्हणून माहीत राहणार नाही, तर राष्ट्रपुरुष श्रीरामांचे मंदिर आहे, असेच म्हणून माहीत राहील. विवादाचा एक विषय समाप्त झाला. भावी पिढ्यांसाठी राष्ट्रीय एकात्मता बळकट होण्याचा मार्ग प्रशस्त झाला.

धार येथील वाग्देवी मंदिराचे जे पुरातत्त्व सर्वेक्षण करण्यात आले, ते वैज्ञानिक पद्धतीने करण्यात आले होते. त्यामध्ये मुस्लिम लोकांचे सुद्धा प्रतिनिधित्व होते. त्यामुळे जे काही सत्य समोर आले, ते सर्व धर्मीयांच्या समोरच आलेले आहे. विवादाचे असे अनेक मुद्दे समाप्त होणे हे राष्ट्रीय एकात्मतेला बळकटी देणारेच आहे. देशामध्ये विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेले श्रद्धास्थानांशी संबंधित निवाडे जर लवकरात लवकर निकाली निघाले, तर सामाजिक सलोखा निश्चितच निर्माण होऊ शकतो.

पूर्वी न्याय देताना सुद्धा कोणत्या पक्षावर याचा काय परिणाम होईल, सामाजिक सलोखा बिघडेल का, दंगे होतील का, अशा पद्धतीचा विचार करून अशा पद्धतीचे निवाडे निकाली निघत नव्हते. परंतु आपण हे लक्षात ठेवले पाहिजे, न्यायाला उशीर होणे म्हणजे न्याय नाकारणे होय. दंगेखोर हे समाजातील असामाजिक तत्त्वांचे प्रतीक आहेत. यांचा बंदोबस्त करणे हे पोलिस आणि सुरक्षा व्यवस्थेचे काम आहे. सर्वसामान्य समाजाला दंगेखोरांचे समर्थक मानणे हा त्या समाजावर सुद्धा केलेला अन्याय आहे. आतापर्यंत राजकीय पक्षांनी, नेत्यांनी सुद्धा असे विषय प्रलंबित ठेवण्यात, त्याला खतपाणी घालण्यात किंवा त्याला भडकवण्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे. दंगेखोर जितके असामाजिक आहेत, तितकेच एखाद्या गटाचे पक्षाचे ध्रुवीकरण करून त्यांच्यातील विध्वंसक प्रवृत्तींना जागृत ठेवणारे सुद्धा दंगेखोरच समजले पाहिजेत. यांचा सामाजिक कार्याचा मुखवटा फाडण्याची आवश्यकता आहे. राम मंदिराच्या जागी एखादे इस्पितळ गरीब लोकांकरिता बांधावे, असे म्हणणारे राजकीय नेते बाबरी मशीद न बांधता गरीब लोकांसाठी शाळा, दवाखाने बांधावे, असे का म्हणत नाहीत, याचा विचार हिंदू समाजाने केला पाहिजे. असे नेते हेच सामाजिक सलोख्याचे, राष्ट्रीय एकात्मतेचे खरे मारेकरी आहेत. नेत्यांनी समाजाला दिशा दाखवण्याचे काम केले पाहिजे; तेल ओतण्याचे करू नये. सरस्वती मातेला विरोध करणाऱ्या लोकांच्या बुद्धीचे जडत्व व अशांना ओळखू न शकणाऱ्या लोकांचे अज्ञान माता सरस्वती दूर करो, अशी प्रार्थना करूया.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### शहरी शाळांवरच अन्याय का?

राज्यातील शाळांमध्ये घटलेल्या पटसंख्येमुळे नागपूर ग्रामीण तसेच शहरी भागातील शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरत असल्याची परिस्थिती निर्माण झाली होती. या पृष्ठभूमीवर शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासनाने ११ मे रोजी महत्त्वपूर्ण शासन पत्रक जारी करत ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांना मोठा दिलासा दिला आहे. या निर्णयानुसार, ज्या शाळांमध्ये इयत्ता नववी व दहावी मिळून एकूण पटसंख्या २० असेल, त्या शाळेत किमान तीन शिक्षक अनुज्ञेय राहतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील अनेक शाळांवरील अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागला असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र, या शासन निर्णयात शहरी भागातील शाळांचा समावेश न करण्यात आल्याने शहरातील शाळांवरच अन्याय का, असा प्रश्न उपस्थित होतो.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### केंद्र सरकारचे दिशानिर्देश योग्य

नुकतीच देशातील संवेदनशील राज्य म्हणजे पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणूक झाली. तशा पाच राज्यांत निवडणुका झाल्या. त्यापैकी पश्चिम बंगाल हे राज्य देशाच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील असे होते. त्यामुळे संपूर्ण देशाचे लक्ष त्या निवडणुकीकडे लागले होते. त्या राज्यात जनतेचा कौल सुशासन, महिला सुरक्षा व भ्रष्टाचारमुक्त बंगाल या त्रिसूत्रीला मिळाला म्हणजेच पंतप्रधान नरेंद्र मोदींवर पश्चिम बंगालच्या जनतेने विश्वास व्यक्त केला. या विश्वासाच्या आधारावरच पंतप्रधानांनी जनतेला उद्देशून या युद्धजन्य परिस्थितीत कसे वागावे हा मूलमंत्र दिला. अवास्तव खर्चावर नियंत्रण, स्वदेशीचा वापर, सोने खरेदी नियंत्रणात असावी, त्यामुळे विदेशी मुद्रा नियंत्रणात राहील. खूप दिवसांपासून जनतेच्या मनात होतंच की राजकीय पक्ष अमाप पैसा खर्च करीत आहेत. त्यांच्या सुरक्षेसाठी खूप जास्त खर्च, अनेक गाड्या एकेका व्यक्तीसाठी धावत होत्या, पेट्रोलचा नुसता अपव्यय सुरू होता. काही दिवसांपूर्वी पंतप्रधानांनी सांगितल्याबरोबर गाड्यांचा अर्धा ताफा कमी झाला, सुरक्षा व्यवस्था सुद्धा आवश्यक तेवढीच ठेवण्यात आली. वाईट या गोष्टीचं वाटतं की हे कोणीतरी सांगितल्यावरच करायचं का? स्वतःहून देशासाठी केलं पाहिजे हे समजायला नको का? तर मोदींनी जे सांगितले ते जनतेच्या मनातलेच सांगितले. त्यांना जनतेचे पूर्ण समर्थन आहे. आणि देशहित प्रथम क्रमांकावर, उद्योग हित, श्रमिक हित अशीच जर त्रिसूत्री जनतेने, उद्योगपतींनी आणि श्रमिकांनी अंमलात आणली तर उद्या आपल्या भारत देशातून सोन्याचा धूर निघाल्याशिवाय राहणार नाही. आपण विश्वगुरू बनण्या कडे मार्गक्रमण करू ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. सर्व सुजाण नागरिकांनी पंतप्रधानांनी केलेल्या सूचनांचे पालन करून देश सशक्त बनवण्यास सहकार्य करावे.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

### परीक्षा देणाऱ्याची आणि घेणाऱ्याची



'नीट'ची परीक्षा खूप गाजली. ही परीक्षा घेणाऱ्या मंडळाने नीट घेतली नाही. परीक्षा घेणारे पूर्णपणे नापास झाले. पेपर फुटल्यामुळे खूप अभ्यास करणाऱ्या, मेहनती आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांना ती देता आली नाही. त्यांच्याकरिता ही परीक्षा अग्निपरीक्षा ठरली. त्यांची काही चूक नसताना त्यांना ही परीक्षा पुन्हा द्यावी लागेल. पेपर कोणी विकले आणि कोणी खरेदी केले त्याचा तपास सुरू आहे. गुन्हेगार शोधून काढणे ही देखील पोलिस आणि इतर यंत्रणा विभागासाठी खरी परीक्षा आहे. यात ज्यांनी पेपर फोडले आणि विकले ते तर गुन्हेगार आहेत, परंतु ज्या विद्यार्थ्यांनी पेपर खरेदी केले, ते आणि त्यांचे पालक देखील यात दोषी आहेत. लाच देणारे आणि घेणारे दोन्ही कायद्यानुसार गुन्हेगार असतात. यावर कोर्ट काय निर्णय घेते ही देखील कोर्टाची परीक्षा आहे. या नंतर असे ढगफुटीसारखे पेपरफुटीचे प्रकरण पुन्हा निर्माण होणार नाही यासाठी सरकार काय उपाययोजना करते ही देखील सरकारची परीक्षा आहे. परीक्षा या संकल्पनेला कलंकित करणारी ही नीट परीक्षा झाली. तिने संपूर्ण शैक्षणिक वातावरण प्रदूषित केले. ही खरोखर एक अतिशय वाईट घटना आहे. यात सहभागी असणाऱ्या कुणालाही माफ करता येत नाही.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### शहरातील प्रगणक व पर्यवेक्षकांना साहित्य किटचे वाटप

**सोलापूर, दि. १७ मे-**

सोलापूर शहरात शनिवारी अमर मराठी विद्यालय शिक्षकांना किट वाटप करण्यात आले. भारताची जनगणना २०१७ अंतर्गत होणाऱ्या घर यादी व घरगणना प्रक्रियेसाठी आजपासून सोलापूर शहरातील सर्व प्रगणक व पर्यवेक्षक यांना शासनामार्फत आवश्यक साहित्य किटचे वितरण करण्यात आले. संबंधित झोननिहाय हे साहित्य सर्व कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहे. या साहित्य किटमध्ये माहिती पुस्तिका, नकाशा, पट्टी, पेन्सिल, पेन, शार्पनर, घरांवर क्रमांक लिहिण्यासाठी मार्कर पेन, उन्हापासून संरक्षणासाठी टोपी, साहित्य ठेवण्यासाठी बॅग, लेखनासाठी पॅड, आय-कार्ड व नोटपॅड अशा आवश्यक वस्तूंचा समावेश आहे.

### नगरसेवक अनंत जाधव यांचे पद रद्द करण्यासाठी हायकोर्टात याचिका

**सोलापूर, दि. १७ मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या २०२५-२०२६ च्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ४ (ड) मधून निवडून आलेले भाजप नगरसेवक अनंत जाधव अडचणीत आले आहेत. निवडणूक अर्जात गुन्हेगारी पार्श्वभूमी लपवल्याचा आरोप करत त्यांचे नगरसेवकपद पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्याची मागणी करत मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. वंचित बहुजन आघाडीचे पराभूत उमेदवार धम्मपाल इंगळे आणि सामाजिक कार्यकर्ते तथा प्रभाग क्र. ४ (ब) चे उमेदवार सुशील बंदपट्टे यांनी ही संयुक्त याचिका दाखल केली आहे. याचिकेत ील आरोपानुसार, अनंत जाधव यांनी निवडणूक अर्ज भरताना त्यांच्यावर पूर्वी दाखल झालेला खुनाचा गंभीर गुन्हा, त्यात मिळालेली जन्मठेपेची शिक्षा आणि ५ वर्षांचा कारावास या अत्यंत महत्त्वाच्या बाबी हेतूपुरस्सर लपवल्या आहेत, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. सध्या उच्च न्यायालयाचे कामकाज उन्हाळी सुट्टीमुळे बंद असल्याने, सुट्टी संपताच या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात येणार आहे. या कायदेशीर लढाई मुळे सोलापूरच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



### 'रॉयल फ्रेंड्स क्लब'ची विजयी सलामी



**सोलापूर, दि. १७ मे -**

'रॉयल फ्रेंड्स क्लब'ने ७९ व्या रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेची विजयी सलामी दिली. येथील रेल्वे मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन रेल्वेचे क्रीडाधिकारी तथा 'एसआर डीएफएम' आदित्य त्रिपाठी यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबर्सु, खजिनदार संतोष बडवे, ज्येष्ठ क्रिकेटपटू के. टी. पवार निवड समितीचे अध्यक्ष अप्पू गोटे, 'सीआरएमएस'चे डिव्हिजन सेक्रेटरी उल्हास बागेवाडी, मध्य रेल्वे इन्स्टिट्यूटचे सेक्रेटरी किशोर पिल्ले, खजिनदार दत्ता वाघमोडे उपस्थित होते. तसेच इन्स्टिट्यूट कमिटी मेंबर इस्माईल नाकेदार, नेताजी घोडके, रेल्वेचे ज्येष्ठ खेळाडू वासू दोरणाल, प्रवीण देशेट्टी, ऋषीकेश यरगल, सुदेश मालप आणि सचिन गायकवाड यांचीही प्रमुख उपस्थिती होती. राजा पटेल यांनी आभार मानले. सलामीचा सामना 'टाइम्स ११' विरुद्ध 'रॉयल फ्रेंड्स क्रिकेट क्लब' यांच्यात खेळवला गेला. रॉयल फ्रेंड्स क्लबने नाणेफ ेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना टाइम्स ११ संघाने निर्धारित २० षटकांत ८ बाद १४७ धावा केल्या. यात प्रवीण यादयाद याने ३८, प्रतीक भाकडे याने २७ तर किशोर गोटेवाले याने २१ धावांचे योगदान दिले. रॉयल फ्रेंड्स क्लबकडून महेश बुगडेने २९ धावांत ३ बळी टिपले. आदर्श पाटील आणि रोहित देशमुख यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. रॉयल फ्रेंड्स क्लबने अवघ्या १४.५ षटकांत ३ बाद १४८ धावा करत सामना ७ गडी राखून सहज जिंकला. संघाच्या विजयात राजेश हिरेमठ याने ५२ आणि अक्षय शिवपुरे याने ४९ धावांची शानदार खेळी केली. उत्कृष्ट गोलंदाजी करणाऱ्या रॉयल फ्रेंड्स क्लबच्या महेश बुगडे याला 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आले.

Classifieds

**Vacancy**

Vacancy available for Sales Engineer / Marketing Executive. Swaraj Pneumatics mobile: 8380050483

**पाहिजेत**

जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात घरगुती काम करण्यासाठी २५ ते ३५ वयोगटातील महिला पाहिजे. संपर्क: ९४२३५९००३६/९४२०८८५६०७

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शन पूर्णतः निशुल्क

**मंदिर समितीचे स्पष्टीकरण; पैशांची मागणी करणाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन**

### व्हायरल ऑडिओ क्लिप संदर्भात गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ मे -**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भाविकांना उपलब्ध करून देण्यात येणारे मुखदर्शन व पदस्पर्श दर्शन हे मंदिर समितीमार्फत पूर्णतः निशुल्क स्वरूपात दिले जाते.

दर्शनासाठी कोणत्याही प्रकारची फी, देणगी अथवा रक्कम आकारली जात नाही, अशी स्पष्टोक्ती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीने केली आहे. तसेच पैशांची म ागणी करणाऱ्या वायरल ऑडिओ क्लिप संदर्भात गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू असल्याचेही सांगितले आहे.




सध्या समाज माध्यमांवर काहीजणांमार्फत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील दर्शनासाठी पास उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली भाविकांकडून पैशांची मागणी करण्यात येत असल्याची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. संबंधित व्यक्तीकडून मोबाईल क्रमांकाद्वारे डिजिटल पद्धतीने रक्कम स्वीकारण्यात आल्याची बाबही समोर येत आहे. हा प्रकार भाविकांची आर्थिक फसवणूक करणारा असून मंदिर समितीची बदनामी करण्याचाही प्रयत्न आहे. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी मंदिर समितीच्या वतीने पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

> श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने भाविकांना कोणीही व्यक्ती दर्शनासाठी पैसे, पास किंवा विशेष सुविधा देण्याच्या नावाखाली म ागत असल्यास तत्काळ मंदिर समिती कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.
>
> **- प्रविणकुमार घम, व्यवस्थापक, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती**



## वीरशैव सेवा संघाच्या वतीने स्वयं जनगणना मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

सोलापूर शहरात स्वयं जनगणना मोहीम सुरु आहे. या उपक्रमांतर्गत शंकरलिंग महिला मंडळ येथे शिबिर घेण्यात आले.

जनगणनेच्या कार्यात वीरशैव सेवा संघाच्या वतीने विविध ठिकाणी मेळावे घेण्यात येत आहेत. शनिवारी घेतलेल्या मेळाव्यात उपस्थितांना स्वयं जनगणना माहिती भरण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महिला मंडळाचे राजश्री थळंगे, लता धनशेट्टी, अंबिका बिज्जरगी, वनमाला बंटनुर उपस्थित होते. प्रास्ताविकात सचिव सिद्धारुढ निंबाळे यांनी या राष्ट्रीय कार्यात वीरशैव सेवा संघाचे आय टी क्षेत्रात निष्णात असलेले युवक मंडळी स्वखुशीने सहभागी होत असल्याचे सांगितले.

मोहिमेत वीरशैव सेवा संघाचे युवा पदाधिकारी रोहित बिद्री, आकाश शबादे, सुरज आतनुरे संजयकुमार धनशेट्टी, राजकुमार धनशेट्टी, मल्लाप्पा मोटगी, सिद्धाराम कोनापुरे परिश्रम घेत आहेत. तसेच ग्रुपमध्ये स्वयं जनगणेसाठी रोहित बिद्री (मो.नंबर. ९९६०५५२६१५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन वीरशैव सेवा संघाने केले आहे.

# महापुरुषांची जयंती विचारांच्या आचरणातून साजरी करूया : अमेय केत




### सम्यक प्रज्ञा शोध शिष्यवृत्तीचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे -**

आपल्या विचारांतून आणि कृतीतून महापुरुषांनी समाजसुधारणेचे महान कार्य केले आहे. अश्या म हामनवांच्या जयंती मनोरंजनाच्या म ाध्यमातून नव्हे तर त्यांच्या विचारांना आचरणात आणून साजरी केली पाहिजे असे विचार महापारेषणचे उपकार्यकरी अभियंता अमेय केत यांनी व्यक्त केले.

ते म.फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सम्यक अॅकॅडमी आणि लोकराजा फौंडेशन यांच्या संयुक विद्यमाने आयोजित केलेल्या सम्यक प्रज्ञा शोध परीक्षेच्या शिष्यवृत्ती प्रदान सम ारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक म हासंघाचे प्रदेशाध्यक्ष समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर हे होते. यावेळी प्रा. सुधाकर गायकवाड, मुक्ता धाकतोडे, आकाश कंजेरी, प्राजक्ता कांबळे, कृपा जाधव, भौरम्मा वाघमारे, साक्षी सोनकांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक राज्य कर निरीक्षक बुद्धजय भालशंकर यांनी सूत्रसंचालन सरस्वती कोकणे यांनी केले तर आभार प्रदर्शन लोकराजा फौंडेशनचे अध्यक्ष आशुतोष तोंडसे यांनी केले.

> **शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी असे**
>
> मुक्ता धाकतोडे, आकाश कंजेरी, स्नेहा कंजेरी, विद्या नारायणकर, प्राजक्ता कांबळे. शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना एकूण १५ हजार रोख शिष्यवृत्ती, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, ग्रंथ देऊन सन्मानित करण्यात आले.



# सिध्दरामेश्वर मंदिरातील कार्याचे मिलिंद परांडे यांच्याकडून कौतुक

### मंदिर बांधकाम, अन्नछत्र व अध्ययन केंद्र पाहून व्यक्त केले समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

विश्व हिंदू परिषदेचे संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांनी शनिवारी शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांनी मंदिर परिसराची पाहणी करत सुरू असलेल्या कामांचे कौतुक केले.

परांडे यांनी सुवर्णसिध्देश्वर प्रकल्प बांधकाम व उपक्रमांची माहिती घेतली. मंदिर परिसरातील धार्मिक, सामाजिक व सेवा उपक्रमांचे कौतुक करत त्यांनी देवस्थानच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी संस्थेच्या धार्मिक, सामाजिक, वैद्यकीय व शैक्षणिक कार्याची माहिती दिली. संस्थेमार्फत सुरू असलेल्या संस्कृत वैदिक शाळा, श्री सिध्देश्वर अध्ययन केंद्र व ग्रंथालयाच्या उपक्रमांविषयीही सांगितले.

ग्रंथालय कायम खुले ठेवा, धार्मिक व अभ्यासपूर्ण पुस्तके जितकी लोक वाचण्यासाठी घेऊन जातील तितकी घेऊन जाऊ द्या, असे आवाहन यावेळी परांडे यांनी केले. यानंतर देवस्थानच्या दासोह विभागाला भेट देऊन परांडे यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. अन्नछत्रातील प्रसाद व्यवस्था उत्कृष्ट असल्याची प्रशंसा केली. श्री सिध्देश्वर देवस्थानतर्फे परांडे यांचा अध्यक्ष काडादी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पंच कमिटीचे उपाध्यक्ष सिध्देश्वर बमणी, विश्वस्त नीलकंठप्पा कोनापुरे, रतन रिक्के, प्रभूराज मैंदर्गीकर, बाळासाहेब भोगडे, गिरीश गोरनळ्ळी, पशुपतिनाथ माशाळ, विलास कारभारी, प्रकाश बिराजदार, श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुष्पराज काडादी, शरणराज काडादी यांच्यासह विश्व हिंदू परिषद कर्नाटक प्रांतचे लिंगराज अप्पा, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री जयदेव सुरवसे, जिल्हाध्यक्ष विष्णू मोंढे, विभागीय मंत्री संजय जमादार, बजरंग दलचे संयोजक अभय कुलथे उपस्थित होते.

# वाडीकुरोलीच्या केके स्पोर्टस क्लबला विजेतेपद



### जिल्हा अजिंक्यपद कुमारी खो-खो स्पर्धा : अर्धनारी नटेश्वर वेळापूर उपविजेता, समृद्धी स्पोर्ट्स क्लब तृतीय



**तभा वृत्तसेवा,**
**वाडीकुरोली दि. १७ मे-**

वाडीकुरोली (ता. पंढरपूर) कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लबने जिल्हा अजिंक्यपद कुमारी गटाच्या खो-खो स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्लबला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तृतीय स्थान सोलापूरच्या समृद्धी स्पोर्ट्स क्लबने संपादले. वसंतराव काळे प्रशालेच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात स्नेहा लामकाने (३. ४०, १.०० मिनिटे संरक्षण व ४ गुण) व ऋतुजा सुरवसे ( १. २५, २. ०५ व २ गुण) यांच्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर वाडीकुरोलीने वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाचा १०-९ असा एक डाव एक गुणाने धुव्वा उडवला. वेळापूरच्या अश्विनी मांडवे (६ गुण व १. २५ मि. ) हिची एकाकी लढत अपुरी पडली.

सोलापूर अमॅच्युअर खो-खो असोसिएशन व कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लब वाडीकुरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कल्याणराव काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सचिव बाळासाहेब काळे गुरुजी, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे, असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, पदाधिकारी शरद व्हनकडे, अजित शिंदे, श्रीरंग बनसोडे, शिव राठोड, सोमनाथ बनसोडे, जावेद मुलाणी व पालक संजय मासाळ उपस्थित होते. जिल्हा संघाची निवड करण्यासाठी निवड समिती सदस्य अजित बनकर, अर्जुन पवार, शिवशंकर राठोड प्रविण गोवे, सोनाली शिंदे हे काम पाहणार आहेत. प्रास्ताविक संजय कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन समाधान काळे यांनी केले. शिवाजीराव शेंडगे यांनी आभार मानले.

**आपल्या वक्तशीर वाणीने संपूर्ण महाराष्ट्राला मंत्रमुग्ध करणारे भीम कन्या प्रा. ज्योतीताई वाघमारे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना मनस्वी शुभेच्छा.**

# भीमकन्या : प्रा. डॉ. खासदार ज्योतीताई वाघमारे

------------------------



प्रा. डॉ. खासदार ज्योतीताई वाघमारे यांचा जन्म ेलापूर येथील एका झोपडपट्टीत गरीब कुटुंबात झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन त्याकाळी त्यांच्या वडिलाने दलित पँथर चळवळीत काम केले. त्यांचाच वसा प्रा. ज्योतीताई वाघमारे बालपणापासूनच फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचाराने एक धाडसी पाऊल टाकत ते पुढे आले. छत्रपती शिवाजी महाराज, महत्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या वेळी शेवटच्या लोकांपर्यंत त्याचे विचार पोहचविण्याचे काम ताईने केले.

ताई जेंव्हा व्याख्यान करायचे तेंव्हा समोर बसलेला जनसमुदाय थोडा ही हालत नसत एकटक भाषण लोक कान देऊन ऐकत असतात. ताई ही खूपच हालखीच्या परिस्थितीत दहावी व बारावी परिक्षेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांम ध्ये प्रथम क्रमांक पटकविल्याबद्दल संपूर्ण सोलापुरातून अभिनंदनाचा वर्षाव झाला.

महाविद्यालयीन जीवन जगत असताना येणाऱ्या संकटावर मात करून आपले म हाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. वक्तृत्व स्पर्धे त प्रथम क्रमांक पटकावून आलेल्या बक्षिसातून त्यांचा शैक्षणिक खर्च व घराचा खर्च भागविताना आम्ही पाहिले आहे. १० बाय १० च्या खोलीत आलेले पारितोषिक व ट्रॉफी ठेवण्याकरिता जागा नसल्याने पोत्यात बांधतांना व पुस्तकांचा संच देवळाच्या देव्हाऱ्यात ठेवून अभ्यास केलेले प्रा. ज्योतीताई वाघमारे हे जेंव्हा पीएचडी करुन डॉक्टरेट मिळविले तेंव्हा मात्र आई-वडील-भाऊ मित्र परिवार यांचा आनंद द्विगुणीत झाला होता.

ताईचा वारसा तसा राजकीय काहीच नव्हता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार त्यांनी वाचलेली पुस्तके यामुळे ताईंना एक नवा उत्साह व प्रेरणा मिळायची. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार लोकांपर्यंत पोहचविण्याकरिता पथनाट्य रस्त्यावर करायचे. ते स्वतः गाणे म्हणून जनसमुदाय गोळा करायचे आपल्या व्याख्यानाने लोकांना मंत्रमुग्ध करायचे. विद्रोही चळवळ असले किंवा अन्याय अत्याचार प्रसंग असेल तिथे ते तुटून पडायचे.

ताई जेंव्हा प्राध्यापक म्हणून काम करु लागली तेंव्हा त्यांना कुठे तरी सामाजिक जाणीवेचे उणीव भासायचे तेंव्हा त्यांनी कॉंग्रेस पक्षात काम केले पण तिथली परिस्थिती पाहून महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व आताचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात प्रवेश केला. त्यांना शिंदे साहेबांनी प्रवक्ते पदाची जबाबदारी दिली. निवडणूक असो किंवा नसो पक्षासाठी व नेत्यांनी दिलेले आदेश शिसंवाद मानून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. दिवस रात्र एक करुन, घरचे सगळे समस्या बाजूला ठेवून पक्षासाठी खूप मेहनत घेतली. एक महिला असून एवढे पळणारी नेता हे मा. उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेबांनी पाहिले आणि त्यांना राज्यसभा सदस्य (खासदार) म्हणून राज्यसभेवर पाठविले. त्यांना विश्वास आहे की ते या पदाला व जनतेला नक्कीच न्याय देतील. म्हणून आम्ही सोलापूरकरच्या वतीने ताईचा खासदार म्हणून ताईचा खासदार म्हणून सन्मान केला व आम्ही विश्वसाने सांगतो या पदाला न्याय देतील. वाढदिवसाच्या निमित्ताने ताईंना पुन्हा एकदा मनस्वी शुभेच्छा.

**- दीपक गायगवळी**
**अध्यक्ष रणसम्राट सामाजिक संस्था.**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व ता. बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डी. सोलापूर, सब. डी. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील, न.प. हद्दीतील घर जागा याचा सि.स.नं. ४०८३/अ/२ यामधील प्लॉट नं. ०५ पैकी घरजागा याचे क्षेत्र १११.५३ चौमी., यासी चतुःसीमा :- पूर्वेस - ट्रस्टची जागा, दक्षिणेस - गांधी यांची जागा, पश्चिमेस - न.प. रस्ता, उत्तरेस - हिंगमिरे यांची जागा, येणेप्रमाणे चतुःसीमा पूर्वक घरजागा, सदर जागेत साधारणतः १८००.०० चौफूट बांधकाम, इलेक्ट्रिक व नळ कनेक्शनसह आतील तदंगभूत वस्तू हक्कासह घरजागा, याची पाणी व वागणूक पश्चिम बाजूच्या रस्त्याने आहे.

सदर वर नमूद घरजागा ही कै. प्रकाश हरकचंद पारेख व सुलभा प्रकाश पारेख यांच्या खरेदी मालकीची आहे, कै. प्रकाश हरकचंद पारेख यांचे मृत्यु पश्चात त्यांची पत्नी व मुले नामे श्रीमती सुलभा प्रकाश पारेख, श्री. वैभव प्रकाश पारेख, अश्विनी प्रीतम जैन, पूर्वा परीन शहा, प्रियांका शैलेश व्होरा यांचे नावाची नोंद मालमत्ता हक्कपात्रकी झाली आहे व हि जागा त्यांच्या कब्जे वाहिवाटीस आहे. सदरची घरजागा ते विक्री करू इच्छितात. सदर घरजागा विक्री निघालेबाबत आमचे अशिलास सम जलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने श्रीमती सुलभा प्रकाश पारेख, श्री. वैभव प्रकाश पारेख, अश्विनी प्रीतम जैन, पूर्वा परीन शहा, प्रियांका शैलेश व्होरा यांनी सदरची घरजागा विक्री करणे बाबतचा करार आमच्या अशीलाशी केला आहे त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रककम स्वीकारली आहे, तसे साठेखत आमचे अशिलाचे हक्कात लिहून दिले आहे व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे.

सदर मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही, असे गृहीत धरून मिळकत बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत खरेदी करतील. खरेदी नंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. १७/०५/२०२६.

**सही -**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,**
**पत्ता. ऑफिस भवानी पेठ, सोलापूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**



## महत्त्वाचे

### सुपर क्लासिक बुद्धिबळ : प्रज्ञानंद संयुक्त आघाडीवर

**बुखारेस्ट** : रोमानियातील बुखारेस्ट येथे सुरू असलेल्या सुपर क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेत गत फेरीत उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव्हवर



मिळवलेल्या सार्थ विजयानंतर , भारताचा ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने आपली गुणसंख्या (संभाव्य तीन गुणांपैकी) दोन गुणांपर्यंत नेली. स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीनंतर प्रज्ञानंद याने जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरशी बरोबरी साधली आणि तो संयुक्त आघाडीवर कायम राहिला. आता तो फ्रान्सचा मॅक्सिम वाशियर-लाग्राव्ह, नेदरलॅण्डची जोडी जोर्डन व्हॅन फोरेस्ट आणि अनिश गिरी, तसेच कीमर यांच्यासह संयुक्त आघाडीवर आहे. १० खेळाडूंच्या या स्पर्धेत निम्म्याहून अधिक खेळाडू संयुक्त आघाडीवर असल्याने, अमेरिकेचे फॅबियानो कारुआना आणि वेस्ली सो या दोघांनीही त्यांचे सर्व सामने बरोबरीत सोडवले असून ते १.५ गुणांवर आहेत; तर मूळचा इराणी असलेला आणि आता फ्रान्सचे प्रतिनिधित्व करणारा अलीरेझा फिरौझा आणि स्थानिक स्टार डियाक बोगदान-डॅनियल यांच्या खात्यावर प्रत्येकी अर्धा गुण जमा आहे.

### पहिल्या रग्बी ७ एस स्पर्धेत भारतीय महिलांना चौथे स्थान



**ताश्कंद** : उझबेकिस्तानमधील ताश्कंद येथे आयोजित पहिल्या रग्बी ७ एस स्पर्धेत भारताच्या वरिष्ठ पुरुष संघाने रौप्यपदकाची कमाई केली, तर वरिष्ठ महिला संघाने चौथा क्रमांक पटकावला. रग्बी इंडियासाठी आंतरराष्ट्रीय हंगामाची ही एक सकारात्मक सुरुवात ठरली आहे. भारताने यजमान उझबेकिस्तान (२४-१२), किर्गिस्तान (३१-०), मंगोलिया (२६-१४) आणि पाकिस्तान (२०-१४) यांच्याविरुद्ध विजय मिळवत आपल्या मोहिमेची सुरुवात केली. श्रीलंकेविरुद्धच्या (१२-३३) अंतिम राऊंड-रॉबिन सामन्यापर्यंत हा संघ अजिंक्य राहिला. स्पर्धेच्या अंतिम फेरीत या संघाचा पुन्हा एकदा श्रीलंकेशी सामना झाला. विजेतेपदाच्या या लढतीत १०-३१ असा निकाल लागल्यानंतरही, संघाने रौप्यपदक पटकावले.

### आंद्रीवा-श्नाइडर जोडीला इटालियन ओपनचे विजेतेपद

**रोम** : रशियन जोडी मिरा आंद्रीवा आणि डायना श्नाइडर यांनी रविवारी येथे सरळ सेट्समध्ये दणदणीत विजय मिळवून इटालियन ओपनचे विजेतेपद पटकावले आणि महिला दुहेरी क्षेत्रातील आपले वाढते वर्चस्व अधोरेखित केले. फोरो इटालिको येथे झालेल्या एकतर्फी अंतिम सामन्यात, जो केवळ ६९ मिनिटे चालला, या जोडीने सातव्या मानांकित क्रिस्टिना बुक्सा आणि निकोल मेलिचार-मार्टिनेझ यांचा ६-३, ६-३ असा पराभव केला. हा विजय या जोडीचे एकत्र मिळवलेले दुसरे डब्ल्यूटीए १००० विजेतेपद आणि एक संघ म्हणून एकूण तिसरी ट्रॉफी आहे. यामुळे रोलँड गॅरोस स्पर्धेपूर्वी टूरवरील सर्वात धोकादायक जोड्यांपैकी एक म्हणून त्यांची प्रतिष्ठा आणखी मजबूत झाली आहे. या महिन्याच्या सुरुवातीला माद्रिदमध्ये झालेल्या निराशाजनक कामगिरीनंतर रोममधील विजय हा एक योग्य प्रतिसाद ठरला.

### वैभव सूर्यवंशीला वरिष्ठ संघात स्थान द्या : रवी शास्त्री

**नवी दिल्ली, १७ मे-**

भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी, आयपीएलमधील आपल्या स्फोटक कामगिरीच्या जोरावर, किशोरवयीन फलंदाजीची सनसनाटी ठरलेल्या वैभव सूर्यवंशीला थेट वरिष्ठ राष्ट्रीय संघात स्थान देण्याचे समर्थन केले आहे. या युवा खेळाडूला भारताच्या टी-२० योजनां ध्ये तातडीने सामावून घेण्यास निवड समितीने अजिबात संकोच करू नये; इतकेच नव्हे, तर आगामी आयर्लण्ड दौरा हा त्याच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणासाठी एक आदर्श व्यासपीठ ठरू शकेल, असेही शास्त्री यांनी म्हटले आहे. वैभवला लवकरात लवकर राष्ट्रीय २० संघात स्थान देऊन त्याची वाटचाल वेगवान करावी, असे आवाहन त्यांनी निवड समितीला केले आहे. या वर्षाच्या सुरुवातीला भारताच्या १९ वर्षांखालील विश्वचषक विजयात मोलाची कामगिरी बजावल्यानंतर, वैभव सूर्यवंशीने राजस्थान रॉयल्सकडून केलेल्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर आयपीएल २०२६ मध्ये आपली जबरदस्त छाप पाडली आहे.

## बंगळुरू प्ले-ऑफमध्ये स्थान मिळविणारा पहिला संघ

# पंजाब किंग्सचा सलग सहावा पराभव



**व्यंकटेश अय्यर सामनावीर (४० चेंडूंत नाबाद ७३ धावा)**

♦ **धर्मशाला, १७ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने फलदाजी आणि गोलंदाजीत जबरदस्त प्रदर्शन करत पंजाब किंग्सवर २३ धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला. ४० चेंडूंत नाबाद ७३ धावा करणारा व्यंकटेश अय्यर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

या विजयाबरोबरच रजत पाटीदारच्या नेतृत्वाखालील बंगळुरूचा संघ आयपीएल २०२६ च्या प्लेऑफमध्ये पोहोचणारा पहिला संघ ठरला, पण पंजाब किंग्सची घसरण सुरूच राहिली. पंजाबने आपला सलग सहावा सामना गमावला. केवळ एक सामना शिल्लक असताना पंजाब किंग्सची स्थिती बिकट झाली आहे. त्यामुळे त्यांचे प्लेऑफमधील स्थान गंभीर संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

रजत पाटीदारच्या नेतृत्वाखालील बंगळुरूने १८ गुणांसह अव्वल कायम राखले. बंगळुरूने १३ सामन्यांपैकी ९ सामने जिंकले व चार सामन्यात पराभव पत्करला. या पराभवानंतर पंजाब किंग्सने १३ गुणांसह सध्या तरी आपले चौथे स्थान कायम राखले आहे.

पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला, परंतु तो त्याच्या अंगलट आला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने २० षटकांत ४ बाद २२२ धावा उभारल्या ाणि पंजाबसमोर विजयासाठी २२३ धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु पंजाब किंग्सला मर्यादित षटकांत ८ बाद १९९ धावांपर्यंतच मजल मारता आली.

डावाची सुरुवात करताना बंगळुरूचा सलामीवीर जेकब बेथेल (११) लवकरच बाद झाला, हरप्रीत ब्रारने त्याचा त्रिफळा उडविला, परंतु त्यानंतर विराट कोहली (५८), देवदत्त पडिक्कल (४५), व्यंकटेश अय्यर (नाबाद ७३) व टिम डेव्हिडने (२८) धुव्वाधार फलंदाजी करत बंगळुरूच्या धावसंख्येला आकार दिला. विराट कोहलीने देवदत्तसोबत दुसऱ्या गड्यासाठी ७६ धावांची, तर व्यंकटेश अय्यरसोबत तिसऱ्या गड्यासाठी ६० धावांची भागीदारी केली. देवदत्तने २५ चेंडूंत ४५ धावांची भर घातली, तर कोहलीने ३७ चेंडूंत ४ चौकार व ३ षट्कारांसह ५८ धावांची अर्धशतकी खेळी केली. पुढे व्यंकटेश अय्यरने टिम डेव्हिडच्या साथीने नाबाद खेळी करत आपल्या संघाला २२२ धावांचा टप्पा गाठून दिला. अखेरच्या चेंडूवर अर्शदीप सिंगने हरप्रीत ब्रारकडून झेलबाद करण्यापूर्वी टिम डेव्हिडने १२ चेंडूंत २ चौकार व २ षट्काराच्या मदतीने २८ धावांचे योगदान दिले. व्यंकटेश अय्यरने ४० चेंडूंत ८ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने नाबाद ७३ धावांची खेळी केली.

विजयासाठी २२३ धावांचा पाठलाग करताना पंजाब किंग्सची त्रेधातिरपीट उडाली. भुवनेश्वर कुमारने डावाच्या प्रारंभीच पंजाब किंग्सला दोन जबरदस्त हादरे देऊन त्यांच्या फलंदाजीतील हवाच काढून घेतली. भुवनेश्वरने प्रियांश आर्या ( ०) व प्रभसिमरन सिंग (२) या सलामी जोडीला बाद केले. पुढे चौथ्या षटकांत रसिख सलामने श्रेयस अय्यरला (१) आपले लक्ष्य केले. पंजाबने १९ धावांत तीन मोहरे गमावले. त्यानंतर कूपर कोनोली (३७), सूर्यांश शेडगे (३५), मार्कस स्टोइनिस (३७), शशांक सिंगने (५६) छोट्या-छोट्या भागीदारी करत पंजाब किंग्सला विजय मिळवून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले, परंतु त्यांचे प्रयत्न पुरेसे ठरले नाही. अझमतुल्लाह ओमरझाई ( १४) व हरप्रीत ब्रारने (नाबाद ५) आपल्या अल्पशा प्रयत्नाने पंजाबला २० षटकांत ८ बाद १९९ धावांपर्यंत पोहोचवू दिले. बंगळुरूकडून रसिख सलामने ३ बळी, भुवनेश्वर कुमारने २ बळी, तर जोश हेझलवूड, सुयश शर्मा व शेफर्डने प्रत्येकी एक बळी टिपत पंजाबला लक्ष्य गाठण्यापासून दूर ठेवले. (वृत्तसंस्था)

## सात्त्विकसाईराज-चिराग शेट्टीला थायलंड ओपनचे उपविजेतेपद



सुवर्णपदक विजेत्या जोडीसोबत रौप्यपदक विजेते सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी

♦ **पातुमवान (थायलंड), १७ मे**

भारताची अव्वल पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी आणि चिराग शेट्टीला थायलंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. थायलंडमधील निमिबुत्र स्टेडियमवर ५३ मिनिटे चाललेल्या अंतिम सामन्यात, त्यांना इंडोनेशियाच्या लिओ रॉली कार्नांडो आणि डॅनियल मार्थिन यांच्याकडून २१-१२, २५-२३ अशा गुणांनी पराभव पत्करावा लागला.

पहिला गेम अत्यंत कठीण ठरला; यात सात्विक आणि चिरागला आपला सूर गवसणे कठीण गेले आणि इंडोनेशियाच्या जोडीने वेगाने गुण मिळवत २१-१२ असा विजय नोंदवला. दुसऱ्या गेममध्ये मात्र या भारतीय जोडीने जोरदार पुनरागमन केले. त्यांनी कडवी झुंज दिली आणि सामना अगदी शेवटच्या क्षणापर्यंत नेला; जिथे सलग चार चॅम्पियनशिप पॉइंट्स वाचवूनही, अखेरीस त्यांना २५-२३ अशा गुणांनी पराभव स्वीकारावा लागला.

**विजेतेपदाची प्रतीक्षा कायम**

पुन्हा एकदा अंतिम फेरीपर्यंत मजल मारूनही, या पराभवामुळे या भारतीय जोडीची विजेतेपदाची प्रतीक्षा आता दोन वर्षांपर्यंत लांबली आहे, तर दुसरीकडे, या विजेतेपदासह या इंडोनेशियन जोडीने पातुमवानमधील आपल्या स्वप्नवत कामगिरीचा यशस्वी समारोप केला. (वृत्तसंस्था)

## ध्रुव जुरेल, रियानची अर्धशतके

**राजस्थान रॉयल्स ८ बाद १९३**




♦ **नवी दिल्ली, १७ मे**

इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात कर्णधार रियान पराग व ध्रुव जुरेलने झळकावलेल्या अर्धशतकांच्या बळावर राजस्थान रॉयल्सने २० षटकांत ८ बाद १९३ धावा रचल्या आणि दिल्लीसमोर विजयासाठी १९४ धावांचे लक्ष्य ठेवले.

दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून आपल्या घरच्या मैदानावर प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, कर्णधाराच्या निर्णयाला प्रतिसाद देत दिल्लीच्या गोलंदाजांनी आपली जबाबदारी चोखपणे बजावली, परंतु त्यापूर्वीच राजस्थानच्या पहिल्या फळीतील फलंदाजांनी संघाची स्थिती भक्कम केली.

दुसऱ्या षटकांत लुंगी नगिदीने सलामीवीर यशस्वी जयस्वालला (१२) स्टार्ककडून झेलबाद केल्यानंतर वैभव सूर्यवंशी, ध्रुव जुरेल आणि कर्णधार रियान परागने दमदार फलंदाजी करीत संघाची स्थिती भक्कम केली. सूर्यवंशीचे अर्धशतक थोडक्यात हुकले, त्याने २१ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांसह ४६ धावांची खेळी केली. नगिदीने पायचित करण्यापूर्वी ध्रुव जुरेलने ४० चेंडूंत ५ चौकार व २ षट्कारांसह ५३ धावांची, तर स्टार्कच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी रियान परागने २६ चेंडूंत ३ चौकार व तब्बल ५ षट्कारांच्या मदतीने ५१ धावांची अर्धशतकी खेळी केली. ध्रुव जुरेलने एक बाजू सांभाळीत असताना राजस्थानचे इतर फलंदाज एका पाठोपाठ लवकरच बाद होत गेले. राजस्थानने २० षटकांत ८ बाद १९३ धावा उभारल्या. दिल्लीकडून मिचेल स्टार्कने ४ बळी, लुंगी नगिदी व माधव तिवारीने प्रत्येकी २ बळी टिपले. (वृत्तसंस्था)

### आयपीएल गुणतालिका

| संघ | सामने | विजय | पराभव | गुण | नेट रनरेट |
|---|---|---|---|---|---|
| रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू | १३ | ९ | ४ | १८ | १.०६५ |
| गुजरात टायटन्स | १३ | ८ | ५ | १६ | ०.४०० |
| सनरायझर्स हैदराबाद | १२ | ७ | ५ | १४ | ०.३३१ |
| पंजाब किंग्स | १३ | ६ | ६ | १३ | ०.२२७ |
| राजस्थान रॉयल्स | ११ | ६ | ५ | १२ | ०.०८२ |
| चेन्नई सुपर किंग्स | १२ | ६ | ६ | १२ | ०.०२७ |
| कोलकाता नाईट रायडर्स | १२ | ५ | ६ | ११ | -०.०३८ |
| दिल्ली कॅपिटल्स | १२ | ५ | ७ | १० | -०.९९३ |
| मुंबई इंडियन्स | १२ | ४ | ८ | ८ | -०.५०४ |
| लखनौ सुपर जायंट्स | १२ | ४ | ८ | ८ | -०.७०१ |

## चेन्नईला विजयाची आवश्यकता

♦ **चेन्नई, १७ मे**

सध्या सुरू असलेल्या १९ व्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ च्या ६३ व्या सामन्यात सोमवारी एम.ए. चिदम्बरम स्टेडियमवर पाच वेळचा विजेता चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) आणि सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) हे संघ आमने-सामने उभे ठाकणार आहेत.

आयपीएलच्या गुणतालिकेत सध्या १४ गुणांसहसनरायझर्स हैदराबाद तिसऱ्या स्थानावर आहे, तर १२ गुणांसह चेन्नई सहाव्या स्थानावर आहे. पिवळ्या जर्सीतील चेन्नई संघाने १२ सामन्यांपैकी सहा सामने जिंकले असून तितक्याच सामन्यांमध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. हंगामाची सुरुवात सलग तीन पराभवांनी झाली असूनही, प्ले-ऑफमध्ये स्थान मिळवण्याच्या शर्यतीत ते अजूनही खंबीरपणे टिकून आहेत. त्यांच्या मागील सामन्यात लखनौ येथील एकाना स्टेडियमवर त्यांना लखनौ सुपर जायंट्सकडून दारुण पराभव स्वीकारावा लागला होता. या स्पर्धेतील आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी, या अत्यंत महत्त्वाच्या सामन्यात त्यांना विजयाची नितांत गरज आहे.

दुसरीकडे, सनरायझर्स हैदराबादला गुजरात टायटन्सविरुद्ध मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले; या सामन्यात त्यांचा संपूर्ण संघ अवघ्या ८६ धावांत गारद झाला होता. गुणतालिकेत हा संघ तिसऱ्या क्रमांकावर असून, त्यांनी १२ सामन्यांपैकी सात सामने जिंकले आहेत. जर त्यांनी चेन्नई विरुद्धचा हा सामना जिंकला, तर प्ले-ऑफसाठी पात्र ठरण्याची त्यांची शक्यता लक्षणीयरीत्या वाढेल. (वृत्तसंस्था)

### कार्तिक शर्मामुळे चेन्नईच्या चौथ्या क्रमांकासाठीचा फलंदाजीचा प्रश्न सुटला



फिरकी गोलंदाजांवर जोरदार प्रहार करणारा फलंदाज म्हणून मिळवलेली प्रतिष्ठा घेऊन कार्तिक शर्मा आयपीएलमध्ये दाखल झाला होता; मात्र, त्याच्या खेळाचे खरे सामर्थ्य समोर येण्यासाठी त्याला काही काळ व योग्य भूमिका मिळण्याची प्रतीक्षा करावी लागली. गत शुक्रवारी लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध मोहम्मद शमीच्या गोलंदाजीवर एक्स्ट्रा-कव्हरवरून एक जबरदस्त षट्कार मारून कार्तिक शर्मानेआपले अर्धशतक पूर्ण केले. लखनौच्या अवघड खेळपट्टीवर कार्तिकने ४२ चेंडूंमध्ये ७१ धावा केल्या. आयपीएलच्या एका असामान्य खेळपट्टीवर, जिथे चांगल्या किंवा अवघड टप्प्यावर चेंडू वेगाने उसळत होता, तिथे कार्तिकने आपल्या मधल्या फळीतील खेळाचा वेग आणि क्षमता दाखवून दिली. लखनौमध्ये, त्याने आपल्या बलस्थानांचा वापर केला आणि शहबाज अहमदच्या डावखुऱ्या फिंगरस्पिनवर वर्चस्व गाजवले.


### आजचा सामना

**चेन्नई सुपर किंग्स वि. सनरायझर्स हैदराबाद**
**स्थळ** : एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

## आयसीसी महिला टी-२० विश्वचषकासाठी ९ संघ जाहीर

♦ **नवी दिल्ली, १७ मे**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ क्रिकेट स्पर्धेसाठी उलटगनती सुरू झाले आहे, आणि यंदा ही स्पर्धा पूर्वीपेक्षा अधिक मोठी आणि रोमांचक होणार आहे. पहिल्यांदाच, १२ संघ विजेतेपदासाठी स्पर्धा करतील. विशेष म्हणजे, क्रिकेटची पंढरी मानल्या जाणाऱ्या इंग्लंडमध्ये ही स्पर्धा जून-जुलै दरम्यान आयोजित केली जाईल. नऊ देशांनी आपले संघ जाहीर केले आहेत, तर तीन देशांच्या संघांची घोषणा होणे शिल्लक आहे.



बर्मिंगममधील ऐतिहासिक एजबॅस्टन क्रिकेट मैदानावर श्रीलंकेशी सलामीच्या सामन्यात होईल.

महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेला १२ जून रोजी सुरुवात होईल. यजमान इंग्लंडचा सामना बर्मिंगममधील ऐतिहासिक एजबॅस्टन क्रिकेट मैदानावर श्रीलंकेशी सलामीच्या सामन्यात होईल. ही स्पर्धा २४ दिवसांत ३३ सामन्यांसह खेळविली जाईल, आणि अंतिम सामना ५ जुलै रोजी क्रिकेटच्या सर्वात प्रतिष्ठित मैदानावर, लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर होईल.

यावर्षी, स्पर्धेची दोन गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. गट 'अ' मध्ये भारत, सहा वेळचा विजेता ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, बांगलादेश आणि पदार्पण करणारा नेदरलॅण्ड यांचा समावेश आहे. गतविजेते न्यूझीलंड, वेस्ट इंडीज, इंग्लंड, श्रीलंका, स्कॉटलंड आणि आयर्लंड यांची 'गट ब' मध्ये निवड झाली आहे. भारतीय संघाने आपला १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. हरमनप्रीत कौर संघाचे नेतृत्व करेल, तर सहा वेळा विजेतेपद पटकावलेल्या ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व सोफी मोलिन्यू करेल. इंग्लंडने नॅट सायव्हर-ब्रंटला कर्णधार म्हणून नियुक्त केले आहे. न्यूझीलंडचे नेतृत्व अमेलिया केर करेल. पाकिस्तानचे कर्णधारपद फातिमा सना भूषवेल, तर दक्षिण आफ्रिकेचे कर्णधारपद लॉरा वॉल्व्हार्ड भूषवेल.

'गट अ' मधील सर्व सहा संघ जाहीर झाले आहेत. तथापि, 'गट ब' मधील सहापैकी तीन संघ अद्याप जाहीर व्हायचे आहेत. आयर्लंड, श्रीलंका आणि वेस्ट इंडिज यांनी अद्याप आपले संघ जाहीर केलेले नाहीत. आता सर्वांचे लक्ष या तीन संघांतील खेळाडूंवर असेल. (वृत्तसंस्था)

## विणकर बागेत नवीन 'ओपन जिम'चे लोकार्पण

### वृक्षारोपण करून नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांचा वाढदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे -**

येथील विणकर बागेत सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या नवीन ओपन जिमचा लोकार्पण सोहळा 'हरिओम विणकर बाग संस्थेचे' अध्यक्ष बालाजी जंगम यांच्या अध्यक्षतेखाली अतिशय उत्साहात संपन्न झाला.

नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांच्या ३९ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. डॉ. देशमुख यांच्या हस्ते फीत कापून ओपन जिमचे उद्घाटन करण्यात आले. वाढदिवसानिमित्त बागेत ३९ विविध झाडे लावून वृक्षारोपण करण्यात आले, तसेच प्रारंभी विणकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



हे जिम साहित्य विणकर बागेत बसविण्यासाठी नगरसेवक अमर पुदाले यांनी विशेष प्रयत्न केले, तर नगरसेवक प्रवीण दर्गे पाटील, बबिता धुम्मा आणि गीता गवई यांचे मोलाचे सहकार्य लाभले. बागेतील झाडांना पाणी देण्यासाठी पाईपलाईनचे कामही या निमित्ताने पूर्ण करण्यात आले आहे. या कार्यक्रमास स्वीकृत नगरसेवक ज्ञानेश्वर न्याकल यांची प्रमुख उपस्थिती होती. विणकर बागेच्या पुढील सुधारणांसाठी आणि विकासासाठी आपल्या नगरसेवक निधीतून आवश्यक तो निधी देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. संस्थेचे विश्वस्त संजीव नादरगी यांचे सुपुत्र डॉ. राघवेंद्र नादरगी यांना 'निमा' (नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन) तर्फे 'आयुर्वेदिक धन्वंतरी तज्ज्ञ' मिळाल्याबद्दल हरिओम संस्थेच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच उद्यानप्रमुख कोमल काशीद मॅडम आणि बागेला सहकार्य करणाऱ्या सर्व नगरसेवकांचाही हरिओम संस्थेच्या वतीने कृतज्ञतापूर्वक सत्कार करण्यात आला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना बालाजी जंगम यांनी विणकर बागेत ओपन जिम उपलब्ध करून दिल्याबद्दल सर्व नगरसेवकांचे मनापासून आभार मानले आणि भविष्यातही बागेच्या विकासासाठी असेच सहकार्य लाभत राहील, अशी आशा व्यक्त केली. या सोहळ्याला हरिओम विणकर बागेचे सर्व सभासद, पदाधिकारी, हरिओम सुप्रभात मंडळाचे पदाधिकारी, योगासन ग्रुप, गायन ग्रुप आणि परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीकांत दंडी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गणेश सिद्धम यांनी मानले.

## महत्वाचे...



### काम करणाऱ्यांनाच देणार पदे : नागेश फाटे

**पंढरपूर, दि.१७ मे -**

उत्तर सोलापूर तालुक्यात नूतन पदाधिकारी निवडताना जे पक्षासाठी काम करतील, त्यांनाच संधी देणार असल्याचे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेस श.प. पक्षनिरीक्षक नागेश फाटे यांनी दिले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विविध सेलच्या इच्छुक पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती नुकत्याच वडाळा येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संपर्क कार्यालयात पार पडल्या. यावेळी नागेश फाटे बोलत होते. नागेश फाटे यांनी इच्छुक पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या. यावेळी पक्ष वाढीसाठी आणि पक्ष अधिक बळकट करण्यासाठी कोणते प्रयत्न करता येतील, याबाबत इच्छुक उमेदवारांची मते जाणून घेण्यात आली. पक्षाच्या माध्यमातून युवक, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचून संघटन विस्तार करण्यावर भर दिला. तालुक्यातील विविध भागांतून आलेल्या इच्छुकांनी मुलाखतीत सहभाग नोंदवला. मुलाखतीदरम्यान तालुकाध्यक्ष तुषार साठे, उद्योग व्यापार विभागाचे प्रदेश सदस्य विजय काळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शुभम पैकीकर, स्वप्निल कुंभार, दीपक क्षीरसागर, उमेश लोकरे, प्रतीक साठे, सुशांत देवकुळे, सागर मोहिते आणि ज्ञानेश्वर लोंढे यांनी आपली मते मुलाखतीत स्पष्ट शब्दात मांडली. सोलापूर तालुक्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने या मुलाखतींना महत्त्व प्राप्त झाले असून आगामी काळात नव्या पदाधिकाऱ्यांची घोषणा होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### पैसे देण्याच्या बहाण्याने बोलावून तरुणास मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १७ मे-**

जेसीबी रिपेअरिंगचे पैसे देण्याच्या बहाण्याने बोलावून घेऊन शिवीगाळ करत एका तरुणावर लोखंडी पाईपने जीवघेणा हल्ला केल्याची घटना शुक्रवारी बसवेश्वर चौक येथे घडली आहे. याप्रकरणी चार जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुबैर मुजावर, उबेद मुजावर आणि दोन अनोळखी साथीदार सर्व राहणार सोलापूर अशी गुन्हा दाखल. करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत फिरोज हमीदखान पठाण ( रा. कुर्बान हुसेन नगर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी फिरोज याला शुक्रवार रोजी आरोपी उबेद मुजावर याच्या आईने जेसीबी रिपेअरिंगचे पैसे देण्यासाठी बसवेश्वर चौक येथे बोलावून घेतले होते. त्याप्रमाणे फिरोज तेथे जाऊन बोलत असताना आरोपी जुबैर मुजावर आणि उबेद मुजावर यांनी त्यांना विनाकारण शिवीगाळ व दमदाटी करण्यास सुरुवात केली. यावेळी फिरोज यांचा भाचा अबुहसीब हा वाद सोडवण्यासाठी मध्ये आला असता, जुबैर याने इसको मार असे म्हणत चिथावणी दिली. यानंतर उबेद आणि त्याच्या इतर दोन अनोळखी साथीदारांनी अबुहसीबला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच उबेदने जवळच पडलेला लोखंडी पाईप उचलून अबुहसीबच्या डोक्यात मारून त्याला गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हवालदार शिंदे हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

### शेतकी फार्मच्या विहिरीत आढळला एका पुरुषाचा मृतदेह

**सोलापूर, दि. १७ मे -**

हैदराबाद रोडवरील शासकीय कृषी विभागाच्या शेतातील विहिरीमध्ये एका ५० वर्षीय अनोळखी पुरुषाचा मृतदेह आज रविवारी सकाळी साडेअकरा वाजता आढळून आला. रविवारी सकाळी हा मृतदेह पाण्यावर तरंगताना तेथील स्थानिक लोकांना आढळून आला. ही खबर जोडभावी पेठ पोलिसांना समजली असता सहाय्यक फौजदार एस व्ही जगताप यांनी घटनास्थळी पोहचून सदरचा मृतदेह इतरांच्या मदतीने बाहेर काढून येथील शासकीय रुग्णालयात दुपारी दोन वाजता शव विच्छेदनासाठी दाखल केला.

### वाहन धडकेत जखमी झालेल्या गुंजेगाव येथील नवविवाहित तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १७ मे -**



अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या गुंजेगाव येथील एका दुचाकी स्वाराचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शनिवारी रात्री आठ वाजता मृत्यू झाला. आयान कय्युम शेख (वय २० वर्ष, रा. गुंजेगाव, दक्षिण सोलापूर) असे त्या मयत तरुणाचे नाव असून तो १४ मे रोजी पहाटे आपल्या कामावरून गावाकडे जाण्यासाठी दुचाकीवरून निघाला असताना सकाळी सहा वाजेच्या सुमारास गुंजेगाव जवळ शिंगोली रोड येथे त्याला एका अज्ञात चारचाकी वाहनाने धडक दिली होती . यात मार लागून गंभीर जखमी झाल्याने त्याला एका खाजगी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात नातेवाईक साजिद मुलानी यांनी बेशुद्ध अवस्थेत सायंकाळी दाखल केले असता त्याचा उपचारादरम्यान शनिवारी रात्री आठ वाजता मृत्यू झाला.

> मयत आयान शेख हा येथील रेल्वे स्थानकावर कंत्राट पद्धतीने मजुरीचे काम करायचा .कुटुंबात तो एकुलता एक मुलगा असून त्याचे घटनेच्या वीस दिवसापूर्वीच लग्न झाले होते .त्याच्या पश्चात आई आणि एक विवाहित बहीण असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

## निधन वृत्त...

### रफीक नल्लामंदू

**सोलापूर, दि. १७ मे -**



तेसंगी पाच्छा पेठ येथील रहिवासी म. रफीक जाफर नल्लामंदू ( वय ७२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सकाळी ९ वाजता जडेसाब कब्रस्तान येये दफनविधी करण्यात आली. पानगल प्रशालेचे निवृत्त मुख्याध्यापक युसूफ नल्लामंदू यांचे लहान भाऊ तर प्रा. डॉ. कदीर बिजापूरे यांचे ते सासरे होते.

# ‘टेंभू’चे पाणी माण नदीत पोहचले

### शेतकऱ्यांना मोठा दिलासा; आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ मे-**





टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाच्या पाण्याचे सांगोल्यासाठी आवर्तन सुरू झाले आहे. टेंभूच्या पाण्याने आटपाडी तलाव भरल्यानंतर आता माण नदीत ते पाणी सोडले आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात दुष्काळी परिस्थितीत सांगोल्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन टेंभू उपसा सिंचन योजनेतून माण नदीला उन्हाळी आवर्तनाचे पाणी सोडावे अशी मागणी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दि.२८ एप्रिल रोजी लेखी पत्र देऊन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. ती अखेर मान्य झाली असून आता पाणीही माण नदीत आले असल्याने शेतीच्या सिंचनासह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सुटला आहे.

ऐन उन्हाळ्यात टेंभूचे पाणी मिळाल्याने पिण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. परिणामी माणनदी नदीकाठावरील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी माण नदीत सोडण्याची मागणी मान्य केल्याबद्दल जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील त्याचबरोबर पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आभार मानले आहेत.

> **खवासपूर ते मेथवडे पर्यंतचे सर्व बंधारे भरणार**
>
> सांगोल्यात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी टेंभू योजनेतून लाभक्षेत्रातील जुनोनी, हातीद, पाचेगांव जुजारपूर, हटकर मंगेवाडी, राजुरी या गावातील तलाव, बंधारे पूर्ण क्षमतेने भरून पाणी माण नदीमध्ये सोडून खवासपूर ते मेथवडे पर्यंतचे सर्व बंधारे भरण्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## माढ्यात नगरसेवक गाडेकर यांच्यावतीने अतिक्रमण नियमितकरण नोंदणी व मार्गदर्शन शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १७ मे-**

माढा शहरातील श्रीराम नगर श्री गणेश मंदिरात स्वीकृत नगरसेवक दिनेश गाडेकर यांनी अतिक्रमण नियमितीकरण नोंदणी व मार्गदर्शन शिबिराचे रविवारी आयोजन केले होते. शिबिराचे उद्घाटन भाजप नेते तथा जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

शिबिरात महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार दि. ९ सप्टेंबर २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी सहभाग नोंदवला. यावेळी नागरिकांना अर्ज व आवश्यक फॉर्मचे वाटप करण्यात आले. तसेच जवळपास ११० नागरिकांची प्राथमिक नोंदणी करण्यात आली असून लवकरच संबंधित अर्ज शासकीय स्तरावर जमा करून पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती दिनेश गाडेकर यांनी दिली.



याप्रसंगी झुंजार भांगे, नगरसेविका संजीवनी भांगे, नगरसेवक राजू गोटे, शहाजी चवरे, समर्थ भांगे, अनिकेत चवरे, मोतीलाल सुतार, क्रांती पाटील, औदुंबर चवरे उपस्थित होते. यावेळी रणजीतसिंह शिंदे यांनी नगरसेवक दिनेश गाडेकर यांच्या कार्याचे कौतुक करुन भविष्यात कुठलीही अडचण आल्यास पूर्ण सहकार्य केले जाईल, असे आश्वासन दिले.

झुंजार भांगे यांनी नागरिकांसाठी असे उपयुक्त शिबिर आयोजित केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. प्रास्ताविक नगरसेवक दिनेश गाडेकर यांनी केले. आभार अमोल खरात यांनी मानले.

## बार्शीत २८ लाखांचा गुटखा जप्त; दोघांवर गुन्हा

### आयपीएस अंजना कृष्णांचा ‘सर्जिकल स्ट्राईक’

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १७ मे-**

बार्शी शहरातील अवैध गुटखा व्यवसायावर आयपीएस अंजना कृष्णा यांनी ‘सर्जिकल स्ट्राईक’ केला आहे. तब्बल २७ लाख ८७ हजार ९०२ रुपये किंमतीचा गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून संबंधित गोदाम प्रशासनाने सील केले आहे.

बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा यांना शहरातील बालाजी कॉलनी परिसरातील एका गोदामात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा साठवल्याची माहिती मिळाली. त्यानुसार बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, सहायक पोलीस निरीक्षक बाळासाहेब जाधव व पथकाने शनिवार दि.१६ मे रोजी सायंकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास तेथे छापा टाकला.

पोलीस घटनास्थळी पोहोचताच कारवाईची माहिती मिळाल्याने संशयित आरोपी गोदामाला कुलूप लावून पसार झाले होते. पोलिसांनी पंचांसमक्ष गोदामाचे कुलूप उघडले. गोदामात पोलिसांना मोठ्या प्रमाणात गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूच्या गोण्या आढळून आल्या. विविध नामांकित ब्रँड्सच्या लहान-मोठ्या तब्बल ९७ गोण्या जप्त केल्या. एवढा मोठा मुद्देमाल पोलिस ठाण्यात हलविण्यासाठी पोलिसांना तब्बल तीन मालवाहू पिकअप मागवावे लागले.

सोलापूर येथील अन्न सुरक्षा अधिकारी रामानंद उमाशंकर स्वामी यांनी रात्री उशीरा जप्त मालाची तपासणी केली. तपासणीदरम्यान जप्त पाकिटांमध्ये सुपारी, सुगंधित तंबाखू, कात, चुना व इतर घटकांचे मिश्रण असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्यांनी फिर्याद दाखल केली. या प्रकरणी बिलाल शब्बीर तांबोळी व सरफराज शरीफ तांबोळी (बागड), दोघे रा. बार्शी, यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

> **गोदाम सील; पुरवठादारांचा शोध सुरु**
>
> प्रतिबंधित अन्नपदार्थांचा पुन्हा वापर अथवा साठा होऊ नये म्हणून संबंधित गोदाम प्रशासनाने तात्काळ सील केले आहे. जप्त मालाचे नमुने विश्लेषणासाठी वेगळे काढून उर्वरित मुद्देमाल पोलिस ठाण्यात सुरक्षित ठेवला आहे.

> आरोपींचे राजकीय कनेक्शन चर्चेत
>
> स्थानिक स्तरावर राजकीय पाठबळाच्या जोरावर हा अवैध व्यवसाय दीर्घकाळ सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. आयपीएस अंजना कृष्णा यांच्या धडक कारवाईमुळे गुटखा माफियांचे मोठे जाळे उघडकीस आले आहे.

## बार्शी शहर पोलिस ठाण्यासमोर दोन गटात जोरदार दगडफेक

### तुफान राडा; ५० ते ६० जणांचा हैदोस

### दगडफेक, तोडफोड होऊनही गुन्हा दाखल नाही; ‘समेटा’च्या चर्चेने नागरिकांमध्ये संताप

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.१७ मे-**

बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या गेटसमोरच दोन गटांमध्ये झालेल्या तुफानी दगडफेक करण्यात आली. जवळपास ६० जणांनी हैदोस घातला. शनिवार दि. १६ मे रोजी रात्री सुमारे १०-४६ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला.

विशेष म्हणजे, हा सर्व प्रकार थेट पोलिस ठाण्यासमोर घडत असताना अद्याप कोणतीही अधिकृत फिर्याद दाखल झाली नसल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे.घटनेदरम्यान पोलिस स्टेशनसमोरील स्टँड चौक परिसरातील अनेक दुकानांवर दगडफेक झाली.

यामध्ये चहा टपऱ्या, हॉटेल, चायनीज गाडे आणि लहान व्यावसायिकांच्या दुकानांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. अचानक झालेल्या दगडफेकीमुळे परिसरातील व्यापाऱ्यांनी भीतीपोटी तातडीने दुकाने बंद केली.

पोलीस ठाण्याच्या समोरच मुख्य बसस्थानक असल्याने रात्री उशिरापर्यंत प्रवाशांची मोठी वर्दळ असते. या दगडफेकीमुळे एसटीने प्रवास करुन आलेल्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि प्रवाशांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली. अचानक आरडाओरड, शिवीगाळ आणि दगडफेकीचा आवाज सुरु झाल्याने काही काळ परिसरात अक्षरशः भीतीचे वातावरण पसरले होते.

**पोलिसांसमोरच दादागिरी**

घटनेचा आवाज ऐकताच पोलीस ठाण्यातील कर्मचारी बाहेर आले आणि दोन्ही गटांना शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिस ठाण्याच्या गेटसमोरच जमावाकडून सुरु असलेल्या दगडफेकीवरुन संबंधितांना पोलिसांचा धाक उरलेला नसल्याचे चित्र स्पष्ट दिसून आले. पोलीस ठाण्याच्या दारात उभे राहूनही दोन्ही गटांतील व्यक्ती निर्भयपणे दगडफेक करत होते. घटना शांत झाल्यानंतर दोन्ही गटांतील काही प्रमुख व्यक्तींनी आपापसात समेट घडवून आणल्याच्या चर्चा शहरात रंगल्या आहेत. एका गटाकडून उदय टॉकीज परिसरात एका रिक्षाची तोडफोड केल्याची माहिती समोर आली आहे. नागरिक कारवाईची मागणी करत आहेत.

## ‘मराठीतून तेलुगू शिका’ उपक्रम सोलापुरात यशस्वी

### मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप; सोप्या नोट्स आणि ‘डिजिटल होमवर्क’चे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

भाषेच्या भिंती ओलांडून दोन संस्कृतींना एकत्र आणण्याच्या उद्देशाने पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय आणि हृदय स्पर्श बहुउद्देशीय समाजसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘मराठीतून शिका तेलुगू लिहायला आणि वाचायला’ या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाची सांगता व प्रमाणपत्र वाटप सोहळा रविवारी मोठ्या उत्साहात पार पडला.

अध्यक्षस्थानी वाचनालयाचे उपाध्यक्ष देविदास गोटीपामूल, प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. माणिक अंबाजी गुर्रम, तर विशेष अतिथी म्हणून पत्रकार श्रीनिवास बुरा तसेच वाचनालयाचे संचालक अशोक इंदापुरे आणि अरविंद चिन्नी यांची उपस्थिती होती.

डॉ. माणिक गुर्रम यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, सोलापूर हे बहुभाषिक शहर असून, अशा उपक्रमांमुळे समाजा-समाजातील संवाद वाढतो.



भाषेचे ज्ञान हे केवळ संवादासाठी नाही, तर मनांना जोडण्यासाठी आवश्यक आहे. तर श्रीनिवास बुरा यांनी बदलत्या काळात दोन भाषांचे ज्ञान असणे हे प्रगतीसाठी कसे महत्त्वाचे आहे, यावर प्रकाश टाकला.

या उपक्रमाचे मुख्य प्रशिक्षक काशिनाथ गंजी यांनी चित्रपट दिग्दर्शनाच्या शैलीतून विद्यार्थ्यांना अत्यंत रंजक पद्धतीने तेलुगू भाषेची ओळख करून दिली. तर सहाय्यक शिक्षक आणि डाक विभागाचे कर्मचारी श्रीरंग रेगोटी यांनी तयार केलेल्या सोप्या ‘स्टडी नोट्स’ आणि व्हॉट्सपच्या माध्यमातून घेतलेला नियमित होमवर्क यामुळे मराठी भाषिक विद्यार्थ्यांना तेलुगू भाषा आत्मसात करणे सहज शक्य झाले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. गौरीशंकर दिकोंडा यांनी आभार मानले. डॉ. अंजली शिरसी यांच्या वंदे मातरम् गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाचे कार्यकारी मंडळ आणि हृदय स्पर्श संस्थेच्या अध्यक्षा नर्मदा गंजी, श्रीनिवास वंगारी, उमेश नक्का, सिद्धलिंगेश्वर विजापूरे, हरिदास पेंटा, रमा इप्पनपल्ली यांनी परिश्रम घेतले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातून मोठे कौतुक होत आहे.

## भारतमाता नगरात ६७ वर्षाच्या वृद्धाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. १७ मे -**

अज्ञात कारणावरून एका ६७ वर्षाच्या वृद्ध इसमाने राहत्या घरात छताच्या लोखंडी पाईपला नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना होटगी रोडवरील भारत माता नगरात शुक्रवारी सायंकाळी सात वाजता उघडकीस आली. भागण्णा बसण्णा कोळी (वय ६७ वर्ष ) असे त्या गळफास घेतलेल्या वृद्धाचे नाव आहे . शुक्रवारी सायंकाळी राहत्या घरात छताच्या पाईपला गळफास घेतलेल्या अवस्थेत भागण्णा हे आढळून आले .घटनास्थळी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे हवालदार घोडके यांनी पोहोचून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात रात्री साडेआठ वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

## बेकायदेशीर दारु विक्री, एकास अटक

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ मे-**

बार्शी ते धाराशिव रोडवरील एका हॉटेलच्या पाठीमागे बेकायदेशीरपणे दारुचा साठा बाळगून विक्री करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी पकडले. याप्रकरणी पांगरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. निर्भया पथक बार्शी येथील कॉंस्टेबल हनुमंत पाडुळे, हेडकॉंस्टेबल बाबासाहेब घाडगे आणि कॉंस्टेबल नम्रता गटकूळ हे सहकाऱ्यांसह पांगरी पोलीस ठाण्याच्या पेट्रोलिंग करत होते. तेव्हा त्यांना याबाबत माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने छापा टाकत धनवंत संदिपान कोंढारे (वय ४५, रा. चिखर्डे, ता. बार्शी) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून व गुन्हा दाखल केला.४३ दारुच्या बाटल्या एकूण ८,६५५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

## बार्शीत युवक काँग्रेसचा ‘महामेळावा’

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; प्राचार्य निलेश गायकवाड यांनी मांडल्या मागण्या

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ मे-**

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्या जिल्हा दौऱ्यानिमित्त बार्शी तालुक्यातील शेळगाव (आर) येथे ‘बार्शी तालुका युवक काँग्रेस मेळावा’ आणि ‘एल. जी. शिक्षण संकुल’ मधील १० वी व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांना फेटे बांधून आणि सन्मानचिन्ह देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव निलेश गायकवाड यांनी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्याकडे परिसरातील अनेक प्रलंबित व महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन सादर केले. त्यात शेळगाव (आर) ते कवठाळी रोडचे काम तातडीने मंजूर करणे, शेळगाव (आर) ते बसवेश्वर चौक सीमा पुढे वाणेवाडी रोडची दुरुस्ती व डांबरीकरण करणे, शेळगाव (आर) ते कळमण रोडची दुरवस्था



दूर करून काम पूर्ण करणे, शेळगाव (आर) मधील मुस्लिम समाजाच्या मशिदीच्या कामासाठी सहकार्य व निधी उपलब्ध करून देणे, स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज अभ्यासिका आदी मागण्याचा समावेश होता. मेळाव्यामुळे बार्शी तालुक्यातील युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नवा उत्साह संचारला आहे.

कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, तरुण, महिला, विद्यार्थी आणि काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **शिक्षणासोबतच परिसराचा शाश्वत विकास हे ध्येय**
>
> विद्यार्थ्यांचा सत्कार करणे हे आमचे कर्तव्य आहेच, पण ज्या समाजात ही मुले राहतात, तिथल्या मूलभूत सुविधा भक्कम असणे तितकेच गरजेचे आहे. म्हणूनच, केवळ सत्कार सोहळ्यापुरते मर्यादित न राहता आम्ही युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांकडे हक्काने या मागण्या मांडल्या आहेत.
>
> **प्राचार्य निलेश गायकवाड**

> **वरिष्ठ नेत्यांच्या माध्यमातून मागण्या मार्गी लावणार**
>
> प्राचार्य निलेश गायकवाड यांनी मांडलेल्या या सर्व मागण्या शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य ग्रामस्थांच्या हिताच्या आहेत. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार जयंत आसगावकर, आमदार सतेज (बंटी) पाटील, खासदार प्रणिती शिंदे आणि खासदार इम्रान प्रतापगाढी यांच्याकडे पाठपुरावा करून हे सर्व प्रश्न तातडीने मार्गी लावू.
>
> **शिवराज मोरे,** प्रदेशाध्यक्ष, युवक काँग्रेस.

# राज्य सरकार करणार १२.३५ रुपयांनी कांद्याची खरेदी

## केंद्र सरकारचे सहकार्य; चिंताक्रांत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मे-**

सतत कोसळणाऱ्या कांद्याच्या दरामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला आहे. बाजार समित्यांमध्ये उत्पादन खर्चही निघत नसल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने हस्तक्षेप करत आजपासून १२ रुपये ३५ पैसे दराने कांदा खरेदी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साताऱ्यातील कार्यक्रमात ही घोषणा केली.

राज्यात उन्हाळी कांद्याचे दर मोठ्या प्रमाणात घसरल्याने अनेक बाजार समित्यांमध्ये प्रतिक्विंटल कांद्याला केवळ ६०० ते ७०० रुपये दर मिळत होता. वाहतूक, मजुरी आणि साठवण खर्च वजा जाता शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागत होते. काही ठिकाणी प्रतिक्विंटल तब्बल १५०० रुपयांपर्यंत तोटा होत असल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने खरेदी प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की,




कांदा उत्पादकांच्या अडचणींबाबत त्यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याशी चर्चा केली होती. केंद्राच्या सहकार्यामुळे महाराष्ट्रात हमीभावाने कांदा खरेदीचा मार्ग मोकळा झाला आहे. यावेळी ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उद्योगासमोरील अडचणी दूर करण्यासाठीही राज्य सरकार सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनामार्फत प्रोत्साहनपर लाभ देण्याची घोषणाही त्यांनी केली.

### कांद्याला किमान २० रुपये भाव देणे आवश्यक

गारपीट अवकाळी पाऊस झाल्यानंतर सरकार जागे झाले आहे. नुकसान झाल्यानंतर राज्य सरकारने १२.३५ रुपये दराने कांदा खरेदी करणार असल्याचे जाहीर केले आहे. मात्र ही मदत तुटपुंजी आहे. कांद्याला किमान २० रुपये भाव देणे आवश्यक आहे. कांद्याचा खर्च जवळपास १७ रुपये असताना १२ रुपये दर परवडणारा नाही. राज्य सरकार ज्या नाफेडद्वारे कांदा खरेदी करणार आहेत. त्यामध्ये अनेक घोटाळे झालेले आहेत. त्याचा लवकरच पर्दाफाश करणार आहे, असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी सांगितले.

### केवळ घोषणा नको अंमलबजावणी आवश्यक

राज्य सरकारने कांदा खरेदी करण्याची घोषणा केली आहे. परंतु त्याची अंमलबजावणी कशा पद्धती केली जाणार आहे. हे महत्त्वाचे ठरणार आहे. ज्या नाफेड या संस्थेमार्फत कांदा खरेदी केली जाणार आहे. त्याची चौकशी होणे गरजेचे आहे. कोणत्या जिल्ह्यात किती केंद्र असणार आहे त्याची माहिती मिळणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कांद्याला मोठ्या प्रमाणावर खर्च येत असताना सरकारने केवळ १२.३५ रुपये जाहीर केले आहेत. त्यामध्ये वाढ करणे गरजेचे आहे, असे कांदा उत्पादक शेतकरी मोहसीन पटेल यांनी सांगितले.

### सरकारने शेतकऱ्यांना वाढीव हमीभाव द्यावा

कांद्याचे दर घसरलेले आहेत. मात्र कांदा पिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च आहे. अशा अवस्थेत सरकारने जाहीर केलेली मदत कमी प्रमाणात आहे. शेतकऱ्यांना किमान २० रुपये दर मिळावा अशी अपेक्षा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपणा कमी होणार आहे. तसेच कांदा लागवडीसाठीसह ईतर येणारा खर्च देखील आवाक्यात येईल, असे श्रीसिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील अडत व्यापारी सादिक बागवान यांनी सांगितले.

## महत्वाचे...

### मेफेड्रोन प्रकरण

### पिरजादे पोलिस कोठडीतच, रिजवान खान यास न्यायालयीन कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मे-**

सोलापुरात १ कोटी ९० लाख रुपये किंमतीचे ९५० ग्रॅम एमडी अर्थात मेफेड्रोन जप्त केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या साहिल सिकंदर पिरजादे यास दोन दिवस वाढीव पोलिस कोठडी, तर आरोपी रिजवान शब्बीर खान (वय-२६, रा.अंबिकानगर भाग-३, नई जिंदगी, सोलापूर) यास न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले.



गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपींकडून दहा लाखांच्या कारसह दोन कोटींची एमडी जप्त केली होती. याप्रकरणी दोघांना अटक केली होती. त्यांची शनिवारी पोलिस कोठडी संपल्याने न्यायालयात हजर केले. मुंबई येथे जाऊन तपास करण्यासाठी पोलिसांनी पोलिस कोठडीची मागणी केली. दरम्यान, आरोपी रिजवान याच्याकडे सापडलेली एमडी त्याने आरोपी साहिल पिरजादे आणि अफजल मुर्शीद (रा.मुस्लिम कब्रस्तानजवळ, सोलापूर) यांच्याकडून मिळाल्याची माहिती दिली होती. या प्रकरणातील मुर्शीदचा शोध सुरू आहे. यात आरोपी खानतर्फे ॲड.शैलेश पोटफोडे, तर सरकार पक्षातर्फे ॲड.दत्तूसिंह पवार हे काम पाहत आहेत.

# युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा कटिबध्द : महाडिक

### युवाशक्ती जागर यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मे-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विकासाची भूमिका समाजापर्यंत नेण्याची जबाबदारी खांद्यावर पेलून युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा कटिबध्द आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी केले. भारतीय जनता युवा मोर्चा सोलापूर शहरच्यावतीने युवाशक्ती जागर यात्रा अंतर्गत आयोजित युवक मेळाव्यात ते बोलत होते.





व्यासपीठावर भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सोलापूर महानगरपालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे, भाजयुमोचे शहराध्यक्ष विजय कुलथे, ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार यांच्यासह शिवराज सरतापे, विनोद भोसले, सत्यनारायण गुर्रम, श्रीनिवास दायमा, अक्षय अंजिखाने, प्रशांत पल्ली, विजय चिप्पा, वनिता पाटील, मृण्मयी गवळी, अंकुश आवताडे, विश्वनाथ प्याटी, प्रकाश घोडके आदी उपस्थित होते.

भारतीय जनता पार्टीने भारतीय जनता युवा मोर्चा सारख्या संघटनांच्या माध्यमातून अनेक कार्यकर्ते घडवले. याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण मेहनत करत आहेत. युवकांच्या शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, कला, क्रीडा या विषयात भारतीय जनता युवा मोर्चा आगामी काळात काम करणार आहे. पक्षाच्या कार्यातही भाजप पक्षाला सहकार्य करेल, असेही त्यांनी सांगितले.

भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर म्हणाल्या, भारत हा सर्वाधिक युवा असणारा देश आहे. भारतीय जनता युवा मोर्चा युवकांसाठी चांगले काम करत आहे. अशा कार्यातूनच कार्यकर्त्यांना ऊर्जा मिळते. देशभरात सर्वाधिक राज्यात भाजपची सत्ता आहे. सोलापूर महानगरपालिका तसेच सोलापूर जिल्हा परिषदेतही आता भाजपाची सत्ता आहे. सोलापूर जिल्हा प्रदेश भाजपाच्या खांद्याला खांदा लावून नक्की काम करेल.

भाजयुमोचे शहर अध्यक्ष विजय कुलथे यांनी प्रास्ताविक केले. मंगेश लामकाने यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी विश्वनाथ प्याटी, यतिराज होनमाने, तुषार पवार, विशाल बनसोडे, आकाश मुदगल, अंबादास पामू, संदीप महाले, केतन अंजीखाने, प्रवीण गलांडे, ओंकार पत्तेवार, शिवानंद कावडे, राहुल डांगरे, रतीकांत कमलापुरे, सोनू खरात, निशांत सावळे, मयूर घुगे, सुमित पाटील, लक्ष्मण सरवदे, रोहन मराठे, रोहित गोरे, गणेश पवार, अनिकेत प्रधाने, ओंकार होमकर, गुरुनाथ कोळी, नरेश दासरी, डोंगरेश चाबुकस्वार, सूरज विटे, अर्जुन मोहिते, अप्पू माळी, अनिल वंगारी, देवेंद्र डेरबेरे, श्रवण साबळे, रविराज वाघमोडे, प्रदीप मोरे, पृथ्वीराज खेरमोडे, ओंकार पवार, रविराज हरसूरे, लखन भोसले, राघव घनाते, श्रीकांत गायकवाड, विक्रांत माळवदकर, आकाश जामदार, राकेश दांडगे, अभिषेक नामा, प्रथमेश कोटा, मनोज अंजीखाने, आशिष राजेश्वर, सोनू अंजीखाने, शुभम सदिगले आदी उपस्थित होते.

# समुद्रकिनाऱ्यांवरील पायाभूत सुविधा, सुशोभीकरण कामांची पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**पणजी, दि. १७ मे-**

गोव्याचे पर्यटन मंत्री रोहन अशोक खंवटे यांनी आज दक्षिण गोव्यातील केळशी व बाणावली समुद्र किनार्यांना भेट देऊन प्रस्तावित पायाभूत सुविधा व सुशोभीकरण कामांसाठी निश्चित करण्यात आलेल्या ठिकाणांची पाहणी केली. यावेळी पर्यटन संचालक केदार नाईक, केळशीचे सरपंच डिक्सन व्हाज, शॅक मालक संघटनेचे अध्यक्ष क्रूझ कार्दोज आदी उपस्थित होते.

दक्षिण गोव्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात देशी व विदेशी पर्यटक भेट देत असल्याने पर्यटन सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आणि पर्यटकांचा अनुभव अधिक चांगला करण्यासाठी सरकारतर्फे हे प्रयत्न करण्यात येत आहेत. मच्छिमार, जलक्रीडा व्यवसायाशी संबंधित सदस्य, शॅक ओनर्स असोसिएशनच्या प्रतिनिधींशी त्यांनी संवाद साधला.

पर्यटन व्यवसाय, समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता, स्थानिकांच्या उपजीविकेशी संबंधित प्रश्न, स्थानिक समुदायासमोरील अडचणी तसेच विविध सुविधांबाबत चर्चा करण्यात आली. आगामी पर्यटन हंगाम सुरळीत पार पडण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर मंत्र्यांनी संबंधितांशी मंत्री रोहन खंवटे यांनी सविस्तर चर्चा केली. गोवा हे देशातील एक प्रमुख पर्यटन स्थळ आहे. त्यामुळे पर्यटनाशी संबंधित पायाभूत सुविधांची स्थिती प्रत्यक्ष पाहणे आणि प्राधान्याने प्रश्न सोडवणे अत्यंत आवश्यक आहे. दक्षिण गोव्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पर्यटक येतात. समुद्रकिनाऱ्यावर भेट देऊन पायाभूत सुविधा, सुशोभीकरण कामे, पादचारी मार्ग, स्वच्छतागृह सुविधांची पाहणी केली, असेही ते म्हणाले.

पर्यटन पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी, स्थानिक समुदाय व पर्यटन क्षेत्राशी संबंधित घटकांना सहकार्य करण्यासाठी तसेच पर्यटकांना अधिक चांगला अनुभव देण्यासाठी पर्यटन विभाग सातत्याने प्रयत्नशील असल्याचे या भेटीतून स्पष्ट झाले. बाणावली येथे पर्यटन मंत्री खंवटे यांनी जेट स्की राईडचा अनुभव घेतला.




# इंधन दरवाढ, नीट पेपरफुटी, पालकमंत्र्यांच्या वक्तव्याविरोधात काँग्रेसने केले थाळीनाद आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

इंधन दरवाढ, नीट पेपरफुटी प्रकरण आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ युवक काँग्रेसने शनिवारी भाजप कार्यालयावर धडक मोर्चा काढत जोरदार आंदोलन केले. पोलिसांनी मोर्चा भाजप कार्यालयासमोर रोखत शेकडो आंदोलकांना ताब्यात घेतले.

खा.प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे आणि शहर युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. आंदोलकांनी थाळीनाद करत केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

यावेळी बोलताना शिवराज मोरे यांनी भाजप सरकारच्या काळात शिक्षण व्यवस्थेची अवस्था गंभीर झाल्याचा आरोप केला. नीट परीक्षेचे वारंवार पेपर फुटत आहेत. लाखो विद्यार्थी आणि पालक मानसिक तणावाखाली आहेत. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा.

इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक कंबरडे मोडल्याचा आरोप करत, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांची सात दिवसांत माफी मागावी, अन्यथा आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष गणेश डोंगरे यांनी दिला.

या आंदोलनात प्रथमेश आबणावे, मेघशाम धर्मावत, गणेश उबाळे, निखिल सुतार, धवलसिंह लावंड, अनंत म्हेत्रे, वाहिद बिजापूरे, महेश लोंढे, तिरुपती परकीपंडला, सुनील सारंगी, शरद गुमटे, सचिन पवार, धीरज खंदारे, प्रतीक शिंगे, शशिकांत शेळके, आशुतोष वाले, महेंद्र शिंदे, विवेक इंगळे आदी सामील झाले होते.

## बकर ईद २८ मे रोजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मे-**

जिल् हिज्जा महिन्याचा चंद्र दिसून आला नाही. त्यामुळे इस्लामिक दिनदर्शिकेनुसार सोमवार सायंकाळी दि.१८ मे पासून जिल् हिज्जा महिन्याची सुरुवात होणार आहे. बकर ईद गुरुवार, दि.२८ मे रोजी असणार आहे. २९ जिल्काद १४४७ हिजरी रोजी चंद्रदर्शन न झाल्याने उर्दू तारीख ३० जिल्काद पूर्ण करण्यात येणार आहे. अरफा (यौमे अरफा) बुधवार, दि. २७ मे रोजी असणार आहे, असे रुईयत-ए-हिलाल कमिटीचे सदर मुफ्ती काझी सय्यद अमजदअली यांनी एका पत्रकान्वये कळविले.




# खा.प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त रणसम्राट सामाजिक संस्थेच्या वतीने वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

खासदार प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त येथील रणसम्राट सामाजिक संस्थेच्या वतीने 'वृक्ष संवर्धन' या उपक्रमांतर्गत पिंपळ, वड, आंबा, जांभूळ यांसह इतर वृक्षांचे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. सोलापूरचे तापमान नियंत्रणात ठेवण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले, असे संस्थेचे अध्यक्ष दीपक गायगवळी यांनी सांगितले.याप्रसंगी मिलिंद ठोंबरे, राजू माने, मलिक शिंदे, ब्रम्हा श्रीमंगले, राघू नांदवार, गौतम साबळे, कपिल भालेराव, सादिक शेख, अश्विनी शिंगे, गिरीश उडानशिव, हर्षराज बनसोडे, प्रमोद मसलखांब,ॲड सतीश गायकवाड, संजय कांबळे, नागसेन गायगवळी, भीमा गायगवळी, आशिष गायगवळी, भारत गायगवळी, स्वप्नील इसुरे आदी उपस्थित होते.

# जनमेजयराजे भोसले यांच्या दुरदृष्टीमुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोटला पर्यटक वाढले

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१७ मे-**

श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांच्या दिशादर्शक नेतृत्वाखाली सुरु असलेल्या अन्नछत्रसह विविध उपक्रमांमुळे श्रीक्षेत्र अक्कलकोटची महती सातासमुद्रापार गेली. त्यांच्या दुरदृष्टीमुळे अक्कलकोटला पर्यटक वाढले.



श्रीदत्तगुरुचे अवतार म्हणून गणल्या जाणाऱ्या श्रीस्वामी समर्थ महाराज यांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात. स्वामीभक्तांसाठी सकाळ-संध्याकाळी महाप्रसाद भोजन, निवासाची सोय यांसह बालोद्यान, छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा, गड किल्ले शिवस्मारक शिवसृष्टी, अजरामर धातुशिल्प शिवचरित्र दालन, तुळजाभवानी मंदिर आदी भाविकाचे आकर्षणाचे केंद्रबिंदु ठरले आहे.

पुर्वीचे अक्कलकोट आणि सध्याचे अक्कलकोट यामध्ये मोठा फरक आहे . धार्मिक पर्यटनाबरोबर आज पर्यटकाना श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी भाविकाना निवासाची सोय वाहने पार्किंगसाठी प्रशस्त जागा यामुळे भाविक पर्यटक यांचे सोयीचे केंद्रबिंदु ठरत आहे. लहान मुलाना विरंगुळासाठी सोलापुर जिल्हयात एकमेव आकर्षक बालोद्यान म्हणून मंडळातील या उद्यानाचा उल्लेख करावा लागेल. स्व.लता दिदीच्या सुचनेनुसार छत्रपती शिवरायांचे स्मारक गड किल्ले आजरामर धातुशिल्प शिवचरित्र दालन जनमेजयराजे भोसले यांनी उभे केले. आई तुळजाभवानी मातेचे मंदिर ही भाविकांच्या गर्दीचे व आकर्षणाचे केंद्रबिंदु ठरले आहे. अन्नछत्र मंडळ परिसरात पर्यटक मोबाईलद्वारे सेल्फीकाढून आनंदाचे क्षण टिपत आहेत. शैक्षणिक, ज्येष्ठ नागरिक सहली अन्नछत्र मंडळात भेटी देणारे पर्यटक यात्री भाविकाची संख्या दिवसागणिक प्रचंड प्रमाणात वाढत आहेत.



**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर | सोमवार, १८ मे २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# शहर-जिल्ह्यात उष्णतेचा कहर

## सोलापूर @ ४४; उन्हापासून बचाव


### फळभाज्या, पालेभाज्यांवर आली उन्हाची संक्रात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मे-**

सोलापूर शहरासह जिल्ह्यात उष्णतेचा जणू कहरच झाला आहे. उन्हाची तीव्रता दिवसागणिक वाढत आहे. तापमानाचा पारा ४४ अंशावर पोहोचला आहे. कडक उन्हामुळे दुपारच्या वेळेत रस्त्यांवरील वर्दळ लक्षणीयरित्या कमी झाल्याचे दिसून येत आहे. या कडक उन्हामुळे शेतकऱ्यांच्या पालेभाज्या, फळभाज्यांवरही संक्रातच कोसळली आहे.

सध्या सोलापूरमध्ये सकाळपासूनच उन्हाचा चटका जाणवत आहे. दुपारच्या सुमारास तर उष्णतेची तीव्रता अधिक वाढत असल्याने वाहनचालक, कामगार, विद्यार्थी, व्यापारी वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील डांबरी रस्ते आणि सिमेंटच्या इमारती तापत असल्याने दुचाकीस्वार, पायी जाणाऱ्या लोकांना कडक झळांचा त्रास होत आहे.

बाजारपेठांतही गर्दी जाणवत नसल्याने त्याचाही परिणाम उलाढालीवर होत आहे. उन्हाची तीव्रता वाढल्याने थंड पेयांच्या विक्रीतही वाढ झाली आहे. उष्णतेपासून बचाव करण्यासाठी नागरिक ताक, लिंबूपाणी, फळांचे रस तसेच थंड पेयांचा आधार घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. घराबाहेर पडताना नागरिक स्कार्फ, गमजा, टोपी, गॉगल आणि रुमालाचा वापर करुन उन्हापासून बचाव करण्याचा प्रयत्न करत आहेत.




### तापमान आणखीन वाढण्याचे संकेत

रविवार,दि.१७ मे रोजीचा तापमान ४४ अंशावर होता. दि.१६ रोजी तापमानाचा पारा ४३.३ अंश सेल्सियस इतका होता. दि.१५ मे रोजी ४१.४, दि.१४ मे रोजी ४२.४, दि.१३ मे रोजी ४१.१, दि.१२ मे रोजी ४१.८, दि.११ मे रोजी ४२.३ अशी तापमानाची नोंद हवामान विभागाकडे झाली आहे. येत्या काही दिवसांत अजून तापमान आणखीन वाढण्याचे संकेतही हवामान विभागाकडून मिळत आहेत.

### आतापर्यंतचा गाठला उच्चांक

चालू उन्हाळी हंगामात सोलापूरच्या तापमानाने आतापर्यंतचा उच्चांक गाठला असून, आज कमाल तापमान ४४ अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे. विशेष म्हणजे, किमान तापमानही २८.४ अंश सेल्सिअस एवढे नोंदवले गेल्याने सोलापूरकरांना दिवसा पाठोपाठ रात्रीही असह्य उकाड्याचा सामना करावा लागत आहे. मे महिन्याच्या अखेरपर्यंत तापमानाचा हा आलेख आणखी वर जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### भाजीपाला, फळभाज्या सांभाळणे कठीण

शेतकरी बांधवांना ऊन, वारा, पाऊस याचा त्रास होत असतो. सध्या उन्हाळा असला तरी शेतकऱ्यांकडून पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरु आहेत. इतकेच नाहीतर त्यांनी विहिरी-बोअर्सवरील घेतलेला भाजीपाला-फळभाज्या कडक उन्हामुळे करपू लागल्या असून, त्यांना वाचविण्यासाठी शेतकरीदादा प्रयत्नांची पराकाष्टा करताना दिसत आहेत. एकंदरीत, भाजीपाला, फळभाज्या सांभाळणे कठीण होऊन बसले आहे.

### दुपारच्या सत्रात शक्यतो बाहेर पडणे टाळा

नागरिकांना दुपारच्या वेळेत अनावश्यकपणे बाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे आणि डोक्याचे संरक्षण करावे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस तापम ानात आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याने उष्माघात टाळण्यासाठी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्याधिकारी डॉ.संतोष नवले यांनी केले.

# जुळे सोलापुरातील दुचाकी गोडाऊनला भीषण आग

### सुमारे २५ लाखांचे नुकसान झाल्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मे-**

जुळे सोलापुरातील वानकर नगर येथील देविका गॅस एजन्सी जवळील एका पत्राशेडवजा दुचाकी गोडाऊनला रविवारी अचानक आग लागली. या भीषण आगीत गोडावूनमधील स्पेअर पार्टसह इतर साहित्य असे सुमारे २५ लाख रुपयांचे साहित्याचे नुकसान झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही.

आगीची खबर मिळताच अग्निशामक दलाचे अधीक्षक राकेश साळुंखे, सहाय्यक अधीक्षक अच्युतराव दुधाळ यांच्या नेतृत्वाखाली पथक घटनास्थळी तातडीने धाव घेतली. ६ गाड्या पाण्याचा मारा करुन पाऊण तासात ही आग आटोक्यात आणण्यात आली. महापालिका अग्निशामक दलाने दोन कोटींचे साहित्य वाचविले. याठिकाणी दुचाकी गाड्यांना एसेसरीजचे साहित्य लावण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. घटनास्थळी लोकांची मोठी गर्दी झाली होती.





# जुळे सोलापुरातील घरफोडी उघडकीस; तेलंगणाचा 'मंत्री' गजाआड

### ८ लाख ७२ हजारांचा मुद्देमाल जप्त

### शहर गुन्हे शाखेची मोठी कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मे-**

दोन दिवसांपुर्वी जुळे सोलापुर येथील गीता नगरात झालेली घरफोडी शहर गुन्हे शाखेने उघडकीस आणली. याप्रकरणातील तेलंगण येथील आरोपी शिवप्रसाद आदिनारायण मंत्री उर्फ मंत्रीशंकर (वय-४८, रा.सत्यनारायण कॉलनी, जि.मलकाजगिरी) यास अटक करण्यात आली.

८.२ तोळे सोन्याचे दागिने, ३० तोळे चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली स्विफ्ट कार असा एकूण ८ लाख ७२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, विविध राज्यांत ३५ हून अधिक घरफोडीचे गुन्हे दाखल असलेला आंतरराज्यीय आरोपी असल्याचे सांगण्यात आले. जुळे सोलापूर भागातील गीतानगर येथील रहिवासी रेवती तमशेट्टी ह्या घराला कुलूप लावून कुटुंबासह परगावी गेल्या असता ही घरफोडी झाली होती.




याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. वपोनि अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार मुकेश गायकवाड व त्यांच्या पथकाला तांत्रिक तपास आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयित आरोपीची माहिती मिळाली.

दि.१५ मे रोजी मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास मार्केट पोलिस चौकीसमोरील सार्वजनिक रस्त्यावर एक कार संशयास्पदरित्या थांबलेली आढळली. पोलिसांनी ड्रायव्हिंग सीटवर असलेल्या संशयिताला ताब्यात घेत चौकशी केल्यानंतर तो आरोपी मंत्री शंकर असल्याचे समजले. यावेळी पोलिसांनी कारच्या डॅशबोर्ड ड्रॉव्हरमधून चोरीचे संपूर्ण दागिने आणि रोख रक्कम जप्त केली. आरोपीला न्यायालयासम ोर हजर केले असता, न्यायालयाने त्यास ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान; ५९७ जणांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१७ मे -**

नाझरे विद्यामंदिर (ता.सांगोला) येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानात विविध शासकीय विभागामार्फत ५९७ लाभार्थ्यांना लाभ मिळाला.

प्रारंभी तहसीलदार बाळूताई भागवत, उपसभापती अजय सरगर, पं.स.सदस्य बापू जावीर, सरपंच रंगनाथ बंडगर, डॉ.विजय सरगर, संजय सरगर, गोरख आदाटे, मंडल अधिकारी हरिश्चंद्र जाधव, कृषी सहाय्यक बाळासाहेब सावंत, भुमिअभिलेखचे कडकंची, विनायक पाटील, रविराज शेटे, अतुल फसले यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

याप्रसंगी बाळूताई भागवत, बापू जावीर, बाळासाहेब सावंत, अतुल फसले यांनी मनोगत व्यक्त केले. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी तलाठी राजेंद्र जाधव, मधुकर वाघमोडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी, महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन सुनील जवंजाळ यांनी




# 'महावितरण'च्या वतीने २० मे रोजी जिल्ह्यात ग्राहक तक्रार दिनाचे आयोजन




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१७मे-**

'महावितरण'च्या वतीने जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये दि.२० मे रोजी सकाळी ११ ते दुपारी १ यावेळेत ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, सहा.अभियंता हे अधिकारी समक्ष उपस्थित राहून तक्रारी, अडचणी,सम स्या सोडविणार आहेत, अशी माहिती अ.भा.ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

अवाजवी बील, सरासरी बील आकारणी, वीज बिल वेळेत न मि ळणे, मीटर रीडिंग वेळेत न घेणे, कनेक्शन वेळेत न मिळणे, योग्य दाबाने वीजपुरवठा न होणे, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, नविन म ीटर वेळेत न मिळणे, डी.पी.बदलून न मिळणे, सोलर सिस्टीम अशा कोणत्याही स्वरुपातील लिखित तक्रार अर्जासह उपस्थित राहावे, असे आवाहन महावितरण सोलापूर मंडलचे अधिक्षक अभियंता सुनिल माने, अ.भा.ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, विनोद भरते, सुभाष सरदेशमुख, विनय उपाध्ये, सुहास निकते, माधुरी परदेशी, दीपक भंडारकवठेकर, पांडुरंग अल्लापूरकर, संभाजी लंगोटे यांनी केले आहे.

# आम्हाला विद्यार्थी, युवा आणि सरकारमधला 'सेतू' व्हायचेय

### 'भाजयुमो'चे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांचे प्रतिपादन

### २१ एप्रिलपासून 'युवा शक्ती जागर' यात्रेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्षपद स्वीकारल्यानंतर राज्यातील सर्व मंत्री, आमदार, केंद्रातील मंत्र्यांची भेटी घेण्यास आरंभ केला आहे. दिल्ली विद्यापीठासह अनेक ठिकाणच्या विद्यार्थी आघाड्यांना आमंत्रण दिले. युवा म ोर्चाचे पदाधिकारी आणि भाजपा नेत्यांनी परिश्रम घेऊन या राज्यव्यापी युवा शक्ती जागर यात्रेची आखणी केली. याद्वारे आम्हाला विद्यार्थी, युवा आणि सरकारमधला 'सेतू' व्हायचेय, असे प्रतिपादन 'भाजयुमो'चे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी केले.

रविवारी ते सोलापूर शहर-जिल्ह्यात दौऱ्यावर होते. ते सोलापुरात आल्यानंतर पुना नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक व इतर काही ठिकाणी युवकांनी त्यांचे जंगी स्वागत




केले. येथील हुतात्मा स्मृती मंदिरात आयोजित युवा मेळाव्यास त्यांनी मार्गदर्शन केले. यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत महाडिक यांनी युवा शक्ती जागर यात्रेचा आपला उद्देश विशद केला. याप्रसंगी सोलापूर भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, मनपा गटनेते नरेंद्र काळे, युवा मोर्चाचे अध्यक्ष विजय कुलथे, शिवराज सरतापे आदींची उपस्थिती होती.

दि.२१ एप्रिलपासून राज्यव्यापी युवा शक्ती जागर यात्रेचा प्रारंभ केला आहे. या यात्रेतून युवा शक्ती एकत्र करण्याचा माझा उद्देश आहे. सध्या या यात्रेस प्रतिसादही चांगलाच मिळत आहे. राज्य आणि केंद्राच्या विविध कल्याणकारी शासकीय योजना सर्वसामान्य घटकांपर्यंत घेवून जाण्यासाठी युवा मोर्चा काम करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही इंधन बचतीसाठी गाड्यांचा दौऱ्यात वापर कमी करीत आहोत. अनावश्यक खर्च कमी करीत आहोत. आतापर्यंतच्या दौऱ्यात युवकांमध्ये उत्साह आणि उर्जा पाहायला मिळाले.

विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांच्याशी संवाद साधणार आहोत. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या युवक-युवतींना भेटणार आहोत. या सर्व लोकांच्या समस्या जाणून घेत आम्हाला विद्यार्थी, युवा आणि सरकारम धला सेतू व्हायचे आहे. पुढील एक वर्षात संपूर्ण राज्यातील एक लाख युवकयुवतींना या माध्यमातून युवा मोर्चा आणि पक्षाशी जोडण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात नवी मुंबई, पनवेल, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग असा संपूर्ण कोकण पट्टा दौरा पूर्ण केला, असेही त्यांनी सांगितले.

### भाजयुमो हा केवळ राजकीय विषय नाही

शासकीय ३६ जिल्ह्यांचे म्हणजेच भाजपाच्या संघटनात्मक ८० जिल्ह्यांच्या दृष्टीने या दौऱ्याचे नियोजन करण्यात आले. भारतीय जनता युवा मोर्चा हा केवळ राजकीय विषय नाही. आम्ही रोजगारावरही काम करणार आहोत, असेही महाडिक शेवटी म्हणाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी -१४४४

**दुर्जनासि करी साहये ।
तोही लाहे दंड हे ।।**

एका हाताने करावे आणि दुसऱ्या हाताने भरावे, असा सृष्टीचा नियम असला तरीही बऱ्याचवेळा करणारा करुन निघून जातो आणि भरावे मात्र दुसऱ्यालाच लागते. पण याचा अर्थ असा नाही की, मूळ कारणीभूत असणाऱ्याला त्याच्या दुष्कृत्याची शिक्षा भोगावीच लागत नाही. कांही काळानंतर का होईना किंवा पश्चातापाच्या माध्यमातून का होईना त्याला दुष्कृत्याचे परिणाम भोगावेच लागतात. अशी कित्येक उदाहरणे आपल्या डोळयासमोर असतील ज्यात दुष्कृत्य कांही काळासाठी झाकली गेली असली किंवा दुष्कृत्याचा परिणाम इतर कोणाला भोगावा लागला असला तरीही कालांतराने का होईना पण दुष्कृत्यकर्त्याला त्याचे परिणाम कोणत्या का माध्यमातून होईना पण भोगावेच लागले आहेत. जो करेल तो भोगेलच हे जरी सत्य असले तरी दुष्कृत्य कर्त्यास मदत करणाऱ्यालाही भोगावे लागते, हे ही सत्य आहे. अर्थात, वाईट ते वाईटच असल्याने वाईट कर्त्यास त्याच्या कृत्याच्या परिणामास सामोरे जावे लागते. त्याप्रमाणे त्या वाईट कार्यासाठी मदत करणाऱ्यासही परिणाम भोगावा लागतो. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, दुर्जनासि करी साहये । तोही लाहे दंड हे ।।



आपल्या देशाच्या कायद्यात अपराध करणाऱ्याला जशी शिक्षा देण्याची तरतूद आहे, तशी त्यास मदत करणाऱ्यासही शिक्षा देण्याची तरतूद आहे. महाराजांनी या तरतुदीचे स्पष्टीकरण त्या काळात केले. यावरुन त्यांच्या दूरदृष्टीची कल्पना येते. मूळात कोणी वाईट नसतो. त्याला परिस्थिती किंवा मानसिकता दुष्कृत्यासाठी कारणीभूत करते. कोणत्या का कारणाने असेना पण मनात जेव्हा वाईट विचार येतात, तेव्हा त्या विचाराला जर दुसऱ्याने पुष्टी दिली तर निश्चितच त्या व्यक्तीकडून वाईट घडू शकते. व्यक्तिगत स्तरावर घडणाऱ्या वाईट घटनांपेक्षा सामुहिक किंवा एकापेक्षा जास्त डोक्याच्या कल्पनेतून घडणाऱ्या घटनांची संख्या जास्त असते. प्रत्यक्षात कृती एखादाच करीत असला तरीही त्याच्या कृतीस दुसरे कारणीभूत असतात. दुष्कृत्य करणाऱ्या पेक्षा दुष्कृत्य करायला लावणारे जास्त कारणीभूत असतात. दुष्कृत्य करण्याची भावना जोपासणाऱ्यास जर पुष्टी दिली नाही किंवा त्याला त्या कृत्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला तर समाजातील बरेच प्रश्न आपोआप नष्ट होतील. सुनेच्या छळास घरातील एकच व्यक्ती कारणीभूत असते असे नाही. त्या व्यक्तीच्या छळ-कपटास एखाद्याची तरी मुकसंमती किंवा प्रत्यक्ष पुष्टी असते. या मुकसंमतीचा किंवा प्रत्यक्ष पुष्टीचा परिणाम आपण दैनंदिन वृत्तपत्रातून किंवा प्रसारमाध्यमातून पाहातच आहोत. अशा अनेक घटना केवळ वाईट मानसिकता जोपासणाऱ्यास पाठिंबा दिल्याने घडत आहेत. वाईट करणाऱ्यास आपण वाईटापासून परावृत्त करु शकलो नाही तरी चालेल, पण त्याच्या कुविचारास पाठिंबा तरी देऊ नये. आपण पाठिंबा नाकारला तरी त्याचे कांही अंशी का होईना दुष्कृत्याच्या विचारापासून खच्चीकरण होऊ शकते. वाईट ते वाईटच असते. याची जाण ठेवायलाच हवी जय राम कृष्ण हरी।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार,**
**दि. १८ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अधिक, शु. द्वितीया**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- रोहिणी (११.३२)**
**योग - सुकर्मा (२१.४८)**
**करण - बालव (०७.४६)**
**राहू काल : सोमवार**
**दु. ०७.३० ते ०९.००**

**दिनविशेष :** १९७४ : भारताने राजस्थानमधील पोखरण येथे आपले पहिले यशस्वी अणुचाचणी (पोखरण-१) केली. यामुळे भारत अणुऊर्जा संपन्न असणारा जगातील सहावा देश बनला.

२००९ : श्रीलंकेच्या लष्कराने LTTE (तामिळ इलम लिबरेशन टायगर्स) या दहशतवादी संघटनेचा पराभव करून जवळजवळ २६ वर्षे चाललेले भीषण गृहयुद्ध संपवले.

# ऑनलाईन जनगणना; २८०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती

### ✻ महापालिकेच्या कार्यक्षेत्रात १५ जूनपर्यंत मोहीम ✻

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

महापालिका कार्यक्षेत्रातील जनगणना प्रक्रियेला गती देण्यासाठी १६ मे ते १५ जून या कालावधीत व्यापक मोहीम राबविण्यात येणार असून, यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार आहे. यासाठी प्रशासनाने २४०० प्रगणक कर्मचारी आणि ४०० पर्यवेक्षक अशा एकूण २८०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

यंदा प्रथमच पारंपरिक मॅन्युअल पद्धतीऐवजी मोबाईल ॲप आणि वेब पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन जनगणना केली जात आहे. 'एचएलओ' ॲपद्वारे ही प्रक्रिया पार पडणार असून १ ते १५ मेदरम्यान नागरिकांना स्वगणनेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. १६ मेपासून प्रगणक आणि पर्यवेक्षक घरोघरी जाऊन ऑनलाईन माहिती संकलित करीत आहेत. घरयादी व घरगणना क्षेत्रीय काम १६ मे ते १४ जूनदरम्यान पार पडणार असून यामध्ये घराची स्थिती, उपलब्ध सुविधा, मालमत्ता आदींसह एकूण ३४ प्रश्नांची माहिती संकलित केली जाणार आहे.

जनगणना कायदा १९४८ आणि जनगणना नियम १९९० अंतर्गत ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. नागरिकांनी दिलेली माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार असून ती कोणत्याही न्यायालयीन प्रक्रियेसाठी किंवा प्राप्तीकर, पोलीस विभागासह इतर कोणत्याही विभागाला दिली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जनगणनेचा उद्देश करवसुली किंवा तपासणी नसून नियोजनासाठी आवश्यक सांख्यिकी माहिती संकलित करणे हा आहे.

स्वगणना केलेल्या नागरिकांकडून प्रगणक पडताळणी करतील. माहिती योग्य आढळल्यास ती स्वीकारली जाईल, अन्यथा आवश्यक दुरुस्ती करण्यात येईल. स्वगणना न केलेल्या नागरिकांची माहिती प्रगणक नव्याने नोंदवतील. देशातील ही सोळावी तर स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना असून पहिल्यांदाच पूर्णपणे डिजिटल स्वरूपात ती होत आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने अचूक माहिती देणे आवश्यक असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

#### अशी राहणार जनगणना प्रक्रिया

१६ मे रोजी सर्व पर्यवेक्षक व प्रगणक 'एचएलओ' ॲप डाऊनलोड व इन्स्टॉल झाल्याची खात्री करतील. तसेच क्षेत्रांच्या सीमांची प्रत्यक्ष पाहणी केली जाईल.

१७ मे रोजी लॉग-इन प्रक्रिया पूर्ण करून ठिकाणांच्या तपशीलांची पडताळणी केली जाईल. कच्चा नकाशा तयार करून घरांचे क्रमांक निश्चित केले जातील.

२० मेपासून प्रत्यक्ष क्षेत्रीय कामाला सुरुवात होणार असून प्रत्येक प्रगणकाकडून किमान एका घराची नोंद केली जाईल. २१ मेपर्यंत किमान १० टक्के क्षेत्रीय काम आणि डेटा सिंक्रोनायझेशन पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्याची माहिती महापालिका सहाय्यक आयुक्त गिरीश पंडीत यांनी दिली.

# केंद्रीय मंत्री गडकरी यांना उजनी धरण व भीमा नदी प्रदूषणाबाबतचा अहवाल सादर

### उड्डाणपूल आणि रिंगरोड संदर्भातही सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशनने दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

पर्यावरण संवर्धन आणि सोलापूर शहराच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी 'सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशन'च्या वतीने नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकी दरम्यान, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन त्यांना विविध पर्यावरणपूरक विषयांवर पाच महत्त्वाची पत्रे आणि उजनी धरण व भीमा नदीच्या वाढत्या प्रदूषणासंदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्यात आला. उजनी आणि भीमा नदी प्रदूषणावर चर्चासोलापूर जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेल्या भीमा नदी आणि उजनी धरणातील प्रदूषण दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर, सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण रा. तळे यांनी केंद्रीय मंत्र्यांचे लक्ष वेधले.

नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी या अहवालाद्वारे करण्यात आली. यासोबतच पर्यावरण संवर्धनाच्या विविध मुद्द्यांवर पाच स्वतंत्र निवेदने गडकरी यांना सुपूर्द करण्यात आली. सोलापूरच्या उड्डाणपूल आणि रिंगरोडचा प्रश्न सोलापूर शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या दोन नवीन उड्डाणपुलां संदर्भात आणि रिंगरोडच्या प्रलंबित कामाबाबत या भेटीत चर्चा झाली. या पायाभूत प्रकल्पांमुळे शहराच्या विकासाला गती मिळणार असून, यावर केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती पत्राद्वारे करण्यात आली. खास पर्यावरणपूरक भेट याप्रसंगी नितीन गडकरी यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना एक अनोखी पर्यावरणपूरक 'फ्रेम' भेट देण्यात आली. यावेळी सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशनचे सीईओ श्री. प्रवीण रा. तळे, सोलापूर महानगरपालिकेचे नगरसेवक माऊली म्याकल, भाजप शहर मध्यचे मंडळ अध्यक्ष नागेश सरगम आणि नगरसेवक श्री. अक्षय अंजिखाने उपस्थित होते. तसेच कर्नाटकच्या 'सॉइल टू सॉइल बायो सोल्यूशन्स' (इथेनॉल व डिस्टिलरी एन्झाइम उत्पादन कंपनी) चे गिरीश (यादगीर) आणि सांगलीचे सागर उपस्थित होते. केंद्रीय मंत्र्यांनी सर्व मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे.




# 'त्या' आजोबाचा अखेर मृत्यू ; चुलत नातवावर खुनाचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

घरातील नातीसोबत चेष्टा मस्करी करू नको असे सांगितल्याच्या कारणावरून चुलत नातवाने भाल्याने मारल्याने जखमी झालेल्या पान मंगरूळ येथील आजोबाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शनिवारी मृत्यू झाला. दरम्यान या प्रकरणी अक्कलकोट साऊथ पोलीस ठाण्यात परभणी जिल्ह्यातून आलेल्या चुलत नातवावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीमंत चन्नप्पा पवार (वय ७० वर्ष ,रा. पान मंगरूळ ता.अक्कलकोट) असे मयताचे नाव असून परत्या नागू उर्फ नागनाथ पवार (रा. गंगाखेड जि.परभणी) असे आरोपींची नाव आहे . तो घटनेनंतर पसार झाला आहे .

मयत श्रीमंत पवार यांच्या घरी त्यांचा चुलत नातू परत्या पवार आणि त्याची आई असे दोघे घटनेच्या आठवड्यापूर्वी आले होते. बुधवार दि.१३ मे रोजी दुपारच्या सुमारास आजोबा श्रीमंत पवार यांनी परत्या याला तू घरातील नाती सोबत चेष्टा मस्करी करू नको , शिवाय तिचे मोबाईल वरून फोटो काढू नको , तू आणि तुझी आई घरातून निघून जा असे म्हणून रागावले होते. त्यावेळी परत्या याने तुला लय मस्ती आली आहे तुला जिवंत ठेवत नाही. असे म्हणत त्याने घरातील टोकदार भाल्याने त्यांच्या पाठीत वार केले होते. यात जखमी झाल्याने त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात गंभीर अवस्थेत पत्नी शांताबाई पवार यांनी दाखल केले होते. उपचारादरम्यान त्यांचा शनिवारी सकाळी मृत्यू झाला. दरम्यान याप्रकरणी अक्कलकोट साऊथ पोलीस ठाण्यात यापूर्वी आरोपी विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता . मात्र जखमी आजोबाचा मृत्यू झाल्यानंतर त्यात कलम वाढ करून आता खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती तपासीक अंमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत बधे यांनी दिली असून गुन्ह्याचा तपासही तेच करीत आहेत.

## शहरातील प्रसिद्ध नगर म्हणजे अंत्रोळीकर नगर



अंत्रोळीकर नगर झाल्यापासून या भागातून ड्रेनेजचे पाईपलाईन उघड्यावरच करण्यात आले आहे. गुरुद्वारा मागून वाहणारे ड्रेनेजचे लाईन नाल्याप्रमाणे मोठ्या स्वरूपाचे उघड्यावर आहे.ते सावस्कर हॉस्पिटल पर्यंत तसेच आहे. या परिसरात राहणाऱ्या लोकांना याचे त्रास कित्येक वर्षापासून आहे. हा मोठा नाला पावसाळ्यात भरून वाहतो तर इतर दिवसात घाण पाण्या मुळे वेगवेगळ्या आजारास कारणीभूत ठरतो. ड्रेनेजच्या पाण्यात डास, साप, व कीटक आहेत. परिसरातून ये जा करणाऱ्या नागरिकांना याचे त्रास कायमस्वरूपी सोसावे लागत आहे.या गोष्टी प्रशासनाला व राजकारणी व्यक्तींना का दिसून येत नाही ? याच्यावर उपाय कधी होणार?


**- फैय्याज शेख**
सोलापूर

# 'एक लाख कोटी'!



**सो**लापूर जिल्ह्यात आगामी ३ वर्षात १ लाख कोटीची विकासकामे करणार असल्याचा संकल्प केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी श्री स्वामी समर्थांच्या नगरीत नुकतचा सोडल्याने जिल्ह्याचा भविष्यकाळ उज्वल ठरणार आहे. कारण ना. गडकरी हे शब्दाचे पक्के आहेत; ते पोकळ आश्वासन देत नाहीत अन् त्यांच्या हातून एखादे काम होत नसेल तर पटकन हे काम होत नाही; असे स्पष्ट बोलतात. त्यांच्या स्पष्ट वक्तेपणामुळे सोलापूर जिल्ह्याला वरील १ लाख कोटीचा निधी मिळून लवकरच कायापालट होण्याचे संकेत सध्यातरी मिळत आहेत.

ना. गडकरींनी अक्कलकोट येथील जाहीर सभेत बोलताना स्पष्टपणे सांगितले होते की, जिल्ह्यात ३४ विकासकामे मंजूर असून, त्यापैकी १५ कामे पूर्ण झाली आहेत, १९ कामे प्रगतीपथावर आहेत. नव्याने २ हजार ७८४ कोटींच्या पाच कामांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये अक्कलकोट-मोहोळ-बसमतनगर मार्ग, रेल्वे उड्डाणपूल, बोरी नदीवरील पूल यांचा समावेश आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात आमागी ३ वर्षात अजून एक लाख कोटी रुपयांची विकासकामे पूर्ण करण्याचा मी संकल्प सोडला आहे. येथील आमदार, खासदारांच्या अपेक्षेपेक्षा जास्त निधी देण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. सध्या अहमदनगर-सोलापूर चौपदरीकरण, सोलापूरचे २ उड्डाणपूल, अक्कलकोट-कर्नाटक सीमा महामार्ग यांसारख्या विविध प्रकल्पांना यामुळे गती मिळणार असून, यामुळे सोलापूर नगरीत येणाऱ्या उद्योजकांची वाट सुकर होणार आहे.





**कलेक्टर कचेरीतून**
**अविनाश गायकवाड**
**मो. 9421876340**

जिल्ह्यात विविध महामार्गाचे नेटवर्क उभारल्यानंतर शहरातील विमानतळाचा महत्वाचा विषय मार्गी लागला आहे. रोजच विमानांची उड्डाणे सुरू झाली आहेत. गोवा-मुंबईनंतर आता पुणे, तिरूपती, हैदराबाद आदी ठिकाणीही विमानसेवा लवकरच चालू होणार आहे. यानंतर आयटी पार्कचा विषय अंतिम टप्प्यात आला आहे. पंढरी नगरीत कॉरिडॉरची उभारणी होत आहे. पंढरी तीर्थक्षेत्र विकासासाठी ३९९३.९० कोटीची शिखर समितीची अंतिम मान्यता मिळाली आहे. यामुळे हे धार्मिक पर्यटन लवकरच विकसित होणार आहे. उजनी जलपर्यटनाचा विषय जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांच्या अजेंड्यावर आहेच. त्यातच आता तब्बल १ लाख कोटीची रस्ते बांधणी होणार असल्याने सोलापूर शहर आणि जिल्ह्याचा नक्कीच कायापालट होईल, यात शंकाच नाही. २०१४ पर्यंत जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी ५६५ किमी होती, ती आता १,७५० किमीपर्यंत वाढली आहे. ५२ हजार कोटी रुपयांच्या कामांचे भूमिपूजन झाले असून, त्यातील बहुतेक कामे पूर्ण झाली आहेत. आता नव्याने २७८४ कोटींच्या पाच कामांची घोषणा करण्यात आली आहे. तर एक लाख कोटी रुपयांची कामे पाच वर्षांत पूर्ण करण्याचा संकल्प आहे. जिल्ह्यात १२ हजार कोटींचा पालखी मार्ग ८०% पूर्ण झाला असून मार्गावरील ४६ तलाव बांधले गेले असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. शेती व जलसंवर्धनाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, सोलर पंप व ड्रिप सिंचनामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होऊ शकते. पंढरपूर रिंग रोड, कोल्हापूर रिंग रोड, अक्कलकोट-दुधनी रस्ता यांसारख्या कामांना मंजुरी दिल्याचे त्यांनी जाहीर केले. दरम्यान, विकासकामांमध्ये राजकारण न करता सर्व समाजघटकांना समान लाभ मिळावा, हा त्यांचा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. जिल्ह्यातील महत्त्वाच्या रस्ते विकास प्रकल्पांचे यावेळी भूमि पूजन झाले. एकूण २७८४ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये हसापूर ते बद्दाड रस्त्यासाठी १५५२ कोटीचा निधी, वागदरी - अक्कलकोट - तोळणूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ बी चे पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरण, या रस्त्याची लांबी ४७.६६ कि.मी. असून प्रकल्प खर्च ३५३ कोटी रुपये आहे. मोहोळ - बसवनगर - वळसंग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४६५ चे पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरण रस्त्याची लांबी ८२.०० कि.मी. असून प्रकल्प खर्च ७५६ कोटी रुपये आहे.

दुधनी येथे रेल्वे उड्डाण पूल बांधकाम तसेच रा.म.क्र. १५० ई च्या उर्वरित ४.१२२ कि.मी. रस्त्याचे उन्नतीकरण व दर्जोन्नतीकरण करण्यात येणार असून प्रकल्प खर्च ९७ कोटी रुपये आहे. रा.म.क्र. १५० ई अंतर्गत बोरी उमरगे येथे बोरी नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यात येणार असून लांबी ०.७५ कि.मी. असून प्रकल्प खर्च २६ कोटी रुपये आहे. या सर्व प्रकल्पांची एकूण लांबी १७१ कि.मी. असून एकूण प्रकल्प किंमत २७८४ कोटी रुपये आहे. या विकासकामांमुळे सोलापूर जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होऊन नागरिकांना सुरक्षित व जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. एकंदरीत, प्रस्तुत पॅकेज सुरत चेन्नई ग्रीन फील्ड कॉरिडॉरचा एक भाग आहे. यामुळे ३९० किलोमीटर आणि सहा तासाच्या प्रवासाच्या वेळेचे बचत होणार आहे. वन्यजीव संरक्षण उपायोजनामुळे प्राण्यांच्या सुरक्षित प्रवासाची खात्री होईल. अक्कलकोट आणि गाणगापूर या तीर्थक्षेत्रापर्यंत पोहोचणे सुलभ होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४६५ ह एक भाग सोलापूरसाठी अतिरिक्त रिंग रोड म्हणून काम करेल. वाहतूक कोंडी प्रवासाचा वेळ आणि इंधनाचा वापर कमी होईल. सोलापूर जिल्ह्यात कृषी पर्यटन उद्योग आणि रोजगार निर्मितीला यामुळे चालना मिळणार आहे. ना. गडकरी यांच्या कामाची पध्दत वेगळीच आहे. विरोधी पक्षाच्या खासदार प्रणिती शिंदे ना. गडकरींच्या विकासकामांची अक्कलकोट नगरीतील जाहिर सभेतून मोठी तारीफ केली. त्या म्हणाल्या की, राजकीय मतभेद न ठेवता विकासाचे राजकारण करणारे नेते म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची ओळख आहे. आम्ही कोणतेही काम घेवून गेलो तरी आम्हाला विरोधी पक्षाचे आहे असे म्हणून न पाहता आमचे काम गतीने आणि वेळेत पूर्ण करण्याची खासीयत ना. गडकरी यांची आहे. अशा नेत्यामुळेच आम्हालाही नवीन उर्जा आणि हिंमत मिळत असल्याचे विचार खासदार प्रणिती शिंदे यांनी मांडले. खा. शिंदे यांचे अनुभवाचे बोल ऐकता आगामी ३ वर्षांत १ लाख कोटीच कायतर सव्वालाख कोटीचाही निधी सोलापूर जिल्ह्याला मिळेल, अशी आशा सोलापूरच्या जनतेला लागली आहे.

# पर्यावरण संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी

### अरुण कृष्णमूर्ती; एमआयटी विश्वप्रयागमध्ये पर्यावरण आणि शाश्वत विकासावर चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

आजच्या पर्यावरणीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर युवकांमध्ये पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता, शाश्वत विकासाची जाणीव आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने एमआयटी एम आयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्यावतीने प्रख्यात पर्यावरणवादी कार्यकर्ते अरुण कृष्णमूर्ती यांच्याशी विशेष संवाद व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

देशभरातील तलाव, नद्या आणि विविध जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, जैवविविधतेचे संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एन्व्हार्नमेंटलिस्ट फाउंडेशन ऑफ इंडियाचे संस्थापक अरुण कृष्णमूर्ती यांनी आपल्या प्रभावी संवादातून युवकांमध्ये पर्यावरणीय जबाबदारीची जाणीव जागृत केली. पर्यावरणीय संकटांची गंभीरता अधोरेखित करत त्यांनी शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार, नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन आणि सामूहिक कृतीचे महत्त्व विशद करताना पर्यावरण संवर्धनासाठी केवळ जागरूक न राहता प्रत्यक्ष कृतीशील होण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत विश्वशांती प्रार्थनेने झाली. त्यानंतर अरुण कृष्णमूर्ती यांच्या पर्यावरणीय कार्यप्रवासावर आधारित माहितीपट सादर करण्यात आला. तलाव पुनरुज्जीवन मोहिमा, समुदाय सहभाग, पर्यावरण संवर्धनासाठी केलेले नावीन्यपूर्ण प्रयत्न आणि त्यांच्या उपक्रमांचा समाजावर झालेला सकारात्मक परिणाम यांचे प्रभावी दर्शन यामधून घडविण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी, पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकार किंवा संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. असे विचार मांडले. युवक हे अशा सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी वाहक ठरू शकतात, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले. यानंतर आयोजित संवाद सत्रात प्रा.अमिताभा घोष यांनी पर्यावरण संवर्धन, नेतृत्व व समुदाय सहभाग, जलस्रोत पुनरुज्जीवन आणि शाश्वत विकास यांसंदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले. विद्यार्थ्यांच्या वतीनेही उत्स्फूर्त प्रश्न विचारण्यात आले. या प्रश्नांना उत्तर देताना अरुण कृष्णमूर्ती यांनी देशाच्या विविध भागांत काम करताना आलेली अनुभव, आव्हाने आणि यशस्वी पर्यावरणीय उपक्रमांची उदाहरणे मांडली. पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमेत प्रत्येक व्यक्तीने छोट्या कृतींमधूनही मोठा बदल घडवू शकतो, हा आशावादी संदेश त्यांनी दिला. समारोपप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपालकृष्ण जोशी यांनी सामाजिकदृष्ट्या जबाबदार व संवेदनशील नेतृत्व घडविण्यासाठी अशा संवादमाला आणि उपक्रमांची आवश्यकता व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. राहुल दमजी आणि गायत्री गायकवाड यांनी केले.



## सभामंडपाच्या गेटला गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

अज्ञात कारणावरून एका ४५ वर्षीय इसमाने मंदिराच्या शेजारी असलेल्या सभामंडपाच्या लोखंडी गेटला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण येथे शनिवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास उघडकीस आली. अंबादास श्रीमंत मेटकर (वय ४५ वर्ष रा.शिवाजी चौक कळमण ) असे मयताचे नाव आहे. शनिवारी सकाळी त्याने गावातील खंडोबा मंदिराजवळ असलेल्या सभामंडपाच्या लोखंडी गेटला गळफास घेतला असल्याचे निदर्शनास पडले. याची माहिती समजताच गावातील लोकांनी त्याला फासातून सोडवून येथील शासकीय रुग्णालयात शेजारी सुहास मंडलीक यांनी दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

मयत अंबादास हा मजुरी करायचा, त्याच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगा आणि एक विवाहित मुलगी असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महत्वाचे...



## भाजयुमोचे प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक यांचे महापौरांनी केले स्वागत

**सोलापूर, दि. १७ मे-**

भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक यांचे आज सोलापूर शहरात आगमन झाल्यानंतर महापौर विनायक कोंड्याल यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी भाजपा शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर, नगरसेवक अक्षय अंजिखाने, नगरसेवक ऋषिकेश म्हेत्रे, युवा मोर्चा अध्यक्ष विजय कुलथे उपस्थित होते.

## संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना उबाठा पक्षाकडून अभिवादन

**सोलापूर, दि. १७ मे-**



स्वराज्याचे धाकले धनी, स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून सुरेश जगताप व महंमद मुलानी, उज्वल दिक्षित यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रमुख प्रताप चव्हाण, जिल्हा प्रमुख शरणराज केंगनाळकर, महानगर प्रमुख महेश धाराशिवकर, विष्णु कारमपुरी, महिला आघाडी संघटिका मंगल थोरात, नायर ताई, संदीप बेळमकर, संताजी भोळे, सुरेश जगताप, मारूती खानापुरे, विश्वजीत चौगुले, उज्वल दिक्षित, राजा कुसेकर, अंबादास चौहाण, उदय पवार, बबलु पड़ीत उपस्थित होते.



## विवाहाप्रित्यर्थ 'आपुलकी'ला ११ हजार रुपये देणगी

**सांगोला, दि. १७ मे-**

सांगोला तालुक्यातील य.मंगेवाडी येथील प्रशांत येलपले यांनी मुलाच्या विवाहाप्रित्यर्थ आपुलकी प्रतिष्ठानच्या सुरू असलेल्या सामाजिक कार्यासाठी वधू-वरांच्या हस्ते मदत निधीचा ११ हजार रुपयांचा धनादेश आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांच्याकडे सुपूर्त केला. यावेळी सचिव संतोष महिमकर, महादेव दिवटे, दादा खडतरे, रमेश गोडसे, बाळकृष्ण चांडोले, अरविंद डोंबे, शशिकांत येलपले उपस्थित होते.

## मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनर्रीक्षण कार्यक्रम जाहीर

**सोलापूर, दि.१७ मे-**

महाराष्ट्र राज्यात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनर्रीक्षण (स्पेशल इंटेसिव्ह रिव्हिजन एसआय आर ) कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या पत्रानुसार तसेच भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या पुनर्रीक्षणासाठी अर्हता दि. १ ऑक्टोबर २०२६ निश्चित केली आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत घरोघरी भेटी देऊन मतदारांची माहिती पडताळली जाणार आहे. नागरिकांना दावे व हरकती दाखल करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. अर्हता दि. : ०१.१०.२०२६, तयारी, प्रशिक्षण व छपाई : २०.०६.२०२६ ते २९.०६.२०२६, बीएलओ मार्फत घरोघरी भेटी : ३०.०६.२०२६ ते २९.०७.२०२६, मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण : २९.०७.२०२६ पर्यंत, प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी : ०५.०८.२०२६, दावे व हरकती दाखल : ०५.०८.२०२६ ते ०४.०९.२०२६, नोटीस टप्पा / दावे व हरकती निकालात काढणे : ०५.०८.२०२६ ते ०३.१०.२०२६, अंतिम मतदार याद्यांची प्रसिद्धी : ०७.१०.२०२६ . जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या नावाची खात्री करून आवश्यक बदल, समावेश अथवा वगळण्याबाबत निर्धारित कालावधीत दावे व हरकती सादर कराव्यात, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण सुरवसे यांनी केले आहे.




## संयम राष्ट्रासाठी

संयम पाळू वर्षभराचा पुढले वर्ष सौख्याचे आहे
या देशास्तव त्याग थोडासा कर्तव्य आपले बनते आहे ।।
कशास सोने हौस मौज ही देशासाठी त्याग करूया
सोन्यापेक्षा देश आपला चमचमणारा हिरा आहे ।।
पेट्रोल डिझेल कमी वापरू सायकल आपला व्यायाम आहे
चला चालू या चार पावले शुगर बीपी वर लगाम आहे ।।
तेलकट, तूपकट खाऊन चरबी वजन वाढते किलो किलोने
कमी करूया फास्ट फूड ते भारतीय भोजन पोषक आहे ।।
खर्च विदेशी हवे कशाला परदेशी वारी खर्च खिशाला
देश आपला सुजलाम सुफलाम राष्ट्रार्थ त्याग मोलाचा आहे ।।
वीज गॅसही कमी वापरू भारतीय कलात्मक वस्तू स्वीकारू
या मातीशी इमान राखू विचार आता पटतो आहे ।।
या युद्धाची लाहीलाही विश्वाला या होते आहे
जागे व्हा भारतीय जन हो देश आपला हळहळतो आहे ।।

- **प्रा. डॉ. दुर्गा गंगाधर जोशी**, सोलापूर.

# जनतेने जाती-पातीचे राजकारण नाकारले : राजेंद्र राऊत

### सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्षपद प्रथमच बार्शी तालुक्याला; वैराग येथे सत्कार सोहळा



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ मे-**

सत्काराला उत्तर देताना माजी आमदार राजेंद्र राऊत भावूक झाले होते. ते म्हणाले,

हा विजय माझा वैयक्तिक नसून बार्शी तालुक्यातील अहोरात्र कष्ट करणारे शेतकरी, कष्टकरी, महिला आणि तरुण युवकांचा आहे. तालुक्यातील जनतेने जाती-पातीचे संकुचित राजकारण पूर्णपणे नाकारून केवळ आणि केवळ विकासाच्या मुद्द्यांना कौल दिला आहे. या विश्वासाला तडा जाऊ न देता तालुक्याचा विकास अधिक गतीने करू.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या इतिहासामध्ये प्रथमच अध्यक्षपदाचा बहुमान बार्शी तालुक्याला मिळाला आहे. या ऐतिहासिक विजयाचे मुख्य शिल्पकार आणि बार्शी तालुक्याचे 'विकासरत्न' माजी आमदार राजेंद्र राऊत तसेच नूतन जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन वैराग येथे करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

या ऐतिहासिक यशाबद्दल बार्शी तालुका शिक्षक संघ, प्राथमिक शिक्षक संघ आणि सावित्रीबाई फुले प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील सर्व नूतन जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्य यांचाही एका समारंभात नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना शिक्षक नेते बब्रुवान काशीद सर यांनी माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, जमिनीवर राहून काम करणारा आणि मतदारसंघाच्या विकासासाठी सतत धडपडणारा लोकप्रतिनिधी म्हणून आमदार राजेंद्र राऊत यांची ओळख आहे. बार्शी तालुक्यात अनेक वर्षांपासून रखडलेले आणि प्रलंबित असलेले विकासाचे प्रश्न राऊत यांच्या अथक प्रयत्नांमुळे मार्गी लागत आहेत. 'संघर्षयात्री' आणि 'विकासात्मक नेतृत्व' असलेल्या माजी आमदार राऊत यांनी नेहमीच सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. या सोहळ्याला बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय गरड, पंचायत समिती सभापती मीनाक्षी रोंगे, उपसभापती संतोष निंबाळकर, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, नगरसेवक विजय चव्हाण, दीपक राऊत, बाजार समिती उपसभापती बाबा गायकवाड, झुंबर जाधव, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप गांधी, प्रशांत कथले, संचालक रामेश्वर पाटील, अभिजीत कापसे, विनायक डोईफोडे, बापू शेळके, अमोल शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य मदन दराडे, शांताराम काशिद, राजेंद्र सुरवसे, संजय भड, शरद बसवंत, रणजीत महानवर, विश्वनाथ साबळे, भिमा गव्हाणे उपस्थित होते.

# पावसाळ्यापूर्वी ५०० किलोमीटर रस्ते पूर्ण करण्याचे नियोजन

### आमदार उत्तमराव जानकर; माळशिरस तालुक्यातील पाणंद रस्त्यांची कामे मार्गी लागणार



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १७ मे-**

ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांना पावसाळ्यात होणाऱ्या गैरसोयी दूर करून वाड्या-वस्त्यांना मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी माळशिरस तालुक्यात पाणंद रस्त्यांच्या कामांना युद्धपातळीवर गती देण्यात आली आहे. आगामी जून महिन्यापूर्वी तालुक्यातील सुमारे ५०० किलोमीटर रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन असल्याची माहिती आमदार उत्तमराव जानकर यांनी दिली.

माळशिरस तहसील कार्यालयात आयोजित बैठकीनंतर ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संपूर्ण महाराष्ट्रात पाणंद रस्त्यांची महत्त्वपूर्ण योजना राबविली असून, त्याअंतर्गत माळशिरस तालुक्यातील विविध कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. पुढील आठ दिवसांत प्रत्यक्ष कामांना सुरुवात होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आमदार उत्तमराव जानकर म्हणाले की, माळशिरस तालुक्यात वर्षभरात एक हजार किलोमीटर पाणंद रस्ते तयार करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी ५०० किलोमीटर रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यासाठी प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी प्रांताधिकारी विजया पांगरकर व तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश दिले असल्याचेही त्यांनी सांगितले.

या रस्त्यांच्या कामांमुळे शेतकऱ्यांची पावसाळ्यातील वाहतुकीची मोठी समस्या दूर होणार असून शेतीमालाची वाहतूक अधिक सुलभ होणार आहे. काही ठिकाणी रस्त्यांच्या कामात अडथळे निर्माण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार जानकर यांनी कठोर इशाराही दिला.

५० लोकांच्या सोयीसाठी होणाऱ्या कामात एखादी व्यक्ती अडथळा निर्माण करत असेल, तर ते सहन केले जाणार नाही. अशा व्यक्तींवर शासनाच्या नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच महसूल मंत्री बावनकुळे यांच्या निर्देशानुसार आवश्यक असल्यास संबंधितांवर प्रशासकीय निर्बंध आणण्याबाबतही विचार केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

सध्या पहिल्या टप्प्यात ज्या ठिकाणी कोणताही वाद नाही आणि कामे सुलभपणे होऊ शकतात अशा रस्त्यांची निवड करण्यात आली आहे. लवकरच माळशिरस तालुका पाणंद रस्त्यांच्या कामात राज्यात आदर्श ठरेल, असा विश्वासही आमदार उत्तमराव जानकर यांनी व्यक्त केला.

## बार्शीत २७ मे पासून ॲक्टिंग कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ मे-**

अभिनय क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांसाठी अमर चित्रवाणीतर्फे विशेष ॲक्टिंग वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले आहे. अभिनेते व प्रशिक्षक अमर देवकर आणि सहशिक्षिका यांच्या मार्गदर्शनाखाली हे वर्कशॉप पार पडणार असून अभिनयाची मूलभूत तत्त्वे, अभिव्यक्ती कौशल्य, विविध अभिनय प्रकार तसेच प्रत्यक्ष शूटिंगचा अनुभव सहभागी विद्यार्थ्यांना दिला जाणार आहे. चित्रपट, मालिका, शॉर्ट फिल्म आणि रंगभूमी क्षेत्रात काम करण्याची तयारी करणाऱ्या नवोदितांसाठी हे वर्कशॉप उपयुक्त ठरणार आहे. कार्यशाळेमध्ये अभिनयातील बारकावे, संवादफेक, कॅमेरासमोर वावरणे, शरीरभाषा आणि सीन सराव यावर विशेष भर दिला जाणार आहे.

प्रशिक्षक अमर देवकर यांनी म्होरक्या, यांसारख्या फुला, प्रिझम चित्रपटामध्ये अभिनय केला असून त्यांचा अनुभव विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणार आहे. कारण देवकर यांचे काही विद्यार्थी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आहेत तर अनेक विद्यार्थी आज चित्रपटसृष्टीत अभिनय क्षेत्रात नावलौकिकास आले आहेत.

ही कार्यशाळा २७ ते ३१ मे दरम्यान सकाळी १० ते संध्याकाळी ७ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. बार्शी येथील मेडप्लस मेडिकलच्या वर, तिसरा मजला संकेश्वर बागेसमोर, बार्शी इथे वर्कशॉप होणार आहे. प्रवेश मर्यादित असल्याने इच्छुकांनी लवकर नोंदणी करावी, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

## लग्नाच्या मंडपात डान्स करताना विजेचा धक्का बसून तिघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

लग्नाच्या मंडपात डान्स करीत असताना लोखंडी अँगलचा शॉक बसल्याने एका अल्पवयीन मुलीसह तिघेजण जखमी झाले. ही घटना लष्कर परिसरातील सरस्वती चौक येथे शुक्रवारी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली .

आरती लक्ष्मण विठेवल्लू (वय १५), लखन सिद्राम गुंडेपागुल (वय १६ दोघे रा.लष्कर) आणि ओमकार कामया बुगले (वय १७ रा. कुंभार गल्ली) अशी जखमींची नावे आहे.

शुक्रवार रात्री ते तिघे लग्न मंडपात हळदी कार्यक्रम असल्याने डान्स करीत होते. त्यावेळी मंडपातील लोखंडी अँगलला हात लागल्याने त्यांना शॉक बसून जखमी झाले. त्यांना उपचारासाठी नातेवाईक चन्नप्पा म्हेत्रे यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## न्यू बुधवार पेठेत ५८ वर्षीय इसमाची गळफासाने आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

अज्ञात कारणावरून एका ५८ वर्षीय इसमाने राहत्या घरात छताच्या लाकडी वाशाला सुती दोरीने गळफाळ घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास शहरातील न्यू बुधवार पेठेत राहणाऱ्या उघडकीस आली. नंदकुमार नामदेव कोकणे (वय ५८ वर्ष, रा.४१/२०४ न्यूबुधवार पेठ) असे मयताचे नाव आहे.

शुक्रवारी रात्री त्याने राहत्या घरातील छताच्या लाकडी वाशाला सुती दोरीने गळफाळ घेतला होता. त्याला फासातून सोडवून नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# अभाविप कार्यकर्त्यांचा पालक; आधारवड : एस. के.

### समर्पित कार्यकर्त्याला भावपूर्ण श्रद्धांजली

सोलापूरच्या संघ परिवारामध्ये, शिक्षण क्षेत्रामध्ये, शिक्षक संघटनांमध्ये मागच्या पिढीत एक नाव आवर्जून घेतले जायचे ते म्हणजे एस.के. अर्थात सुधाकर केशव कुलकर्णी. याशिवाय अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा नवीन पूर्णवेळ कार्यकर्ता सोलापुरात आला की त्याचे पालक म्हणून एस. के. यांचे नाव सर्वप्रथम घेतले जायचे. कारण १९८० साली सोलापूरला श्याम जाजू तथा श्यामजी हे पहिले पूर्णवेळ कार्यकर्ते सोलापुरात आले आणि त्यावेळेपासून एस. के. यांच्याकडेच पूर्ण वेळ कार्यकर्त्यांची जबाबदारी असायची. ही जबाबदारी त्यांनी जवळपास २० ते ३० वर्षे सांभाळली. या काळात अनेक पूर्णवेळ कार्यकर्ते येऊन गेले. उल्लेख करायचा झाल्यास विद्यमान उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विद्यमान खासदार विनोद तावडे, रवी देशपांडे, विद्याधर कुलकर्णी, गीता जोगळेकर, सुवर्णा गोगटे, रत्नाकर कुलकर्णी श्रीपाद ढेकणे, अशी अनेक नावे घेता येतील. केवळ पूर्णवेळ कार्यकर्त्यांचे पालकच नव्हे तर विद्यार्थी परिषदेचा अधिकारी वर्ग जेव्हा सोलापूरला येत तेव्हा एस. के. सरांची भेट अथवा त्यांच्या निवासाची व्यवस्था एस.के. सरांचे घर हे एक समीकरणच असायचे. एस.के. सरांच्या घरी मदनदासजी देवी, अशोकराव मोडक अशी अनेक दिग्गज मंडळी मुक्काम करून गेली आहेत. त्यामुळे एस. के. सरांचे घर पावन झाले आहे. तसेच एस. के. सरांचे घर कार्यकर्त्यांसाठी २४ तास कायम उघडे राहिले आहे.

एस.के. कुलकर्णी बालपणापासून संघ स्वयंसेवक होते. शाळेमध्ये शिक्षकाची नोकरी असल्याने साहजिकच सरांकडे विद्यार्थी परिषदेच्या सोलापूर शहराच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आली होती. त्या काळात म्हणजे साधारण तर त्या दशकामध्ये विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष एक प्राध्यापक अथवा शिक्षक तयार होत नसत. मात्र एस.के. कुलकर्णी सरांनी संघाने सांगितलेले विद्यार्थी परिषदेचे काम सहजरित्या स्वीकारले आणि तीन, मन, धन ओतून संघाने सांगितलेली जबाबदारी उत्तम रीतीने पार पडली.

मी एक शिक्षक आहे. मी कुणीतरी वेगळा आहे, असे कधीही न दाखवता मी विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता आहे. याच भावनेने ते कार्यकर्त्यांमध्ये मिसळत असत. विद्यार्थी परिषदेचे काम वाढवण्यासाठी आपल्या अनेक विद्यार्थिनींना त्यांनी विद्यार्थी परिषदेच्या कामाशी जोडले आणि सोलापूरच्या विद्यार्थी परिषदेमध्ये विद्यार्थिनींची संख्या वाढवण्यासाठी मोठा हातभार लावला होता.



#### विज्ञानाचा प्रसार

एस. के. कुलकर्णी यांचे मूळ गाव मोहोळ तालुक्यातील मिरी. लहानपणापासूनच संघाचे बाळकडू घेतलेल्या एस.के. यांचे शिक्षण बीएस. सी. बीएड. पर्यंत झालेले आहे. बी.एड. झाल्यानंतर त्यांनी सुरुवातीला मंगळवेढा तालुक्यातील बोराळे या ग्रामीण भागामध्ये शिक्षक म्हणून आपल्या सेवेस प्रारंभ केला. त्यानंतर सोलापूरच्या सरस्वती मंदिर प्रशालेमध्ये जवळपास तीस वर्ष आपली शैक्षणिक सेवा रूजू रुजू केली. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरूनही त्यांनी विज्ञान आणि गणित विषयक माहिती विद्यार्थ्यांना दिली आहे. सोलापूर आकाशवाणी केंद्र सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात त्यांनी वैज्ञानिकांच्या जीवनावर माहितीपर कार्यक्रम सादर केले आहेत.

#### सामाजिक कार्यातही सहभाग

लहानपणापासून संघ स्वयंसेवक असल्याने सामाजिक कार्याची आवड होतीच. त्यात पुढे शिक्षक झाल्याने साहजिकच सोलापूरच्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची जबाबदारी ही त्यांच्याकडे आलीच. एस. के. विद्यार्थी परिषदेच्या कामात असतानाच देशात आणीबाणी लागू झाली. या विरोधात देशभर आंदोलने सुरू झाली. त्यावरून सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्याच्याशी संबंधित संघटनांच्या कार्यकर्त्यांना अटक करून कारागृहात टाकणे सुरू झाले. अर्थातच एस. के. ही या सत्याग्रहात सहभागी झाले आणि त्यांना मिसा बंदी कायद्याखाली अटक झाली. आणीबाणी विरोधात त्यांनी केवळ सत्याग्रहच केला असे नाही तर स्वतः च्या घरी रात्री गच्चीवर जुन्या काळात घरगुती सायक्लोस्टाईल मशीन वापरून पत्रके छपाई करून सत्याग्रहींना पुरवत असत. या कामात त्यांना अन्य कार्यकर्ते ही सहकार्य करीत. पत्रके छापण्याचा सुगावा पोलिसांना लागला आणि त्यानंतर एस. के. ना अटक झाली. सुरुवातीला सोलापूरच्या कारागृहामध्ये ठेवण्यात आले. नंतर नाशिक येथे नेण्यात आले. तिथे ते जवळपास १३ महिने होते. नाशिकच्या कारागृहामध्ये त्यांच्यासमवेत सोलापूरचे किशोर देशपांडे, ठाण्याचे माजी खासदार रामभाऊ म्हाळगी यांच्यासह अनेक मोठे नेते होते.

#### जेलमध्येच सावरकरांवर अभ्यास

सरकारने एस.के. ना कारागृहामध्ये ठेवल्यानंतर वेळ कसा जाईल याची चिंता त्यांना सुरुवातीला लागली. पण लगेचच त्यावर त्यांनी उपाय शोधला. जेलमध्ये त्यांनी मग स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवन चरित्राचा सखोल अभ्यास केला.

#### निवडणुकीत सहभाग

पंतप्रधान इंदिरा गांधीनी आणीबाणी उठवून निवडणूक घेण्याची घोषणा केली. सर्व मिसाबंदींना कारागृहातून मुक्त करण्यात आले त्याप्रमाणे एस.के. चीही कारागृहातून सुटका झाली. देशभर काँग्रेस पक्ष विरोधातील सर्व पक्ष एकत्रित येऊन जनता पक्षाची स्थापना करण्यात आली. देशभर सर्वत्र निवडणुकांचे वातावरण सुरू झाले. लोकसभा विधानसभा निवडणुका झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ही जाहीर झाल्या. त्यामध्ये एस. के. कुलकर्णी यांनी मोहोळ तालुक्यातील एका मतदारसंघातून जिल्हा परिषद निवडणूकही लढविली. आपले सहकारी श्रीमंत शिंदे यांना मोहोळपंचायतीसाठी जनता पक्षातर्फे निवडणुकीला उभे केले. पण यश मिळाले नाही. त्यानंतर मात्र त्यांनी पुन्हा कधीच निवडणूक लढविली नाही. मात्र नंतर कायम ते भाजपाच्या प्रचारासाठी मोहोळ तालुक्यात प्रवास करीत राहिले.

#### संघ कार्यात सहभागी

आणीबाणीनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तृतीय सरसंघचालक परम पूजनीय कै. बाळासाहेब देवरस यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर विविध क्षेत्रात संघ विचार पोहोचला पाहिजे यादृष्टीने वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कार्यास सुरुवात झाली. त्यांनी संघातील कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या क्षेत्रात पाठवून वेगवेगळ्या संस्था निर्माण करण्यास सांगितले. त्याप्रमाणे स्थानिक स्तरावर विविध संस्था काढण्याचे आवाहन करण्यात आले. त्यानुसार सोलापुरात डॉ. हेडगेवार ब्लड बँक, काका महाजनी ट्रस्ट, राणी चित्तूर चन्नम्मा प्रतिष्ठान, दैनिक तरुण भारत अशा संस्था हळूहळू सुरू करण्याचे नियोजन संघातर्फे सुरू झाले. त्यामध्येही एस. के. कुलकर्णी यांनी आर्थिक मदत गोळा करण्यासाठी मोलाचे कार्य केले. तत्कालीन संघाचे पदाधिकारी कै. दत्तोपंत कुलकर्णी, कै. यशवंतराव पेठे, कै. भैय्यासाहेब गौतम कै. बापूराव सारोळकर, डॉ . प.गो. वळसंगकर, अशा अनेक संघ स्वयंसेवकांसमवेत एस. के. यांनी आर्थिक मदत गोळा करून या संस्था उभारणीस हातभार लावला. हे करीत असताना त्यांनी *इदं न मम ! राष्ट्राय स्वाहा या उक्तीचा कधीच विसर पडू दिला नाही. त्यामुळेच त्यांनी कधीच कुणालाही मला अमुक एका संस्थेवर संचालक म्हणून घ्या असा कधीही आग्रह केलेला नाही.

#### उच्च शिक्षित पत्नी

या सगळ्यांमध्ये त्यांची पत्नी सौ. वसुंधरा यांचेही खूप सहकार्य लाभले. सौ. वसुंधरा कुलकर्णी (हेब्बार) या मूळच्या कर्नाटकातल्या. मात्र वडिलांच्या नोकरी निमित्ताने महाराष्ट्रात आलेल्या. पुण्याच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून १९६९ सालच्या बॅचच्या पहिल्या तीन विद्यार्थिनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन बाहेर पडल्या त्यापैकी एक वसुंधरा. शिक्षण झाल्यानंतर त्या १९७२ साली वीज महामंडळात जुनियर इंजिनियर म्हणून नोकरीस लागल्या आणि २००९ मध्ये त्या एक्झिक्युटिव्ह पदावरून निवृत्त झाल्या. अशा या उच्चशिक्षित पत्नीने त्यांना जीवनात मनापासून साथ दिली आणि त्यांच्या प्रत्येक कार्यातही सहभाग घेतला. नोकरी करत त्यांनी सरांना सर्व कार्यात सहभाग घेतला. मुलगा मिलिंद आणि मुलगी ज्ञाती हेही उच्च शिक्षित आहेत. अशा या संघ कार्यात झोकून देऊन काम करणारे, आणीबाणीत कारावास भोगलेले, विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाचा प्रसार करणारे शिक्षक, संघाच्या विविध संस्था उभारणीत आर्थिक मदत मिळवून देण्यास हातभार लावणारे, एस. के. कुलकर्णी आज आपल्यातून निघून गेले आहेत. त्यामुळे विद्यार्थी परिषदेच्या पूर्ण वेळ कार्यकर्त्यांचा एक पालक आणि विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांचा आधारवड हरपला आहे अशीच भावना आज मनात निर्माण झाली आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! !! !!!

● **दत्ता आराध्ये** (पंढरपूरकर), पत्रकार

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## पत्नी माहेरी गेल्याने तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १७ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील विकास दादासाहेब बोडरे ( वय २८) याने आज पिलीव येथील दादा माळी यांच्या शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

विकास बोडरे हा पिलीव येथे शेतात भाऊ सौरभ तसेच आई यांच्यासोबत राहत होता. त्यास दोन मुली आहेत. सततच्या भांडणांमुळे त्याची पत्नी माहेरी (मार्डी ता.पंढरपूर) निघुन गेली होती. ती काही केल्या नांदावयास येत नसल्याने विकास दारूच्या आहारी गेला. प्लंबिंगच्या व्यवसायातून त्याला चांगले पैसे मिळत होते, पण पत्नी नांदायला येत नाही हा विचार त्याच्या डोक्यात सतत होता. दोन मुली आहेत पण पत्नी नाही अशी अवस्था झालेल्या विकासने आज सकाळी पिलीव येथे शेतातील झाडाला गळफास घेत आपला जीवनप्रवास संपविला.



विकासचा भाऊ सौरभ बोडरे याने या घटनेची माहिती पिलीव पोलीस दूरक्षेत्राचे हवालदार नितीन लोखंडे व हवालदार मरळे यांना कळविली. पोलिसांनी ताबडतोब घटनास्थळी जाऊन पंचनामा करुन सदरचे प्रेत शवविच्छेदनासाठी माळशिरस येथे पाठवले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकाच्या ताब्यात देण्यात आला.

घटनेचा तपास माळशिरस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विकास दिंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार मरळे हे करीत आहेत.

## महत्त्वाचे...



### वाशिंबे येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कुस्ती मॅटची सुविधा

**जेऊर, दि. १७ मे -**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा सुविधा उपलब्ध करण्याच्या उद्देशाने अभिनव कुस्ती संकुल व विद्यालय, वाशिंबे येथे पहिल्यांदाच दोन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कुस्ती मॅट उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रत्येकी सुमारे साडेपाच लाख रुपये किमतीच्या या मॅटमुळे विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सुविधांमध्ये प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. ग्रामीण भागासाठी हा एक अभिनव उपक्रम मानला जात असून, येथे विद्यार्थ्यांना पहिली ते बारावीपर्यंत सेमी इंग्रजी माध्यमातून शिक्षणासोबत व्यावसायिक कुस्ती प्रशिक्षण देणार आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निवास तसेच सकस आहाराचीही उत्तम व्यवस्था केली आहे. याठिकाणी १०० फूट बाय ५० फूट आकाराचा आधुनिक आंतरराष्ट्रीय दर्जाचा इंडोर कुस्ती हॉल उभारला आहे. महाराष्ट्र व हरियाणातील अनुभवी तसेच एनआयएस कुस्ती मॅटच्या पूजनावेळी संस्थापक आबासाहेब झोळ, प्रा.महादेव झोळ, गणेश झोळ, सतीश झोळ, शैलेश झोळ, पियुश डोंबाळे उपस्थित होते.



### शैक्षणिक परिवर्तनाच्या दिशेने टेंभुर्णीत नवी वाटचाल : शिंदे

**टेंभुर्णी, दि. १७ मे-**

माढा तालुक्यात दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शैक्षणिक परिवर्तनाची दिशा निश्चित केली असल्याचे प्रतिपादन श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विक्रमसिंह शिंदे यांनी केले. टेंभुर्णी येथील विठ्ठल ॲकॅडमीच्या वतीने दहावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमात माढा तालुक्यातील विविध शाळांमधील दहावीच्या परीक्षेत गुणानुक्रमे पहिल्या तीन क्रमांकात आलेले तसेच ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या १९७ विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणा दिली. प्रास्ताविक ज्ञानेश्वर गणगे यांनी केले. यावेळी शिवदत्त गौतम, कुलदीप खेतलान, अनुपम मिश्रा, विपिनकुमार गोयल आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी टाकळीचे मुख्याध्यापक महादेव सुरवसे, उपळाई (खुर्द)चे मुख्याध्यापक हनुमंत खापरे, पिंपळखुंटेचे मुख्याध्यापक मोहन नलवडे, टेंभुर्णी येथील मुख्याध्यापक दत्तात्रय हुलगे, घोटी (करमाळा) येथील मुख्याध्यापक लक्ष्मण मोरे तसेच शिक्षकांनी सहकार्य केले.


### कुत्रा आडवा आल्याने तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि.१७ मे-**

कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून जखमी झालेल्या शेळगी येथील तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शनिवारी दुपारी मृत्यू झाला. करीम गुलजार शेख (वय ३६ रा.बसवेश्वरनगर शेळगी. सध्या रा. नवीन घरकुल कुंभारी) असे मयताचे नाव आहे. ते सोमवारी रात्री साडेसात वाजेच्या सुमारास दुचाकीच्या पाठीमागे बसून कुंभारी ते सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या दिशेने निघाले होते. घरकुलपासून एक किलोमीटर अंतरावर अचानक कुत्रा आडवा आल्याने ते खाली कोसळून गंभीर जखमी झाले होते. त्यांना कुंभारी येथे प्राथमिक उपचारानंतर सोलापुरातील शासकीय रुग्णालयात भाऊ मोहसीन यांनी दाखल केले असता त्याचा शनिवारी दुपारी मृत्यू झाला.

### कर्णकर्कश सायलेन्सर वापरणाऱ्या बुलेटवर कारवाईची मागणी

**पिलीव, दि १७ मे-**



माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात कर्णकर्कश सायलेन्सर असणाऱ्या बुलेट गाड्यांची संख्या वाढत चालली आहे. अनेक तरुण बुलेट गाड्या बसस्थानक परिसर, बाजारपेठ, शाळा, कॉलेज आवारातून अतिशय वेगाने चालवितात. याच्या कर्णकर्कश आवाजाने नागरिकांना प्रचंड त्रास होतो. या आवाजामुळे अपघातही झाले आहेत; तरीही तरूणांमध्ये अशा बुलेट वापरण्याची क्रेझ वरचेवर वाढतच चालली आहे. पिलीव येथे बुलेट बरोबरच यामाहा गाड्यांनाही असे सायलेन्सर आहेत. पोलिसांनी बुलेट तसेच कर्णकर्कश आवाज करणाऱ्या यामाहा गाड्यांवर कारवाई करावी व कर्णकर्कश सायलेन्सर वापरावर कायमस्वरुपी बंदी घालावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे पिलीव शहराध्यक्ष कुमारसिंग भैस यांनी केली आहे. याबाबत पिलीव पोलीस दूरक्षेत्राचे हवालदार नितीन लोखंडे यांनी कर्णकर्कश सायलेन्सर वापरणाऱ्या बुलेट व यामाहा गाड्यांवर ताबडतोब कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

## पंचायत समिती पदाधिकाऱ्यांना मानधनाची भेट

### प्रथमच आर्थिक दिलासा; जिल्हा परिषदेकडून ७९ लाखांची तरतूद

- सभापतींना १0 हजार, उपसभापतींना ८ हजार मानधन
- भत्तेही खात्यावर जमा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

जिल्ह्यातील पंचायत समिती सभापती आणि उपसभापती यांना प्रथमच नियमित मानधन खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. यासाठी जिल्हा परिषद सेस फंडातून तब्बल ७९ लाख २५ हजार ४०० रुपयांची तरतूद केली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केलेल्या या तरतुदीमुळे पंचायत समिती स्तरावरील पदाधिकाऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे.

सोलापूर जिल्ह्यात एकूण ११ पंचायत समिती असून प्रत्येक पंचायत समिती सभापतींना दरमहा १० हजार रुपये मानधन, तर उपसभापतींना ८ हजार रुपये मानधन देण्यात येत आहे. याशिवाय विविध प्रकारचे प्रवास, फिरती, दूरध्वनी व कार्यालयीन भत्तेही मंजूर केले आहेत. सभापतींना दरमहा २ हजार ४०० रुपये फिरती भत्ता, पंचायत समिती कार्यक्षेत्रातील प्रवासासाठी १ हजार ३५० रुपये, तर तालुक्याबाहेरील दौऱ्यासाठी स्वतंत्र भत्ता दिला जात आहे.




उपसभापतींनाही दरमहा ९०० रुपये प्रवास भत्ता मंजूर आहे. याशिवाय निवास भाडे, अल्पोहार, वर्तमानपत्र, दूरध्वनी तसेच कार्यालय व निवासस्थानी फर्निचर खरेदी-दुरुस्तीसाठीही निधीची तरतूद केली आहे. पंचायत समिती सभापती कार्यालयासाठी वार्षिक ५ हजार रुपये फर्निचर दुरुस्ती खर्च, निवासस्थानी फर्निचरसाठी ४० हजार रुपये, दूरध्वनी भाड्यासाठी १२ हजार रुपये आणि वर्तमानपत्रासाठी १ हजार ८०० रुपये मंजूर केले आहेत. जिल्हा परिषदेकडून प्रथमच इतक्या नियोजनबद्ध पद्धतीने मानधन आणि भत्ते वितरित होत असल्याने पंचायत समिती स्तरावर समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

#### मानधनाच्या रकमेवर खासगीत नाराजी व्यक्त

दरम्यान, हे मानधन जुन्या शासन निर्णयानुसार दिले जात असल्याने सध्याच्या वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर त्यामध्ये वाढ होण्याची अपेक्षा काही सभापती व उपसभापतींकडून व्यक्त होत आहे. जबाबदाऱ्या वाढल्या, पण मानधन त्याच पातळीवर आहे, अशी भावना काही पदाधिकाऱ्यांनी खासगीत व्यक्त केली.

### खा. मोहिते-पाटील यांचे ना. गडकरी यांना रस्त्यांबाबत निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ मे-**

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे फलटण ते पंढरपूर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाच्या पाहणी दौऱ्यावर आले असता खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगोला तालुक्यातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निवेदन दिले. निवेदनामध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ वरील वाटंबरे येथील श्री खंडोबा देवस्थान परिसरात स्थानिक नागरिक व भाविकांच्या सुरक्षित दळणवळणासाठी डिव्हायडरची रचना योग्य पद्धतीने करावी, जुनोनी येथील नागरिकांच्या वस्तीसाठी माळीवस्ती ते काळूबाळूवाडी दरम्यान सर्व्हिस रोड उभारणे, एस.टी.बस स्टॉपजवळील गटारीचे काम पूर्ण करणे, हातीद येथे पेट्रोल पंप ते शेखवस्ती दरम्यान दोन्ही बाजूंनी सर्व्हिस रोड उभारणे आदी मागण्या केल्या. या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने कामे मंजूर करून सुरू करावीत, अशी मागणी निवेदनाद्वारे खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी केली आहे.

## रिक्षात विसरलेली बॅग दोन तासांत प्रवाशाला परत; बॅगेत होते १५ लाख रुपयांचे दागिने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

लग्नकार्यासाठी सोलापुरात आलेल्या एका प्रवाशाने त्याच्या जवळील १५ लाख रुपयांचे दागिने असलेली बॅग रिक्षामध्ये विसरली होती. जेलरोड ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ती अवघ्या दोन तासांत शोधून तक्रारदाराला परत केली.



मुसा बागवान ( रा. इरकल, कर्नाटक) हे शनिवारी सकाळी सात रस्ता ते समाचार चौक परिसरात आले होते. घाईगडबडीत उतरताना त्यांचे १५ लाख रुपये किमतींचे १० तोळे सोने असलेली बॅग रिक्षातच विसरली. बॅग रिक्षात राहिल्याचे लक्षात येताच बागवान यांनी तत्काळ जेलरोड पोलिस ठाणे गाठले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक शिवाजी राऊत यांना माहिती दिली. राऊत यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सपोनि संदीप पाटील यांना तात्काळ तपासाचे आदेश दिले. तपास अंमलदारांना सीसीटीव्ही फुटेज तपासणीदरम्यान त्यात संबंधित रिक्षाचा क्रमांक अस्पष्ट दिसत होता. तरीही पोलिस अंमलदार अब्दुल शेख यांनी आपल्या कौशल्याचा वापर करत केला. त्यांनी परिसरात रिक्षाबाबत विचारणा करत रिक्षाचालकाचा अचूक शोध घेतला.

रिक्षाचालकाला गाठून त्याच्याकडून तक्रारदार बागवान यांची दागिने ठेवलेली बॅग हस्तगत करून त्यांना पात दिली. ही कामगिरी पोलिस निरीक्षक भाऊराव बिराजदार, सपोनि संदीप पाटील, हवालदार अब्दुल शेख, भारत गायकवाड, इकरार जमादार, कल्लप्पा देकाणे आणि युवराज गायकवाड यांनी बजावली.

## पोलिस कर्मचारी व आगारप्रमुखांच्या सतर्कतेमुळे गहाळ सोने सापडले

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १७ मे-**

शनिवारी दि. १६ मे रोजी स्वारगेट - कलुबुर्गी बसने निघालेल्या महिलेची पर्स वळसंग बसस्टॉपवर उतरल्यावर गहाळ झाली. मात्र पोलिस कर्मचारी व अक्कलकोट आगार प्रमुखांच्या पर्समधील सोन्यासह सर्व महत्वाची कागदपत्रे महिलेला सुखरुपपणे परत मिळाली.

शनिवारी दुपारी सुमारे ४.०० वा. फातिमा शेख, वय ६५, रा. जयसिंगपूर, जि. कोल्हापूर या स्वारगेट-गुलबर्गा बसने प्रवास करीत होत्या. वळसंग बसस्टॉपवर उतरल्यावर त्यांची पर्स गहाळ झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी वळसंग पोलीस ठाणे येथे येऊन याबाबत माहिती दिली. याबाबत तात्काळ सहायक पोलिस निरीक्षक राहुल डोंगरे यांनी त्वरित पोलीस हेडकॉन्स्टेबल रामदास मालचे, हेडकॉन्स्टेबल अमोल यादव व हवालदार अनिशा पटेल यांना माहिती दिली. त्यानुसार मालचे यांनी तात्काळ अक्कलकोट एस.टी. कंट्रोलर अंबाना कोळी, अक्कलकोट बस आगार यांच्याशी संपर्क साधून संबंधित बस अक्कलकोट डेपो येथे पोहोचल्याची खात्री करून बसमध्ये प्रवासी महिलेची पर्स शोधण्याबाबत सूचना दिल्या.



अंबाना कोळी यांनी संबंधित बस थांबवून अक्कलकोट येथे चौकशी केली असता फातिमा शेख यांची गहाळ पर्स मिळून आली. सदर पर्समध्ये मोबाईल फोन, रोख रक्कम तसेच अंदाजे ८ ग्रॅमची सोन्याची बोरमाळ व इतर सर्व वस्तू सुरक्षित मिळून आल्या. त्यानंतर सर्व मुद्देमाल पोलीस ठाणे येथे आणून शेख यांना सुखरूप परत दिल्या. ही कार्यवाही पोलिस कर्मचारी व एस.टी. कंट्रोलर यांची तत्परता व सतर्कतेमुळे पार पडली. सदर महिला प्रवाशाने पोलिस प्रशासन व अक्कलकोट बस आगाराचे आभार व्यक्त केले.

### पंढरपुर शहरात जनगणनेच्या दुसऱ्या भागाला सुरुवात

**पंढरपूर, दि.१७ मे-**

पंढरपूर शहरात जनगणनेच्या दुसऱ्या भागाला शनिवार (दि. १६) पासून सुरवात झाली. यात प्रगणक प्रत्येक घरी जाऊन घरयादी व घरगणना करणार आहेत. नागरिकांनी प्रगणकांना अचूक माहिती देण्याचे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे. दि.१६ मे ते १४ जून या कालावधीतील दुसऱ्या टप्प्याच्या कामकाजास सुरुवात झालेली असून, जनगणना संचालनालय सह संचालक रमेश भोसले यांनी प्रत्यक्ष भेट देवुन बोहरी पेट्रोल पंप येथील भागातील सुरु असलेल्या कामाची माहिती घेतली. त्या भागाचे प्रगणक, पर्यवेक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांचे समवेत जिल्हाधिकारी कार्यालयातील जनगणना अधिकारी उपस्थित होते. पंढरपूर शहरात जनगणनेचे कामकाज करण्याकरिता २५ पर्यवेक्षक व १५० प्रगणकांची नियुक्ती केल्याचेही मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

## ...तर पिकविमा कंपनीच्या काचा लवकरच वेचू

### शंकर गायकवाड यांनी दिला गर्भित इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ मे-**

पिकविम्यापासून वंचित शेतकऱ्यांना पिकविम्याचा लाभ व्हावा, यासाठी २५ मे पासून आंदोलन करण्यात येईल. वेळप्रसंगी संबंधित लुटारु पिकविमा कंपन्यांसह शासकीय कार्यालयाच्या काचा पूर्वीपेक्षा जास्त वेचून विमा भरपाई व्याजासह वसूल करण्यात येईल, असा गर्भित इशारा शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांनी दिला आहे.

चिखर्डे, ता. बार्शी येथे झालेल्या जाहीर सभेत गायकवाड बोलत होते. २०१६ पासून विविध कार्यालयावर पिक विम्यासाठी शेकडो आंदोलने केली. अनेक वेळा कार्यालयाच्या काचा वेचून आंदोलने केली, परंतु दरवेळी फक्त आंदोलनात आलेल्या शेतकऱ्यांनाच योग्य रक्कम मिळाली.



राज्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांना मात्र पिकविमा नुकसान भरपाई खूप कमी दिली गेली तर न भांडणाऱ्या शेतकऱ्यांची अक्षरशः लुटली गेली. ती वसूल करण्यासाठी व चालू वर्षी राज्यातील अनेक तालुक्यांना पिक विम्यातून वगळल्यामुळे, २५ मे पासून संबंधित लुटारु पिकविमा कंपन्यांसह शासकीय कार्यालयाच्या काचा पूर्वीपेक्षा जास्त वेचून विमा भरपाई व्याजासह वसूल करण्यात येईल, असे गायकवाड यांनी सभेत सांगितले.

राज्यातील ज्या शेतकऱ्यांचे पिकविमा कंपन्यांकडे नुकसान भरपाई येणे बाकी आहे, अशा शेतकऱ्यांनी या आंदोलनात सहभागी होण्याचे आाहनही त्यांनी केले. यावेळी युवा आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष शरद भालेकर, माढा तालुकाध्यक्ष विलास दोलतडे, जिल्हा संघटक सचिन आगलावे, जीवन गावडे, प्रकाश पाटील, प्रशांत काळदाते, सुधीर सवणे, रघुबप्पा कोंढारे, ज्ञानदेव कोंढारे, अशोक कोंढारे, सुभाष देवकर, पल्लव गाढवे, संतोष दळवी, बापू जाधव आदींसह पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. यावेळी पंचक्रोशीतून आलेल्या शेतकऱ्यांना शेतकरी संघटनेची शपथ देण्यात आली. शरद भालेकर व पाल्लव गाढवे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास दोलतडे यांनी केले तर आभार जीवन गावडे यांनी मानले.

## उंबरे (पागे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास कुलूप

### सर्वसामान्य जनतेने जायचे कोठे?

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१७ मे-**

पंढरपूर तालुक्यातील उंबरे (पागे) येथील ग्रामीण रुग्णालय रात्री कुलूप बंद अवस्थेत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जिल्हा परिषद सदस्य आदिनाथ देशमुख यांच्या निदर्शनास हा प्रकार आला. परिणामी रुग्णालयाची अशी अवस्था असल्यास सर्वसामान्य नागरिकांनी कुठे जायचे? असा प्रश्न विचारला जात आहे.



उंबरे (पागे) ता. पंढरपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून सुसज्ज इमारत उभारली आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी कोट्यवधी रुपये खर्चून निवासस्थाने उभारली आहेत. मागील काही वर्षांपासून जिल्हा परिषद व पंचायत समितीवर प्रशासक असल्यामुळे येथील अधिकारी कर्मचारी हे मनमानी कारभार करत असल्याचे दिसून येत होते. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद सदस्य आदिनाथ देशमुख यांनी करकंब जिल्हा परिषद गटातील उंबरे (पागे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला शनिवारी सायंकाळी अचानक भेट दिली. कुलूप बंद असलेल्या दवाखान्याच्या दारात बसून हा संपूर्ण प्रकार जिल्हा आरोग्य अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांना दूरध्वनी वरून सांगितला. तसेच संबंधित विभागाची कानउघडणी करत असे प्रकार खपवून घेतले जाणार नसल्याची तंबी दिली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांना कुलूप बंद असलेल्या आरोग्य केंद्राचे लोकेशन सह फोटो पाठवत त्यांच्याही निदर्शनास आणून दिली. त्यानंतर काही तासातच डॉक्टर व कर्मचारी या हॉस्पिटलमध्ये हजर झाले.

#### आरोग्यविषयी निष्काळजीपणा खपवून घेणार नाही

सर्वसामान्य जनतेला मोफत आरोग्य सुविधा ग्रामीण भागात मिळाल्या पाहिजेत. आरोग्य विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे भविष्यात आरोग्यविषयी कोणताही निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही.

**- आदिनाथ देशमुख, जि.प.सदस्य करकंब गट.**

#### आजारापेक्षा रुग्णालयीन कर्मचाऱ्यांचा त्रास जास्त

ग्रामीण आरोग्य केंद्रे ही सर्वसामान्य नागरिकांसाठी जिव्हाळ्याची असतात. परंतु ग्रामीण भागात असलेल्या रुग्णालयाकडे कोणाचे लक्ष नसल्याने अधिकारी व कर्मचारी निर्ढावले आहेत. रुग्णालयात वेळेवर न येणे, रुग्णांना अरेरावीची भाषा वापरत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. या प्रकारामुळे रुग्णांना आजारापेक्षा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचा जास्तीचा त्रास सहन करावा लागत आहे.